UNIVERSAL LIBRARY

OU_192690

UNIVERSAL LIBRARY

OUP—552—7-7-66—10,000

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M83/A85M Accession No. M3561

Author आपटे न. ह.

Title मी वाट पाहीन

This book should be returned on or before the date last marked below.

न्टिनेन्टल प्रकाशन २८

# मी वाट पाहीन !

## ( विफलता )

लेखक

ना. ह. आपटे

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

न्टेंबर १९४४ ]

[ सव्वा दोन रुपये

प्रकाशक :

अ. अं. कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
१०६ सदाशिव, पुणें २

CHECKED 1951

Checked 1965

ह्या आवृत्तिखेरीज इतर सर्व हक्क लेखकांकडे

मुखपृष्ठावरील चित्र श्री. दीनानाथ दलाल यांनीं काढलें आहे.

मुद्रक :

स. रा. सरदेसाई, बी. ए., एलूएल्. बी.
नवीन समर्थ विद्यालयाचा
'समर्थ भारत' छापखाना,
४१ बुधवार, पुणें २

## स्मरणार्थ

# — मोत्या —

[ लेखकाचा एक अत्यंत आवडता कुत्रा. ]

जन्म १९३७ मृत्यू १९४४

वरील नांवाच्या माझ्या मुक्या मित्रानें ता. १९-९-४४ ला आम्हाला सोडलें !—मोत्याच्या मृत्यूनें कुटुंबांतील आम्हां सर्व माणसांना किती दुःख झालें असेल, याची बरोबर कल्पना, ज्यांनीं कुत्रीं पाळलीं आहेत त्यांनाच येईल ! मोत्या मेला त्या वेळीं मी घरीं नव्हतों–दूर प्रवासाला गेलों होतों. तो असा एकाएकीं कालवश होईल, याची मला कांहींच कल्पना नव्हती. यामुळें प्रवासांत त्याची मृत्युवार्ता कळतांच जबर धक्का बसला आणि त्याची शेवटची भेट झाली नाहीं याची भारी चुटपूट लागली !

मोत्याचें अवसार ही आमची मोठी कौटुंबिक हानी होय. या हानीनें आम्ही कष्टी झालोंच; पण आमच्या आळींतील लोकांनाहि अत्यंत वाईट वाटलें. तो ओळखीमध्यें सर्वांचा संवगडी होता ! रात्रीं ९ च्या पुढें त्याचा पहारा सुरू झाल्यावर मात्र तो सर्वांना भयप्रद होता. पुरती ओळख दिल्यावांचून त्याच्या कसैंत येणें धोक्याचें होतें !

माझ्या मित्रमंडळींपैकीं ज्यांना या कुत्र्याचा परिचय होता, त्यांनाहि त्याची मृत्युवार्ता ऐकून भारी हळहळ वाटली !

आज तो इमानी जीव आम्हांला सोडून गेला आहे !

कोणतेंहि कुत्रें साधारणतः चतुर व स्वामीनिष्ठ असतेंच. पण कांहीं जाति विलक्षण बुद्धिमान् आढळतात. मोत्या त्यांपैकीं होता. गेल्या सात आठ वर्षांत त्यानें आम्हांला जी सोबत दिली, तेवढ्या कालांत, त्यानें दाखविलेलें शहाणपण, शौर्यधैर्य, स्नेह, स्वामीनिष्ठा आश्चर्य वाटण्यासारखी होती, यांत शंका नाहीं. पुन्हां असा मित्र मिळेल ?—शंका वाटतें.

आतां फक्त आठवणी सांगायच्या नी ऐकायच्या !—पण ज्या ज्या वेळीं त्या निघतील त्या त्या वेळीं आमच्या डोळ्यांत हुंदका आल्यावांचून राहणार नाहीं !

मोत्या !—माझ्या मित्रा ! तुला अनेक प्रमाण !

**ना. ह. आपटे**

# टिपण

सुमारें आठ वर्षांपूर्वी लिहिलेल्या व प्रसिद्ध केलेल्या **विफलता** नामक एका सामाजिक कथेचें हें नवें रूप '**मी वाट पाहीन.**' या नांवानें वाचकांपुढें येत आहे.

'**आम्ही दोघं**' या आत्मकथेचें वाचकांनीं स्वागत केलेंच आहे. त्याच धर्तीची **मी वाट पाहीन** ही आत्मकथा आहे. संसारांत स्थाईक होण्याच्या आधींच एका तरुणानें जीवनांतील जी चुणूक अनुभविली त्याचें हें जिवंत चित्र आहे. महाराष्ट्रांतील मध्यम वर्गांत मोडणाऱ्या सर्व सामान्य कुटुंबाची काय स्थिति असते, हें पाहतांना यांतील कांहीं कांहीं प्रसंग वाचकांना दाट परिचयाचे वाटतील. हीच या कथेंतील गोडी.

कॉंटिनेंटल प्रकाशक संस्थेचे चालक श्री. अ. अं. कुलकर्णी यांनीं आग्रह धरला नसतां तर या कथेचें पुनर्मुद्रण इतक्या लौकर होतें ना. सध्यां त्यांच्याकरितां '**एकटी**' या मोठ्या कादंबरीचें लेखन सुरू आहे. ती वाचकांच्या सेवेंत सादर होईपर्यंत ही सेवा गुणग्राहक वाचक मान्य करून घेतील अशी आशा आहे.

कोजागिरी १८६६
कोरेगांव, जि. सातारा

**नारायण हरि आपटे**

# श्री. ना. ह. आपटे यांचें तेजस्वी वाङ्मय

१ लांच्छित चंद्रमा
२ याला कारण शिक्षण
३ संगदोष
४ वेटिंग रूम
५ अपेक्षा
६ सुखाचा मूलमंत्र
७ दिवाकर दृष्टि
८ उमज पडेल तर
९ आरामविराम
१० सुमनगंध
११ हंसा किंवा रुसा
१२ वैभवाच्या कोंदणांत
१३ हृदयाची श्रीमंती
१४ भाग्यश्री
१५ गृहसौख्य
१६ संसारांत पडण्यापूर्वी
१७ शामसुंदर
१८ आयुष्याचा पाया
१९ जीवनका आधार
२० सुगरणीचा संसार
२१ आम्ही दोघें
२२ कोंडाकणी
२३ न पटणारी गोष्ट
२४ साजणी
२५ मी वाट पाहीन !
२६ ऐरणीवर
२७ बोलकी बाहुली
२८ दिवा जळो आहोरात्र

आपटे आणि मंडळी, कोरेगांव व सदाशिव पेठ, पुणें २

मी वाट पाहीन !

# कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणें २

## —प्रकाशित—

नाद-निनाद (श्री. कवठेकर) १॥
स्वाति (श्री. सरदेसाई) १॥
नवा प्रातःकाल (श्री. खांडेकर) २॥
चांदण्यांतील सांवल्या (कवठेकर) २॥
कलावंतांच्या सहवासांत (धनंजय) ३
नीलेचा दिलरुबा (सौ. नाशिककर) २
भंगलेली मूर्ति (श्री. चिरडे) १॥
मोगरीचा गजरा (श्री. वैद्य) १।
प्रकाशांतील व्यक्ति (श्री. पाध्ये) १॥
घरकुल (श्री. काणेकर) १।
बेबीचा भाऊ (श्री. बोकील) ३
मामा (श्री. ताम्हनकर) १॥
काळी मेहुणी (श्री. काणेकर) १॥
साडेतीन शहाणे (श्री. बोकील) ३
जीवन-साहित्य (श्री. माडखोलकर) २।
जीवन आणि समाज
(आचार्य काका कालेलकर) १॥।
शालन् (श्री. कवठेकर) ३
मंदा (श्री. कवठेकर) २
चिमखडे (श्री. बोकील) २॥
गोड ललकाऱ्या (श्री. रानडे) १॥
पहिल्या-वहिल्या (श्री. खांडेकर) २।
पूजन [दु. आ.] (श्री. खांडेकर) २॥
वसंत (श्री. बोकील) ३
अमोल गोष्टी (साने गुरुजी) २
धोंग्याचे कळे (श्री. शामराव ओक) २।
मी वाट पाहीन! २।

## —आगामी—

'तो' (श्री. ना. धों. ताम्हनकर)
एकटी (श्री. ना. ह. आपटे)
'??—' (श्री. खांडेकर)
हा आमचा संसार (श्री. कवठेकर)
गुन्हा ( ,, )
श्री ( ,, )
'बेबी' [पुनर्मुद्रण] (श्री. बोकील)
भाऊ भाऊ ( ,, )
मुंबईंत ( ,, )
'??—' (श्री. माडखोलकर)
नेपोलियन (श्री. मा. गो. काटदरे)

## आमचीं इतर पुस्तकें

टाकीचे घाव (प्रो. फडके) २
गुलाबाच्या पाकळ्या
(श्री. कवठेकर) १॥
अत्रे उवाच (आचार्य अत्रे) २
साहित्यिकांची सफर
(श्री. य. गो. जोशी) १॥
चिमण्या (डॉ. कमलाबाई देशपांडे) १
वळणाचें पाणी (श्री. कांबळे) १॥

# प्रसंग पहिला : : : १

( केवळ स्वतःच्या संतोषार्थ व मित्रांना दाखविण्याकरितां )

प्रसंगांचा काल — लेखनाचा काल

शके १८५२-५३ — शके १८५७

*  *  *

| | |
|---|---|
| पो. से. बँकेंतील शिल्लक | ६३॥।-॥ |
| शनिवारीं दुपारीं काढले | १० रु. |
| शिल्लक राहिली | ५३॥।-॥ |

पुन्हां मध्यें एकच रविवार गेला. सोमवारीं हात कोरडा झाला. म्हणून पुन्हां अगदीं कारणापुरतेच पांच रुपये काढले. बँकेंत शिल्लक राहिली ४८॥।-॥.

पण बुधवारीं दुपारीं पाकीट तपासलें तों काय? ·॥-॥ अवघे राहिले होते.

शरीरांत यत्किंचित्‌हि पित्तांश वाढला नसतां मला चक्कर करूं लागली! खर्च पै न्‌ पै मांडलेला होता. उधळमाधळ एका कवडीनेंहि झाली नव्हती. पण खिशांत शिल्लक मात्र ·॥-॥. भ्रमिष्ट मनांत विचार आला: प्रत्यहीं असे चार चार रुपये लागूं लागले तर?–बारा पंधरा

दिवसांनंतर काय करायचं ?–**खरंच काय करायचं** ?–प्रश्नांतील प्रत्येक अक्षर रक्तानं माखल्याप्रमाणं दिसूं लागलं !–आणि इतक्यांत मामींनीं माझ्यासमोर तुपाचं रिकामं भांडं आणून ठेवलं !

तो आणा पाहतांच थिजलोंच मी !–यापेक्षां मामींनीं भरलेला रिव्हॉल्व्हर माझ्यावर रोखला असता तर ?–मी बिलकुल भेदरलों नसतों !

मी घाबरत केकावलों, "मामी, परवां शनिवारींच मीं दोन शेर लोणी आणून दिलं कीं हो !–आणि इतक्यांत–"

स्थितप्रज्ञाला शोभेल अशा अविचल मुद्रेनं मामी म्हणाल्या, "तात्या, घरांत खर्च थोडा का आहे रोजचा ! वन्सं आजारी पाहतोसच आहेस. त्यांना तांदुळाचा सांजा–"

मी हतबुद्ध होऊन म्हणालों, "पण मामी, आई आज तीन दिवस झाले मोसंब्याच्या रसावर आहे. आम्हांला वाढायला आणलेला चमचा कानकोर्ण्यापेक्षां थोडा डगळ आहे हें मी कबूल करतों. पण–पण–पण—" मला शब्दच सांपडेनात.

मामी उपहासानं हंसल्या व माझी कींव करीत म्हणाल्या, "तें खरं रे. पण इतर खर्च काय थोडा आहे ?–वन्संच्या समाचाराला न येणारीं माणसं येतात. इतरांची ये-जा आहेच. आपले वासूकाका चहाला तीन-त्रिकाळ आहेतच. कालच त्या कुबेर वकिलीणबाई आल्या होत्या. त्यांच्यापुढं काय नुस्तं चहाचं पाणीच द्यायचं ?—तरी त्या चहा घेत नाहींत म्हणून बरं. मग करावी लागली कॉफी !–पण ऐत्या वेळीं डब्यांत साखर पाहतें तों काय, संपलेली ! शेजारच्या काकू बसायला आल्या होत्या म्हणून बरं. त्यांच्याकडून आणली मग फुलपात्रभर !—"

मी विमनस्क होत बरळलों—"मग काल मोठीच अब्रू बचावली म्हणायची ?"

मामी म्हणाल्या, " तर रे. शेजारपाजार असं वश्श ठेवावं लागतं. हं–मग मी काय सांगत होतें, दोन शेर लोणी, साखर, आण घडाभर–वन्संना मात्रेंत घालावी लागते. सारखा खर्च आहे तिचा. वेलदोडे दोन तोळे, मनुका पावशेर अच्छेर, पोहे अडेश्री तीन शेर. राजा–बाबी, सारखं खायला मागतात. त्यांच्याकरितां थोडा चिवडा करीन म्हणतें. हो–दोन शेर गोडं तेल. शंकरपाळींहि करणार आहें थोडींशीं !–बदाम, बेदाणा न् खडीसाखर आणतोस का थोडी ?–आण, घर म्हणून असूं दे. आणखी काय बरं ? "

माझ्या विकल मनःस्थितीची एवढीहि पर्वा न करतां मामी सत्य-नारायण किंवा मेजवानी करण्याच्या आवेशानें सामानाची याद देत होत्या.

माझी आई आसन्नमरण होती. राजा-बाबी दहा-सहाचीं बाळें होतीं व मला आईच्या शुश्रूषेंत असावें लागत होतें. म्हणून आईला पथ्याचं व आम्हां तिघांना गोळाभर अन्न दोहों वेळां मिळावं म्हणून आम्हीं आपण होऊन मामीला मोठ्या आर्जवानं बोलावून आणलं होतं !–त्या वेळीं शिष्टाचार म्हणून मीं सांगितलं होतं, " मामी, घरांतली मुख्य आमच्या सर्वांचा आधार अशी आईच दुखणाईत झाल्यामुळं आम्हीं मोठ्या संकटांत आहों. तुम्ही आलांत, धीर आला मनाला. आम्ही श्रीमंत नाहीं, पण या वेळीं मी पैशाकडे पाहणारा मनुष्य नाहीं. आईला आराम वाटला म्हणजे झालं. तेव्हां आपलं घर समजून तुम्ही आम्हांला सांभाळून घ्या. काय हवं नको तें मी वेळचेवेळीं आणून देईनच. पण त्यांतून मनाच्या अस्वस्थपणामुळं मला सुचलं नाहीं तर तुम्ही सुचवा. पैशाच्या ठिकाणीं सव्वा पैसा लागला फिकीर नाहीं. पण संकोच करूं नका. मी चहा घेत नाहीं न् मला वेळीं अवेळीं खायलाहि लागत नाहीं. राजा न् बाबी सकाळीं दूध घेतात. तिसऱ्या प्रहरीं त्यांना भाकरी-आमटी

चालते. त्यांचा तुम्हांला त्रास न होईल याला मी जपेन. तुम्ही मात्र आपली अडचण करून घेऊं नका. तुम्हांला चहा-कॉफी काय लागत असेल तें सांगा. तुमचे उपास-तापास असल्यास ते सांगा. लागेल तें आणून देईन. मी नसलों–कामांत असलों–तर राजाला सांगत चला. किंवा आपले गडबडे वासूकाका आहेत त्यांना सांगा---"

तात्पर्य, मामी आमच्या संकटाच्या वेळीं आल्या आहेत तेव्हां त्यांची कोणतीच अडचण होऊं नये म्हणून मी शिष्टाचार पाळायला गेलों आणि मामींनीं त्याची बरोबर दिढी दुपटी केली !

आतां मला असं वाटूं लागलं : त्यापेक्षां पोटॅशियम सायनाइडची बाटली आणून आम्हीं सर्वांनीं घेतली असती तर !—आमचे सर्वांचे अंत्यसंस्कार सुखानें होतील, एवढी शिल्लक पोस्टल बॅंकेंत खात्रीनें राहिली असती.

पण आतां या शहाणपणाचा काय उपयोग होता ?

मी तटस्थ राहून मामीकडे पाहत असतां मामींना नवा आणा आठवला ! त्या एकदम म्हणाल्या, " हो, दोन शेर मुईमुगाचे दाणे आण न् तात्या, शिंगाडे इथं मिळत नाहीं म्हणालास नाहीं का ?–ते मिळाले असते तर बरं होतं. रताळ्याचं पीठहि मिळत नसेलच. जाऊं दे झालं. केळीं न् रताळीं आणवीन.–आतां वाण्याकडचं असं आणखी काय बरं ?–ध्यानांत राहील ना सारं ?–नाहींतर याद करून घे. इकडं जा तिकडं पळ अशी सारखी धांवपळ लागली आहे तुझ्या मागं ! त्यांतून तुझी प्रकृति ही अशी !–मला बाई भारी काळजी वाटते– "

खरंच होतं तें !–तात्याचं हार्ट मवांच फेल झालं होतं.

इतक्यांत खालीं कोणी आलं असावं असं म्हणत मामी सामान आणण्याचं पुन्हां एकवार बजावून तिथून चालत्या झाल्या.

मीं डायरी पाहिली, हिशेब बराबर होता.

जवळ शिल्लक ०||~|| होते.

आणि उधळमाधळ—? ? ?

हा पांढरा हत्ती घरांतून बाहेर कसा काढायचा ?–मीं चिडून डायरी उभ्या उभ्या टेबलावर फेकली आणि माडींत फिरूं लागलों. मामीचा गळा दाबून प्राण घेऊं का ?—

मनगटानें विचारलें, "पण तिचं रुंदावत चाललेलं नरडं तुला आवळतां येईल ?"

"मग अफू आणून चारतो !" संताप ओरडला.

"साडेनऊ आण्यांची पुरायची नाहीं–" गणितानें सांगितलें.

"शेजारच्या आडांत ढकलून देतों–" चिडीनें म्हटलें.

"बाटलीला बूच बसेल. लोकांची तक्रार येईल !" व्यवहार म्हणाला.

"रॉकेल ओतून पेटवून देतों–" चढलेला खून बोलला.

"पुन्हां पहिलीच अडचण. शिलकी तेल पुरायचं नाहीं." अदमास ओरडला.

मी चेकाळून ओरडलों, "मग काय, स्वतःचा जीव देऊं ?"

परिस्थिति म्हणाली, "सहज होण्यासारखी गोष्ट बोललास. पण मामींचा हत्ती घरांत राहणार तो राहणारच. त्याची वाट काय ?"

स्वतःच्याच झिंज्या उपटूं लागलों. इतक्यांत जिन्यांत कोणाची तरी चाहूल लागली. "पुन्हां नवा आणा कीं काय ?–" भयभीत होत मी थांबलों व दाराकडे पाहूं लागलों.

एका तरुणीची मुद्रा आंत झुकली. तिनें शांत स्वरांत प्रश्न केला, "बाबी कुठं आहे ?—तिला न्हायला कां नाहीं धाडली आज ?—"

## प्रसंग दुसरा : : : २

त्या तरुणीला पाहतांच मी कांहींसा चपापलों. क्षणमात्र मीं तिला ओळखलें नाहीं म्हटलें तरी चालेल. मी त्रासलों होतों. बेभान होतों. म्हणून मी रूक्ष स्वरांत उद्गारलों, " कोण आहे तें ? वर या ना ?—"

उरलेली पायरी चढून ती तरुणी वर आली. दाराजवळच्या भिंतीचा आधार घेत कांहीशा नवलानें ती मजकडे पाहत राहिली. मग मला ओळख पटली. मीं विमनस्कपणें म्हटलें, " कोण !–गोदावरी ?–तूं कां या वेळीं इथं ? "

गोदावरी एकदम संकोचली. ती सौम्य स्वरांत चाचरत म्हणाली, " बाबीला न्हाऊन बरेच दिवस झालेले दिसले, म्हणून तिला नेण्याकरितां आलें होतें–"

माझ्या डोक्यांत खून चढलेला असल्यामुळें आपण कोणाशीं काय बोलतों हें मला समजतच नव्हतें. म्हणून मीं नवल करीत म्हटलें, " ती पोरगी आठ दिवस नाहीं न्हायली तर तुमचं काय बिघडलं ?– न्हाईल, नाहींतर न न्हाईल. जगेल नाहींतर मरेल ! तुम्ही कां धडपडतां एवढ्या ? हें पहा गोदावरीबाई, मी तुम्हांला स्पष्ट सांगतों, तुम्ही माझ्या

घरीं वेळीं अवेळीं यावं हें मला बिलकुल पसंत नाहीं. जा पाहूं तुम्ही इथून. आणि पुन्हां मीं बोलावल्यावांचून इथं पाऊल घालूं नका. काय समजलं ?—" मी उजवा हात पुढें करून त्यांच्यावर तर्जनी रोखीत पुढें म्हणालों, "तुमचे आमचे ठरविलेले सारे संबंध मागेंच तुटले आहेत व ते पुन्हां जोडले जातील याची मला आशा नाहीं, खात्री नाहीं !—काय समजलं ?—तुम्ही तरुण आहां. कुमारिका आहां. माझ्या-सारख्या फटिंग तरुणाकडे तुम्हाला इतक्या मनमोकळेपणानं येणं शोभत नाहीं, जगाला तें पाहवत नाहीं. बरं वाटत नाहीं. तेव्हां तुम्हीं हें येणं अजिबात बंद केलं पाहिजे—"

गोदावरी मध्येंच म्हणाली, "जगाचं भय मला घालूं नका. त्याला मी मुळींच जुमानीत नाहीं, आणि तें काय म्हणेल याची पर्वाहि करीत नाहीं. तुम्हांला माझं येणं आवडत नाहीं असं म्हणा, मी येणार नाहीं. मागचे, आतांचे किंवा पुढचे कोणतेहि संबंध लक्षांत न घेतां, केवळ माणुसकीच्या दृष्टीनें मी राजा व बाबी यांच्याकडे पाहतें. तुम्हांला तें संकट वाटत असेल तर माझं कांहीं म्हणणं नाहीं. ही मी चाललें—" एवढें सडेतोड बोलून तिनें पाऊल उचललें. तोंच जिन्यांतून "तात्या हें बघ. तात्या हें बघ." अशी राजाची आरोळी ऐकूं आली.

मी व गोदावरी चपापून थबकलों. राजा हातांत एक लहानसें पातेलें घेऊन गोदावरीस धक्का देत आंत घुसला. तो थेट माझ्यापुढें आला व तें पातेलें माझ्यापुढें धरीत म्हणाला, "तात्या, हा पाहिलास त्या लठ्ठ मामीचा सांजा !–मला तूं खोटं पाडलंस. पण आतां प्रत्यक्ष घे पाहून ! दुपारीं बाबीला तुपाचा चमचा वाढायला या लठ्ठीचा हात मोडतो जसा ! तेंच हा सांजा बघ. तूप नुसतं गळतंय् त्यांतून !"

मी काय बोलणार ?–मनुष्य-स्वभावाचा एक अजब चित्रपट माझ्या दृष्टीपुढून सरकत होता. राजाचें वय लहान. अवघें दहा. पण त्यालाहि झालेल्या अन्यायाची अगदीं चीड आली होती. तो तेंच पातेलें गोदूताईकडे करीत म्हणाला, " पहा गोदूताई, तुम्हीच पाहून घ्या. खादाड ढमाली ! –रोज हा च्याबा सुरू आहे बरं का ?–मुकाट्यानं मांजरासारखं मटामट खात बसायचं !—आज अशी पकडली ! हडळ कुठली ! "

इतक्यांत—" मेल्या राजा—" असें ओरडत व धापा टाकीत मामी तिथें आल्या. दुसऱ्या क्षणांत त्यांनीं पुढें होऊन राजाच्या मुस्कटांत जोरानें ठेवून दिली व दुसऱ्या हातानें त्याच्या हातांतील पातेलें हिसकावून घेतलें !

अत्यंत संतापानें मारलेली त्यांची ती चपराक राजाला चांगलीच जाणवली. तो कोलमडून पडलाच असता. पण गोदावरीनें चपळाई करून त्यास सावरीत मामीस उद्देशून म्हटलें, " कांहीं शरम वाटते का जिवाला ?–"

मामी तिला वेडावून म्हणाल्या, " व्याटते कीं ! अवदसा कुठली ! तूंच तूंच सारं शिकवतेस असलं त्यांना !–" नंतर त्या मजकडे वळून म्हणाल्या, " तात्या, गंगेंत उभी राहून शप्पत देईन. देवावरचं फूल उचलून देईन !–तुमच्याकरितांच हें खायला केलवतं. मेल्यानं उगीचच कुभांड रचलं माझ्यावर !–कुठं झाडे फेडशील हे–" इत्यादि बडबडत त्या जशा घाईनें आल्या तशाच चालत्याहि झाल्या.

आम्ही सारीं माणसें पाहतच राहिलों.

मामी गेल्यावर राजा दात-ओंठ खात त्यांना अभद्र शिव्या मोजूं लागला. पण गोदावरीनें त्याच्या तोंडावर हात ठेवून ' तूं होळीवर उभा

आहेस का ? ' असें त्यास दरडावलें. नंतर तिनें त्यास मजकडे ढकलीत ' सांभाळा याला ' एवढें बोलून तेथून चपळाईनें गमन केलें.

मी तिला थांबविणार होतों. पण माझ्या तोंडांतून शब्दच उमटला नाहीं.

गोदावरी गेल्यावर राजा आपला गाल चोळीत चिडक्या स्वरांत म्हणाला, " तात्या, या खादाड शेरडीला आपल्या घरांतून हांकलून दे रे—अगदीं आजच्या आज—"

इतक्यांत एक कोमल स्वर आला, " तात्या, ताई गेली ?"

आम्हीं दोघांनीं चपापून तिकडे पाहिलें. पलीकडे बैठकीवर निजलेली बाबी उठून बसली होती. आतां झालेल्या गोंधळानेंच ती जागी झाली असावी.

राजा ताबडतोब आपला राग विसरला. बाबीवर त्याचा भारी लोभ होता. तो तिच्याजवळ गेला व ' आमची बाबी उठली का ? ' असें म्हणत त्यानें तिला कडेवर उचलून घेतलें.

मला आतां एकान्त हवा होता. म्हणून राजाला मीं बाबीसह खालीं जाण्यास सांगितलें. तो जाऊं लागल्यावर मीं त्यास बजावलें, " आपल्या या गोष्टी बाहेर कुठं बोलायच्या सांगायच्या नाहींत अं—"

राजानें नकारार्थी 'च्यॅक' असा आवाज काढला व तो बाबीला घेऊन गेला.

मी विचारांत पडलों—पुढें काय ? याच वेळीं मामींनीं आणून ठेवलेलें तुपाचें भांडें माझ्या दृष्टिक्षेपांत आलें ! मीं चिडून त्यालाच लाथ मारिली ! तें गडगडत व जातांना तुपाची धार सोडीत दूर गेलें.

मी डोकें चोळीत बैठकीवर जाऊन तक्क्याला टेकून पडलों.

## प्रसंग तिसरा : : : ३

घड्याळांत कांहीं ठोके पडलेले ऐकले. मी एकदम धडपडून उठलों. घड्याळ पाहिलें. आश्चर्यानें उद्गारलों, "आं !—पांच ! आईच्या औषधाची वेळ टळून गेली कीं—"

मी सरकन् खालीं आलों. आधीं चूळ भरली न् मग आईकडे वळलों. मन साधारण उद्विग्नच होतें. जातां जातां पाहिलें, राजा आंगणांत आकट-दुकट खेळत होता. मामी सायंकालीन गृहकृत्यांत दंग होत्या. बाबी ओटीवर चिमकुली मोटार घेऊन गाडी गाडी करीत होती.

मला पाहतांच मामींनीं आपली गृहकार्यनिष्ठा दाखवीत आईच्या मायेनें म्हटलें, "तात्या, बाहेर जाण्याच्या आधीं थोडं खाऊन घे बरं का !"

मी कांहीं न बोलतां आईच्या खोलीकडे गेलों.

आईची रुग्णशय्या माजघरास लागून असलेल्या एका आडव्या खोलींत होती. या खोलीस उत्तरेकडे दोन मोठ्या खिडक्या असल्यामुळें व बाहेर मोकळें परडें असल्यामुळें वाऱ्याचा त्रास न होतां उजेड भरपूर मिळत होता. खोलींत आईचें आंथरूण व तिच्या शुश्रूषेचें आवश्यक

सामान याविना दुसरी कोणतीहि अडगळ ठेवलेली नव्हती. खोलींत प्रकाश येऊं देण्याचें प्रमाण आईच्या इच्छेवर अवलंबून होतें. स्वच्छता ठेवण्यांत मी शक्य तितकें जपत होतों.

हलक्या पावलांनीं मी आंत आलों. जवळ जाऊन मच्छरदाणीच्या जाळींतून मीं एकवार आईच्या शीर्ण देहाकडे पाहिलें. स्वभावतः बळकट हाडापेराची धिप्पाड बाई. पण सहा महिन्यांच्या प्राणखाऊ दुखण्यानें तिचा पाचोळा झाला होता. तिच्याकडे पाहतांच मला तिचें पूर्वीचें रूप व आरोग्य आठवे व चालू स्थिति पाहून मनाचा थरकांप होई. व्याकुल मनाला वाटे : आतां अल्पावधींतच हा स्नेहदीप विझणार न् आम्ही मातृहीन होणार !—अरेरे !

अगदीं हलक्या हातानें मी मच्छरदाणीचें टोंक वर टाकलें न् अंथरुणाशीं बसलों. आईचे नेत्र मिटले होते. श्वास मंदगतीनें व कफाच्या आवाजांत चालला होता. छातीवर हात घेऊन व गुडघे वर करून अगदीं नित्राण अवस्थेंत ती पडली होती !

मीं एक मोठा सुस्कारा टाकला. ती चाहूल आईला लागली असावी. तिनें डोळे उघडून मजकडे पाहत मंद स्वरांत म्हटलें, "कोण ?–तात्या–" तिचा जीर्ण कांपरा हात माझ्या मांडीवर येऊन पडला. ती व्याकुळतेनें म्हणाली, "तात्या, तुझी आई आतां जगत नाहीं बरं. दिव्यांतलं तेल संपलं आतां !–रामराया—सोडवा आतां !" ती कण्हूं लागली.

माझा ऊर भरून आला. पण कसें तरी संयमन करीत मीं म्हटलें, "औषध घेतेस ना ?–उठवत नसेल तर नको उठूंस. चमच्यानं पाजतों हळूंहळूं."

आई निषेधाचा हात झाडीत म्हणाली, " कशाला आतां औषध-पाणी !–वीष आणून दे थोडंसं–" एवढें बोलत ती कुशीवर होऊन उठण्याचा प्रयत्न करूं लागली. मीं तिला श्रम न घेण्याबद्दल बजावलें. पण तिनें न ऐकतां कण्हत कुंथत उठण्याचा प्रयत्न केला. माझ्या हाताचा आधार घेत ती उठून बसली. ती म्हणाली, " तात्या, पडून पडून तरी चैन पडतं कारे ! खटं पडण्याची वेळ आली—"

नंतर मीं तिला औषध दिलें व आठ-दहा मिनिटें गेल्यावर मोसंब्याचा रसहि काढून दिला. त्यामुळें तिला थोडी हुशारी वाटूं लागली. तिनें आपला लुला हात माझ्या पाठीवरून फिरवीत आशेनें विचारिलें, " तात्या मला बरं वाटेल का रे ?—"

मी मुद्दाम हंसत म्हणालों, " हो. डॉक्टरनीं सांगितलंच आहे कीं, पंधरा दिवसांत लख्ख बरं वाटेल म्हणून. पुढं महिन्याभरांत शक्ति येईल—"

आईला हें मुळींच खरें वाटलें नाहीं. ती म्हणाली, " कुठलं बरं वाटणं न् कुठली शक्ति घेऊन बसलास तात्या !—पंधरा दिवसांत आम्ही राम म्हणणार ! अन्न तुटलं. शरीर झिजत चाललंय् ! त्राण आहे का कांहीं त्यांत—"

तिच्या बोलण्यांत सारें सत्यच असलें तरी मला तें ऐकवलें नाहीं. मी मग दुसरें बोलणें काढण्याच्या निमित्तानें बाबीच्या लीलांची गोष्ट काढली. त्याबरोबर आई म्हणाली, " खरंच तात्या, माझं तें वासरूं कुठं आहे रे ?–मला त्रास द्यायचा नाहीं असं तूं परवां बजावलंस ना ?–तेव्हांपास्न अगदीं जवळ येत नाहीं बघ. किती गुणाची आहे रे !–"

बोलतां बोलतां तिला आंतून उमाळा आला !–ती कांहीं क्षण अगदीं गप्प बसली. नंतर घोगऱ्या दबलेल्या स्वरांत म्हणाली, " तात्या, दोन्ही खिडक्या टाक उघड्या. आन् राजा–बाबीला आण माझ्याजवळ. त्यांना पाहून घेतें एकदां डोळाभर–"

मी एकदम अस्वस्थ झालों. कारण, यांतून एक अत्यंत कारुणिक असा देखावा निर्माण होणार होता. आईच्या प्रकृतीला तो बाधक व राजा-बाबीच्या बालमनावर मोठा आघात करणारा होता. म्हणून मीं थोड्या रूक्षतेनेंच म्हटलें, " काय पहायचंय् त्यांना ! घरांत आहेतच कीं तीं. उगीच त्यांना जवळ बोलावून रडूं रडूं करायचं. त्यामुळं तीं गांगरतात, न् मग त्यांची समजूत करणं मला जड जातं."

आईनें अत्यंत केविलवाणें माझ्याकडे पाहिलें. ती म्हणाली, " बरं–तुझी मर्जी–" पण त्या उद्‌गारांत तिचें सारें हृदयच पिळवटून गेलें होतें. माझ्या रूक्षपणाची मला लाज वाटली. मी सौम्य स्वरांत म्हणालों, " आई, मी आणतों त्यांना बोलावून. पण किनी–" पुढें कांहीं न बोलतांच मीं खिडक्या उघड्या टाकल्या आणि नंतर बाहेर येऊन राजा-बाबीस आंत बोलाविलें.

तीं दोघें मुकाट्यानें आंत आलीं. आईनें त्यांना आपल्याजवळ बोलावलें व मींहि त्यांना जवळ जाण्याविषयीं सुचविलें. मीं मच्छरदाणी आणखी वर टाकली.

आईनें त्या दोघांना आपल्या दोन्ही हातांशीं घेतलें व त्यांना ओढून धरलें. त्या वेळीं आईला काय वाटलें किंवा त्या दोघांची मनःस्थिति काय झाली हें मला सांगतां नाहीं येणार. मला मात्र हुंदका आला. मी खिडकीजवळ जाऊन बाहेर पाहूं लागलों.

इतक्यांत आईचे शब्द ऐकूं आले—" राजा, हा तुझा गाल कशानं रे सुजलाय् पाहूं–" मीं चपापून तिकडे पाहिलें. खरेंच !—बोटाचे वळ उठून गाल चांगलाच सुजला होता !–आई नीट पाहत म्हणाली, " बोटं उठलेलीं दिसतात !—राजा, तुला मारलं वाटतं कुणीं ?–" आणि तिनं संशयानं माझ्याकडे पाहिलें.

राजा गोंधळून माझ्याकडे व मी त्याच्याकडे पाहूं लागलों. आईच्या संशयास बळकटी येण्यास एवढा पुरावा बस्स होता.

माझ्याकडे क्रूर दृष्टीनें पाहत आई म्हणाली, " तात्या, तूं मारलंस हें ? "–शंकाच नको. पुरुषाचा हात स्पष्ट दिसतो आहे !—छान ! छान ! माझ्या डोळ्यांचं पारणं फेडलंस बरं बंधुप्रेम दाखवून—

राजा एकदम म्हणाला, " अग पण आई, तात्यानं मला मारलं नाहीं !–आणि तो सूचनार्थ माझ्याकडे पाहूं लागला. पण मी काय सांगणार ?—वास्तविक खरी गोष्ट सांगण्यास कांहींच अडचण नव्हती. पण नंतर त्याची कारणपरंपरा कशी समजून द्यायची ?–खरोखर मी हतबुद्धच झालों !

आणि या आमच्या स्थितीनें आईच्या संशयानें पक्कें मूळ धरलें !

बाळाला दुखवल्यानंतर आईला किती चीड–संताप येतो व तिला अपराधी माणसाचा किती तिटकारा वाटूं लागतो, हें वर्णन करून सांगतां येणार नाहीं. आई आतां त्या दृष्टीनें मजकडे पाहूं लागली. मी तिचा मुलगाच. पण ती गोष्ट तिच्या स्मरणांतून अगदीं गेली. त्यांत ती आजारी. तिला सारासार विचार सुचणें अशक्यच होतें.

खाऊं कीं गिळूं अशा आविर्भावानें ती कांहीं क्षण मजकडे पाहत

राहिली आणि नंतर म्हणाली, " तात्या, माझ्या खस्ता खातां खातां तूं इतका कंटाळला होतास, तर मला वीष घालून मारून टाकायचं होतंस; पण माझ्या या पाडसाला तूं कां दुखवलंस सांग ?–कसाया, किती निष्ठुरपणानं मारलंस रे !–हात कसे झडले नाहींत तुझे—"

मीं पाहिलें. आतां तो भडका वाढत जाणार होता. मीं मुकाट्यानें राजाला बाबीसह तेथून जाण्यास खुणविलें !–लहान मुलें किती शहाणीं न् धोरणी असतात ! त्यांना माझी खूण पटली. तीं चटकन् तेथून निसटलीं. माझ्यावर आग पाखडावयाची असल्यामुळें आईला त्यांचें जाणें उमगलें नाहीं. तीं गेल्यावर मीं शांतपणें म्हटलें, " आई, तुझी शपथ घेऊन सांगतों, मीं राजाला हात लावला नाहीं. तूं भलताच संशय घेऊन संतापूं नकोस. तुझ्या प्रकृतीला–"

परंतु संशयानें खवळलेल्या आईनें मला पुढें बोलूंच दिलें नाहीं. ती म्हणाली–" तर–तर. माझ्या प्रकृतीची केवढी काळजी–" आणि नंतर तिनें माझ्यावर सरळ शस्त्र धरलें ! सबंध आयुष्यांत माझ्या वडिलांनीं व आम्ही जाणत्या मुलांनीं तिला मुळीं सुख दिलें नाहीं. उलट तिला सारखें छळून घेतलें.–हा त्याचा मुख्य रोख होता.

मी काय बोलणार ?–मी अपराधी ठरलों असल्यामुळें मी जें कांहीं बोलेन तें माझ्या विरुद्धच जाणार होतें. खिडकीशीं उभा राहून मी तो मारा सहन करूं लागलों. मला माहीत होतें कीं, या वेळीं खोलीच्या बाहेर भिंतीशीं लागून एक मांजरी हा सारा प्रकार ऐकत होती !

या वेळीं ती साव न् मी चोर होतों.

## प्रसंग चवथा : : : ४

रात्र वाढत चालली होती व भोंवतालचें जग झपाट्यानें शांततेच्या आवरणाखालीं जात होतें. मी मात्र एका कंटाळवाण्या पुस्तकाचें वाचन करीत झोंपेच्या आराधनेंत मग्न होतों. अंथरुणावर पडल्या पडल्या शरीराला अनेक वळणें देत व वरचेवर उशागतचें वड्याळ पाहत मी निद्राधीन होण्याची पराकाष्ठा करीत होतों. परंतु अकरा वाजून गेले तरी मन शांत होईना. डोळ्यांत झोंप तरंगेना. शेवटीं वाचनाचासुद्धां कंटाळा आला, तेव्हां पुस्तक बाजूला टाकलें. शेजारीं झोंपलेल्या राजाला नीट पांघरूण घातलें. कुशींत झोंपलेल्या बाबीला सरळ निजवून स्वतःला जागा केली. नंतर दिवा बारीक करून बाजूला सारला आणि आडवा झालों.

शेजारच्या खोलींत आई होती. ओटीवर मामी डाराडूर घोरत होत्या. आईला झोंप लागली होती कीं ती मुकाट्यानें पडली होती, हें कळण्यास मार्ग नव्हता. मधून मधून तिचा जड खोकला व कण्हत होणारा श्वासोच्छ्वास ऐकूं येत होता.

माझ्या डोक्यांत विचारांची बेबंदशाही सुरू होती. कुठेंहि मन स्थिरावत नव्हतें. कशांतहि निश्चितपणा वाटत नव्हता. पैशाची

ओढाताण, मामींचा पांढरा हत्ती, राजानें पकडलेली चोरी, गोदावरीशीं झालेला माझा तुसडेपणा आणि आईच्या मनांत निर्माण झालेला संशय या प्रमुख गोष्टींतून मन असें सैरावैरा धांवत होतें,- जणूं काय कोणीतरी आसूड घेऊन त्याच्यामागें लागलें आहे. पण सर्वांत मला विशेष खेद होत होता—आईच्या मनांतील संशयाचा. त्याचा उद्भव सहज झाला, पण त्याला नाहींसा कसा करावयाचा हें माझ्यापुढें मोठें कोडें होतें.

मला हें सांगितलें पाहिजे कीं, आमची आई मासिकांत फोटोसह चरित्र देण्याइतकी कोणी आदर्श माता नव्हती किंवा मीहि कोणी मोठा मातृभक्त असा पुत्र नव्हतों. सर्वसाधारण कुटुंबांत आढळून येणाऱ्यांपैकींच सामान्य माणसें आम्ही; तरीपण आमच्यांत प्रेमभाव वसत होता ही गोष्ट नक्की. मला आई नकोशी झाली होती किंवा आईला मी राक्षस भासत होतों असा भाग मुळींच नाहीं. आजलाहि माझी खात्री आहे कीं, आरोग्यावस्थेंत आई असती तर तिनें आधीं निष्कारण संशय घेतलाच नसता. आणि समजा घेतला असता तर ?–मला त्याचा एवढा बाऊ वाटला नसता. मीं ती गोष्ट थट्टेवर उडवून लावली असती किंवा आईला आणखी चिडविण्यास उद्युक्त झालों असतों.

पण संशय निर्माण झाला तो प्रसंग मात्र मोठा करुणाजनक होता. रोगानें जर्जर केल्यामुळें आईमध्यें कसलेंच त्राण राहिलें नव्हतें. ती जितकी निर्बल होती, तितकीच मनानें हळवी बनली होती. तिचा मृत्युकालहि जवळ जवळ निश्चित होता. अशा स्थितींत तिच्या हळव्या मनाला प्राणांतिक यातना होण्यासारखा तो प्रकार घडला. मी अपराधी नसतां तिच्या मनानें मी तसा ठरलों. याच दुर्दैवी स्थितीचा मला खेद वाटूं लागला. आपल्या पश्चात् आपल्या धाकट्या मुलांची धडगत नाहीं अशी समजूत असतांनाच जर आईला मृत्यु आला तर ?–या शंकेनें मला भारी व्याकुळ केलें.

आणि या अशा मनापुढेंच गतकालांतील भिन्न भिन्न स्मृतिचित्रें येऊं-जाऊं लागलीं. वाटलें, अववें सत्तावीस वर्षांचें वय. त्यांतील दहा वर्षांचा बाल्यकाल वजा घातला तर उरलीं सतरा वर्षें! पण एवढ्या अल्पकालांत आपण किती विचित्र अनुभव घेतले, कसकशा प्रसंगांतून गेलों, आणि मनुष्यस्वभावाचे किती अजब नमुने पाहिले? अद्याप बायको नाहीं, मुलें-बाळें नाहींत, संसार नाहीं तों ही अवस्था; मग प्रत्यक्ष संसारांत पडल्यावर आपली वाट तरी काय होणार? बस्स्. हे अशा धर्तीचे अनेकविध विचार मनांत नाचूं लागले आणि त्यांनीं मनाचा चोरबाजार बनविला.

तो सारा गोंधळ वर्णन करीत बसण्याची आवश्यकता नाहीं म्हणून मी माझी सत्तावीस वर्षांची कारकीर्द सूत्ररूपानें नोंदतों.

इ. स. १९०४ सालीं माझा जन्म झाला. मातापित्यांचा मी दुसरा मुलगा. माझा थोरला भाऊ वामन. हा माझ्यापेक्षां चार वर्षांनीं वडील होता. स्वभावानें हा चांगला होता. पण वडिलांच्या चमत्कारिक स्वभावानें त्या दोघांचें पटलें नाहीं. वामनदादा आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षीच घर सोडून परागंदा झाला होता. स्वारी जगाच्या पाठीवर काय करीत होती, हें त्याचें त्याला माहीत. दोन-तीन वर्षांनीं एखाद्या धूमकेतूप्रमाणें तो अकस्मात् घरीं येई. चार दिवस काढी. वडिलांचें त्याचें भाषण यथातथाच होत असे. पण आपल्या आईशीं व भावंडांशीं तो प्रेमानें व मोकळ्या मनानें वागे. त्याच्याजवळ कधींमधीं पुष्कळ पैसेहि असत. त्या वेळीं त्याचें वर्तन एखाद्या धनाढ्याप्रमाणें असे. त्याच्या श्रीमंतीचें आम्हांला कोडें होतें व वडिलांना संशय येई. परंतु त्यापासून कधीं उपद्रव निर्माण झाल्याचें आढळून आलें नाहीं.

वामनदादा मला बरोबरीच्या नात्यानें वागवी व 'माझ्याप्रमाणें तूं उडाणटप्पू बनूं नकोस!' असें स्नेहपूर्वक सांगे. त्याच्या श्रीमंतीविषयीं मीं प्रश्न काढल्यास तो हंसून ती गोष्ट उडवून लावी. एकदां मी त्यास म्हणालों, "असं वागतां वागतां कुठं संकटांत सांपडूं नकोस म्हणजे झालं. निदान आईबाबा असेपर्यंत तरी जप. तुझ्या वर्तनानं त्यांच्या जिवाला यातना होऊं नयेत. माझ्या स्पष्ट बोलण्यावर रागावूं नकोस. मनांत येतं तें मी तुला सांगितलं."

वामनदादा न रागावतां माझ्या पाठीवर थाप मारून म्हणाला, "अगदीं मान्य तुझा उपदेश. हें पहा तात्या, माझा आयुष्यक्रम वंद्य नाहीं ही गोष्ट निश्चित; पण त्यामुळं माझ्यावर किंवा माझ्यामुळं तुमच्यावर कांहीं संकट येईल असं मात्र मला बिलकुल वाटत नाहीं. तात्या, या जगांत कांहीं पुण्यपुरुष असतात. तसेच कांहीं पण्यपुरुषहि असतात. या दुसऱ्या वर्गांतला मी आहें. माझ्यावर संकट आणायचं झाल्यास दुसऱ्याला आधीं आपल्या अब्रूवर निखारे ठेवावे लागतील." त्याला आणखी पुष्कळ बोलावयाचें असावें असें दिसलें; पण तो मध्येंच थांबला व हंसत म्हणाला, "जाऊं दे तात्या. हा विषय तुझ्या मर्यादे-बाहेरचा आहे. तुला संसारी व्हावयाचें आहे. तेव्हां त्याची चर्चा तुझ्याजवळ कशाला?—मी तुला एवढें वचन देतों कीं, माझ्या जीवन-क्रमांतील बऱ्यावाईट गोष्टींचा कोणताहि संबंध तुमच्यापर्यंत येणार नाहीं. माझीं सुखंदुःखं माझ्यापुरतींच राहतील. माझ्याकडून तुम्हांला झाला तर उपाय होईल, अपाय होणार नाहीं." आणि या भाषणानंतर आमचा हा पण्यपुरुष अंतर्धान पावला. त्यानंतर पण्यपुरुष याचा अर्थ कळण्यास मला कितीतरी दिवस लागले!

असा आमचा वामनदादा होता. माझ्या आयुष्यांत त्याचें थोडेंसें

महत्त्व आहे म्हणून त्याच्यासंबंधीं इतकें लिहिलें. आतां इतर भावंडां-विषयीं थोडक्यांत पाहूं.

वामनदादापासून बाबीपर्यंत आमच्या आईला एकंदर दहा मुलें झालीं. पैकीं पांच कृष्णार्पण झालीं. पांच जिवंत होतीं. वामनदादा-संबंधीं वर सांगितलेंच. त्यानंतर मी. या प्राण्याची माहिती हळूंहळूं कळणारच आहे. यानंतर वीस वर्षांची ताई नांवाची बहीण. हिचा विवाह एका तिरशिंगरावाशीं झाला होता. जांवई या नात्यानें त्यांना सासुरवाडीकडून मिळावा तसा खुराक न मिळाल्याचा त्यांचा आरोप होता व त्यामुळें ते आमच्यावर एवढे रुष्ट होते कीं, त्यांनीं ताईचें माहेर अजीबात बंद केलें होतें. म्हणजे वामनदादा त्या तऱ्हेनें व ताई या तऱ्हेनें आम्हांला जीवन्मृत झालीं होतीं. राहिलीं राजा–बाबी. हे अंकुरच होते. यांच्यासंबंधांत मला एक ध्यानांत ठेवण्यासारखा अनुभव आला होता. आई आजारी पडून अंथरुणाला खिळतांच त्या दोघांचें आपसांत फार प्रेम जमलें होतें व माझ्याशीं वागण्यांत तीं भारीं सालस, चतुर व उपयुक्त झालीं होतीं. यावरून मला वाटतें कीं, कुटुंबांत कांहीं संकट निर्माण झालें तर त्यांतील लहान अंकुरांना विशेष शहाणपण येत असावें.–आपल्यावरील जबाबदारी त्यांना समजूं लागत असावी.

राजा-बाबींतील हा फरक जों जों मला जाणवूं लागला तों तों मला त्यांच्याविषयीं विलक्षण आपुलकी वाटूं लागली. मला कितीहि त्रास झाला किंवा मनःस्वास्थ्य नसलें तरी मी त्यांच्याशीं प्रेमानें व शांतपणानें वागण्याचा कसून प्रयत्न करीं. यामुळें आमचें तिघांचें चांगलें मेतकूट जमलें होतें. अशी वस्तुस्थिति असतां दैवदुर्विलास असा कीं, आईला संशय आला होता कीं, मी माझ्या भावंडांना नीट वागवीत नाहीं व त्यामुळेंच आपल्या पश्चात् त्यांची धडगत नाहीं !

## प्रसंग पांचवा : : : ५

आमचें राहण्याचें गांव सांगावयाचें तसेंच राहिलें. मला समजूं लागल्यापासून मला आठवतें कीं, आम्ही कृष्णाकोयनेच्या प्रीति-संगमावर वसलेल्या कऱ्हाडक्षेत्रीं राहत होतों. या गांवीं आमचे बाबा—लखूनाना सबनीस—कोणता व्यवसाय करून आपला संसार चालवीत होते याची मला नीटशी कल्पना नाहीं. पण ते लोकप्रिय होते व आमच्या घरीं माणसांची वर्दळ बरीच असे. यावरून ते **हरहुन्नरी व बेरोजगारी** असावेत. कुणाचे कुलमुखत्यार, कुणाचे अडत्ये, केव्हांतरी व्यापारी, तर केव्हां सार्वजनिक पुढारी अशा त्यांच्या अनेक भूमिका असत. साताऱ्यास त्यांच्या खूप खेपा होत. दोन-तीन श्रीमंत व प्रतिष्ठित लोकांकडे त्यांचें बरेंच जाणेंयेणें असें. यामुळें त्यांची सांपत्तिक अवस्था नेहमीं 'हिंदोळ्यावर' असे. कधीं त्यांच्या हातांत असा पैसा खेळे कीं जणूं काय ते गर्भश्रीमंतच आहेत असें वाटावें. त्या वेळीं तेहि मोठ्या उमरावी पद्धतीनें राहत. घरांत वस्त्रालंकार व नोकरचाकर, यांची गर्दी होई. पैपाहुण्यांची प्रतिष्ठा वाढे. आमचे विलक्षण लाड होऊं लागत. आई बाईसाहेब, वहिनीसाहेब, काकीसाहेब या पदावर चढे आणि बाबांना क्षणाची फुरसत नसे. माझी मुंज व ताईचें लग्न या अशा

भरतीच्या वेळीं झालें. त्यामुळें मला वाटे कीं, आपल्या आयुष्यांत मोठी मजा आहे. आपण कोणी विशेष आहों.

या अशा भरतीच्या वेळीं, आई बाबांना म्हणे कीं, 'आपण आतां एखादें घर घेऊं या किंवा जागा घेऊन नवीन बांधूं या. थोडी शेत-वाडीहि करूं या. म्हणजे स्थाईक होऊं.' पण बाबा दुर्व्यसनी नसतांहि जुगारी असल्यामुळें त्यांना आईचा उपदेश कधींच पटला नाहीं. अर्थात् भरती संपली कीं, आमची श्रीमंती ओसरूं लागे. आमचे सारेच वडेजाव कमी होत आणि आमचें कुटुंब लोकांना एक करमणुकीचा विषय होई. अशा वेळीं बाबा खूप चिडखोर व फटकळ बनत. आणि मग त्या खवळलेल्या समुद्रांतून आपली संसारनौका धडपणें तारून न्यावयाची खरी जबाबदारी आईवरच पडे. दादा परांगदा झाला व ताईचा नवरा आमच्यावर रुसला तो या अशा ओहोटीच्या वेळीं. आईनें मवा माझ्या-वर गहजब करून मला राक्षस ठरविलें, तें मागच्या या इतिहासाच्या आधारावर. संसारांत तिला सुखादुःखाचे झटके बसले ते या पद्धतीनें.

बाबांच्या वरील प्रकृतिधर्मामुळेंच माझ्या शिक्षणाची बरीच हेळसांड झाली. तरी मी अठराव्या वर्षी मॅट्रिकला बसलोंच. आईला मोठें कौतुक वाटलें. ती म्हणाली, "तात्या, तूं तरी चांगला शिकून डॉक्टर, वकील, मोठा अंमलदार हो रे !" मला तसली कांहीं महत्त्वाकांक्षा नव्हती असें थोडेंच आहे ! पण अभ्यासाची हेळसांड झाल्यामुळें मीं परीक्षेंत गोता खाल्ला. त्याबरोबर ओहोटीच्या तावडींत सांपडलेले बाबा खूपच खवळले. आणि तो त्यांचा राग पाहून मला वामनदादाप्रमाणेंच घर नकोसें झालें. मीं मुकाट्यानें नाटकमंडळींत जाण्याच्या उद्देशानें एके दिवशीं कऱ्हाड सोडलें. त्या वेळीं साताऱ्यास × × × ही नाटकमंडळी होती. आम्ही तिच्या दाराशीं जाऊन उभे राहिलों.

त्या वेळीं नाटकमंडळीला नव्या मुलांची आवश्यकता होती कीं नाहीं मला माहीत नाहीं; पण माझी चांचणी घेण्याकरितां मला '**आबां**'च्या-कडे धाडण्यांत आलें.

एका दोन खणांच्या खोलींत आबांची बैठक होती. त्यांचें वय पन्नासच्या सुमारास असावें. एखाद्या सुखवस्तु गृहस्थाप्रमाणें त्यांचा चेहरा व पोशाख होता. स्वारी पानतंबाकू खात बसली होती. बाजूला पिकदाणी, समोर विड्याच्या सामानाचें तबक आणि एका बाजूला विसकटून पडलेलीं वर्तमानपत्रें-अशा थाटांत त्यांनीं माझें स्वागत करून मला बसण्यास सांगितलें. भीति व उत्सुकता यांनीं मी बराच गांगरून गेलों होतों. मी मुकाट्यानें आंखडून बसलों. पण मनाला मात्र असें वाटूं लागलें कीं, आपण इकडे न आलों असतों तर बरें झालें असतें.

आबांनीं एकवार माझ्याकडे पाहिलें. नंतर त्यांनीं आपली चाळशी शोधून ती डोळ्यांवर चढविली. मग सुपारी कातरीत मला विचारिलें, "तुम्ही कोठून आलां ?"

"कऱ्हाडाहून—"

"नांव काय ?"

"दामोदर लक्ष्मण सबनीस."

आबांनीं माझ्या नांवाचा पुनरुच्चार करीत विचारिलें, "म्हणजे ?-आमच्या लखूनाना सबनिसांचा मुलगा कीं काय तूं ?-"

मी एकदम हबकलों !-सफाईनें खोटें बोलण्याची मीं कसलीच तयारी केली नव्हती. मला रुकार देणें भाग होतें. माझा रुकार ऐकून आबा हंसले. पानाला चुना लावीत ते म्हणाले, "यंदां परीक्षेंत नापास झाला आहेस वाटतं ?—कारण, त्याशिवाय हा मार्ग सुचायचा नाहीं. तरी बरं. जीवबीव देण्याचा विचार नाहीं केलास !"

मी वाट पाहीन !

मी नेमका अडकलों. चोरानें चोरीचा माल पडत्या भावानें विकण्याकरितां फौजदाराकडे न्यावा तसा प्रकार झाला. पुढें काय होणार ? या भयानें मी घामाघूम झालों. पण आबा खरोखर मोठे चांगले व प्रेमळ गृहस्थ होते. त्यांनीं मला उगीच छेडलें नाहीं किंवा माझी अवहेलनाहि केली नाहीं. त्यांनीं मला ठेवून घेतलें आणि मुद्दाम दूर फिरण्यास नेऊन वस्तुस्थिति नीट समजावून सांगितली. 'हा मार्ग तुझ्यासारख्या सालस व सभ्य कुटुंबांतील मुलाला योग्य नाहीं. शिवाय त्यांत द्रव्य मिळण्यासारखी परिस्थितीहि राहिली नाहीं. या मंडळींत मी पेटी वाजविण्याचें काम करतों, तालमी देतों व माझी चवथ्या हिश्श्याची मालकीहि आहे. असें असून मला जेमतेम पन्नास-पाऊणशें रुपये मिळतात. दगदगीच्या मानानें हा पगार कांहींच नव्हे. पुन्हां समाजांत प्रतिष्ठा नाहीं व धंद्याची शाश्वती नाहीं.' इत्यादि गोष्टी त्यांनीं मोठ्या कळकळीनें सांगितल्या.

तेव्हां मग मींहि त्यांना आपली स्थिति थोडक्यांत सांगितली. आबांची व नानांची बरीच जानपिछान असावीसें दिसलें. त्यांनीं मजबद्दल बाबांच्याजवळ वकिली करण्याचें ठरविलें. चार-आठ दिवसांत नाटकमंडळी कऱ्हाडास जाणारच होती. म्हणून त्यांनीं मला तितके दिवस ठेवून घेण्याचें योजून बाबांना तसें पत्र टाकलें.

नवल असें कीं, बाबा दुसरेच दिवशीं धांवत आले. थोरल्या मुलाचें अनुकरण दुसऱ्यानें केलेलें पाहून व आईच्या टोंचणीनें त्यांना स्वतःची चूक कळून आली होती. त्यांचा राग मावळला असून त्याची जागा पुत्रवात्सल्यानें घेतली होती. या फरकामुळें माझें भय नाहींसें झालें व आबांची वकिलीहि लागू पडली. नंतर माझ्यासमक्षच त्या दोघांचें पुष्कळ बोलणें झालें. त्यांत आबा म्हणाले, "हें पहा लखूनाना, तुम्ही आतां उगीच फारसा विचार करूं नका, व जें आपल्यास न साधेल त्याच्या-

बद्दल हळहळूं नका. ब्राह्मणांना काळ आलेला आहे वाईट. ते बी. ए., एम्. ए. होऊं द्यात, नाहीं तर आणखी रँगलर, बालिस्टर होऊं द्यात. त्यांना मानापानाच्या नोकऱ्या मिळण्याचे दिवस संपले. तेव्हां उगीच मृगजळाच्या नादीं न लागतां काळवेळ पाहून मार्ग काढला पाहिजे. म्हणून मी सांगतों तुम्हांला. तुम्ही तात्याला शिंपीकाम शिकवा. वर्षसहा महिन्यांत तो तयार होईल व घरबसल्या पोटापुरतें मिळवूं लागेल. मी पहा ना–आमच्या विठ्याला असाच गुंतवला आहे. शाळेंत त्याचं जमेचना. त्यांत आमचं कुटुंब वारलं. साराच घोटाळा झाला. आम्ही असे बारा गांव धुंडीत फिरणार. मग विचार केला–कुठं तरी स्थाईक झालं पाहिजे. हो ! आम्हांला मुलं दोनच. विठ्या न् गोदी. विठ्या आहे वीस-एकवीस वर्षांचा. गोदीला मला वाटतं, अकराबारा कांहींतरी आहेत. ती आहे बुद्धिमान् व चुणचुणीत. तिच्या नांवाचा एक लग्नाचा विमा असतांना तो उतरला आहे हजाराचा. ती सोळा वर्षांची झाली कीं, ते पैसे मिळतील. म्हणजे तिच्या ऋणांतून मी सुटल्यासारखाच आहें. राहिला आमचा विठोबा ! त्याला दोनचार मार्ग दाखविले. पण उनाड व मंदबुद्धि ! आपल्याला कळायचं नाहीं न् वडिलांचं ऐकायचं नाहीं. शेवटीं हो ना करतां शिंपीकाम शिकण्याचं त्यानं मान्य केलं. आमचा एक आतेभाऊ पुण्यास नामांकित शिंपी आहे. मोठं दुकान आहे त्याचं. चारपांच माणसं हाताखालीं आहेत. त्याच्याकडे विठ्याला दिला आहे. आमच्या भिमाक्का तुम्हांला माहीत आहेतच. त्यांना धरलं आहे हाताशीं. आमच्या दोन्ही मुलांना घेऊन त्या पुण्याला राहतात. मी मधून मधून फेरी मारून येतों. आहे त्यांत ठीक जमलं आहे. काय म्हणालांत ? आमची पेटीवादनाची विद्या ना ?–विठ्याला त्याची नाहीं गोडी. गोदीला आहे तो नाद. वयाच्या मानानं तिनं बरंच

उचललं आहे. पण मी जवळ नसल्यानं विशेष उपयोग होत नाहीं. ती जाते शाळेंत. इंग्रजी दुसरींत आहे. ती हुशार आहे हो. मला तिची बिलकुल काळजी नाहीं. रूपानंहि बरी आहे. ती वयांत येतांच तिचं कुठंहि जुळून जाईल.........सांगायचं तात्पर्य तुम्ही तात्याला असा कुठं तरी गुंतवा."

बाबांच्या वैभवकालीं माझ्यासंबंधांत अशी कांहीं योजना कोणीं त्यांच्यापुढें मांडली असती तर त्यांनीं त्या योजकाची चांगलीच टवाळी केली असती. आणि मलाहि पण तो मोठा अपमान वाटून मी त्याच्यावर चिडलों असतों.

आम्हां दोघां पितापुत्रांची इच्छा व महत्त्वाकांक्षा म्हणजे मामलेदार-मुनसफ होण्याची. आणि ही गोष्ट प्रत्यक्षांत येणें म्हणजे हातचा मळ, अशीच आमची दोघांची खातरी!—पण पुढें दुर्दैवी परिस्थितीनें बाबांना व परीक्षेच्या अपयशानें मला थोडें थोडें शहाणपण शिकवलें होतें. म्हणून आबांची सूचना बाबांना एकदम मान्य झाली. ते म्हणाले, "मग आबा, तुमच्या विठ्ठलाबरोबर आमच्या तात्याला घ्यानात. शिकूं द्या लेकाला शिंपीकाम. मी त्याच्या अन्नवस्त्राची व्यवस्था करतों कशीतरी. वर्ष दोन वर्षांत होऊं द्या तयार–"

शिंपीदादा होण्याची माझी विशेष इच्छा नव्हती. पण अभ्यासाचा त्रास नाहीं व पुण्यास राहण्यास सांपडणार–एवढ्या मोहानें मी त्या योजनेस कबूल झालों.

एक महिन्याच्या अवधींत मी पुण्यास आलों व विठोबाचा सहकारी बनलों.

## प्रसंग सहावा : : : ६

शिवणकामाची दीक्षा घेतल्या दिवसापासून मला मनुष्यस्वभावाच्या नव्या गमती कळूं लागल्या. पहिला अनुभव आमच्या नव्या गुरुजींचा. वास्तविक त्यांचें दुकान भरभराटींत होतें. पण त्यांना आपल्या धंद्यांत कांहींच राम वाटत नव्हता. (यामुळें त्यांचा लांबट चेहरा बहुश: आंबट असे.) आबा–बाबांसारखीं माणसें आपल्या मुलांना इकडे कां पाठवितात याचें त्यांना मोठें नवल वाटे व तशी ते अशा लोकांना सूचनाहि देत. पण आमच्यासारख्या गरजूंना त्याचें काय होय ?–त्यांच्या म्हणण्याला हुंकार भरीतच आम्ही त्यांच्या गळ्यांत पडलों ! मग ते तरी कशाला नकार देतील !—आणखी एक पोऱ्या त्यांना फुकटांत राबायला मिळत होता. त्यांनीं कसलीहि जबाबदारी न पत्करतां मला आश्रय दिला व मी शिकूं लागलों.

पहिल्या सहामाहींत मी काय शिकलों ?–शिवण्याचें यंत्र मी ओळखूं लागलों. शिंपीकामांतील कात्री खूपच मोठी असते, अंगुस्तान मोठ्या (मधल्या) बोटांत घालतात व बॉबीन नांवाचा एक पदार्थ आहे–याहि गोष्टी मला कळूं लागल्या. मालकांचीं बिलें वसूल करण्याच्या धांवपळींत सायकलिंग चांगलें सुधारलें आणि पुण्याचा भूगोल व नकाशा तोंडपाठ झाला.

माझा सहकारी विठोबा. माझ्याआधीं सहा महिने होता; पण त्यानें आपल्या विद्यालाभाचा जमाखर्चच ठेवला नव्हता. पुनर्जन्मावर त्याचा विश्वास असल्यामुळें या जन्मांत शिंपीकाम आलेंच पाहिजे अशी त्यास बिलकुल घाई नव्हती; खरोखर मंदबुद्धि असल्यापेक्षां आपण तसें आहों असें भासविणें त्यास सोयीचें वाटत होतें. यामुळें तो निर्वेध होता व सुखीहि होता.

ही झाली दुकानाची गोष्ट. आतां वरचीं एकूण माणसें चार. भिमाक्का, विठूदादा, गोदावरी आणि अस्मादिक. भिमाक्का खठ्याळपैकीं नव्हती; पण तिचा व पाकशास्त्राचा उभा दावा होता. आणि आश्चर्य हें कीं, ही गोष्ट तिला पंचावन्न वर्षांत उमगून आली नव्हती; दुसऱ्यानें सांगण्याची सोय नव्हती. तिला थेरडी म्हटलेलें तिनें सहज खपवून घेतलें असतें; पण तिच्या पाकसिद्धीच्या विरुद्ध गोष्ट काढणें, काय बिशाद आहे !—भिमाक्कांची ही नस मीं पहिल्या तीन दिवसांत ओळखली आणि मीं ठरविलें कीं, चित्राहुति घालण्यापासून शेवटची आपोष्णि घेईपर्यंत त्यांच्या पाकचातुर्याची तारीफच करायची ! यामुळें झालें काय ?—माझ्यावर त्या भारी खुश झाल्या, तुपाचा चमचा औदार्यानें मिळण्याची सोय झाली आणि विठोबा-गोदावरीवर शह ठेवण्यास सोपें गेलें !

विठूदादाला काम पडलें नाहीं व त्याची वडीलकी मानण्याचें सोंग केलें कीं, तो ‘ दादा ’ बनण्यास एका पायावर तयार होता. तेव्हां त्याला तसा बनविला. राहिल्या गोदूताई. आबांनीं प्रशंसिल्याप्रमाणें ती बरीच बुद्धिमान् व थोडीशी सुस्वरूप होती ही गोष्ट खरी. हार्मोनियमवर तिचा हात चांगला बसला होता. कांहीं कांहीं पदें ती फारच चांगलीं वाजवी. पेटीच्या पट्ट्यांवरून तिचीं चिमुकलीं बोटें चपलतेनें नाचूं लागलेलीं

पाहतांना मला मोठें कौतुक वाटे. भिमाक्का व भोंवतालचें स्त्रीजग तिची प्रशंसा करीत आणि मधून मधून येणाऱ्या आबांची तर ती लाडकीच होती. मग गोदूताईच्या तोऱ्याला पालवी फुटली असल्यास नवल तें काय? ती आपल्या भावाला तुच्छ लेखी, भिमाक्कांचा बेलाशक पाण-उतारा करी आणि आबांच्यावरहि गुरगुरे. अर्थात् मी त्यांच्याकडे जातांच माझ्यावरहि तसलाच प्रयोग होणार, असें मला स्पष्ट दिसून आलें.

वसट पडेपर्यंत मी विशेष बोललों नाहीं. पुढें एकदोन वेळ बजावून पाहिलें, पण तेवढयानें जमेना. शेवटीं बेलाशक हस्तप्रयोग केला! आबा नुकतेच येऊन गेल्यामुळें त्यांचें भय नव्हतें. भिमाक्का व विठू-दादा यांच्यावर माझाच शह होता. मग गोदावरीच्या गर्गजास विचा-रतो कोण?–माझी मात्रा थोड्या उशीरानें कां होईना लागू पडली. ती मला वचकूं लागली.

सहा महिन्यांनंतर तिला हें कळलें कीं, तात्या तितका वाईट नाहीं आणि मलाहि कळलें कीं, गोदी एकंदरींत चांगली आहे.

* * *

कधीं धांवत व कधीं गमत कालानें दोन वर्षे मागें टाकलीं. मला पंचवीस-तीस प्रमुख कपडयांचें कापणें चांगल्यापैकीं येऊं लागलें. विठोबा टेक मारून यंत्र मारण्यांत वस्ताद झाला. तेव्हां आमच्या पालकांनीं वाटाघाट करून ठरविलें कीं, आम्हीं दोघांनीं मिळून कऱ्हा-डास टेलरिंग फर्म स्थापन करावी. उद्देश स्तुत्यच होता. पण त्यांत त्या दोघांनीं एकमेकावर मुकाटयानें मात करण्याचें योजिलें होतें. आबांना मी जांवई म्हणून पाहिजे होतों. आणि बाबांच्याजवळ पैसा नसल्यामुळें एकदां शिवणकामाचें दुकान निघूं दे. आबा देशपांड्याच्या आचरट व

आळशी मुलाला कसा उच्चू द्यावयाचा तें पाहतां येईल, असा त्यांचा कावा होता. वास्तविक बाबांना गोदावरी सून म्हणून करण्यास कांहींच अडचण वाटावयास नको होती. आबांनीं तिच्यासंबंधांत जो हजाराचा विमा उतरला होता तो आणखी दोन वर्षांनीं पक्व होणार होता; पण बाबांना मुदतीची हुंडी नको होती. आणि दुकान सुरू झाल्यावर आपल्या मुलाचा भाव आणखी वाढण्याचा संभव आहे, अशीहि त्यांना आशा होती. म्हणून त्यांनीं आबांच्या म्हणण्यास पोकळ अनुमति देत एकत्र दुकान काढण्याची संधि साधली. '**सबनीस व देशपांडे**' या नांवानें आमचें शिवणकामाचें दुकान स्थापन झालें. मी व विठोबा 'आंधळ्यास पांगळ्याचें साहाय्य' या नात्यानें एकमेकांस पूरक झालों. आमचें दुकान चांगलें चालूं लागलें.

पुढें विवाहाचे मुहूर्त येतांच आबांनीं आपल्या दोन्ही मुलांचीं लग्नें उरकण्याचें ठरविलें. विठोबाला मुली सांगून येतच होत्या. त्यांच्या दृष्टीनें गोदावरीचा नवरदेव तयार होताच. त्यांनीं आपला हेतु पुन्हां एकदां बाबांना कळविला. त्यांत त्यांनीं बाबांना स्पष्ट सांगितलें कीं, "आज थोडक्यांत लगीन उरकून घेऊं. वर्षा दीडवर्षाच्या आंत गोदीचे पैसे येतील ते मी तसेच्या तसे दागिन्याच्या रूपानें मुलीला देईन. आज तुम्ही मंगळसूत्राखेरीज कांहीं घालूं नका. म्हणजे माझीं दोन्हीं कार्यें उरकून मी निश्चिंत होईन. तुमचेंहि एक कार्य पदरांत पडेल !"

पण धूर्त बाबांना ही योजना पटली नाहीं. ते कृतघ्न होऊं पाहत होते. तेव्हां त्यांनीं माझ्या पश्चात् आबांना बेलाशक सांगितलें कीं, "मुलाला मुलगी पसंत नाहीं आणि त्याच्या मर्जीविरुद्ध जाणें आपणां दोघांनाहि श्रेयस्कर नाहीं."

आबा बुचकळ्यांत पडले ! त्यांनीं मला कांहींच विचारलें नव्हतें.

गोदावरीला त्यांनीं कांहीं विचारलें कीं काय, तेंहि मला माहीत नव्हतें. साहचर्यामुळें व अनुरूप असल्यामुळें आम्ही परस्परांना प्रिय झालों असूं किंवा होऊं अशी त्यांची अटकळ असावी. पण बाबांचें वरील विधान ऐकतांच मात्र ते बुचकळ्यांत पडले.

इकडे यासंबंधीं माझ्या व गोदावरीच्या भावना काय होत्या? माझ्या-बद्दल सांगायचें म्हणजे हा प्रश्न उपस्थित होईपर्यंत माझ्या मनाला तो मुळींच शिवला नव्हता. दोन वर्षांच्या संगतीनें आम्हां दोघांत चांगला स्नेह जमला होता व बहीणभावंडाप्रमाणें आम्ही परस्परांस प्रिय झालों होतों. पण त्यांतून पुढें पतिपत्नीचें नातें निर्माण व्हावें, असें माझ्या मनाला स्वप्नांतसुद्धां वाटलें नव्हतें. मीं पुष्कळशा कादंबऱ्या वाचल्या असल्या तरी घरांतल्या घरांत मोकळ्या मनानें माझ्याशीं वागणाऱ्या गोदावरीविषयीं माझ्या मनांत निर्लज्ज किंवा आचरट विचार कधींच आले नव्हते. आणि गोदावरीच्या वागण्यांतहि मला तसें कांहीं दिसलें नाहीं. यामुळें विवाहाचा प्रश्न उपस्थित होतांच मला एकदम कसेंसें वाटलें. किंबहुना स्वतःशीं मी फारच लाजलों म्हणण्यास हरकत नाहीं. पण पुढें गोदावरीशीं साक्षात् झाल्यावर पाहतों तों काय? ती माझ्या थाऱ्यालाहि उभी राहीना! मी आणखी गोंधळलों. मला वाटूं लागलें 'आपलीं वडील माणसें भलताच कांहींतरी विचार करीत आहेत. हें काय? –गोदावरी माझी बायको? –छट्! —पण मग गोदावरीला असें कां वाटूं नये? तिनें एवढें कां लाजावें?'

मीं तिची समजूत घालण्याचें ठरविलें आणि तिला संधि साधून एकटी गांठली. ती किती घाबरली–बावरली! मीं मोठ्या गंभीरपणें म्हटलें, "ए गोदे, आबांना सांग, तुम्ही हें भलतंच काय ठरवितां म्हणून?–मी त्यांना व बाबांना तेंच सांगणार आहें—"

गोदीनें सहज हंसत उद्गार काढला–“ इश्शं !—” पुढच्या क्षणाला ती मला बगल देऊन पळून गेली. मी डोकें चोळीत स्वतःशीं म्हणालों, “ इश्शं !—काय याचा अर्थ ? गोदीचा विचार तरी काय आहे ?”

त्या तंद्रींत असतां मला एकदम कांहीतरी चमकल्यासारखें झालें. गोदीच्या इश्शचा अर्थ मला कळला. नखशिखान्त मी थरारलों !– अहा ! किती मधुर भावना होती ती !

अशी वस्तुस्थिति असतां बाबांनीं आबांस टांग मारली. एवढेंच नव्हे, तर मला दुकानांतून बोलावून नेऊन माझ्याशीं तसें हितगुज केलें ! ते म्हणाले, “ तात्या, आबांनीं विचारलं तर स्पष्ट सांग ‘ मला मुलगी पसंत नाहीं म्हणून’, अरे ! मुली काय वाटेल तेवढ्या येताहेत. इत्यादि—”

बाबांच्या या कृतीचा मला खरें म्हणजे मनापासून राग आला. माझ्या बाबतींत आबांनीं त्यांचा पुष्कळ उपयोग केला होता. बरें, गोदावरी वाईट म्हणावी तर तसेंहि नव्हतें. शिवाय वर्षा दोनवर्षांत तिच्याकरितां सांठविलेलें धन ते आम्हाला देणार होतेच. पण बाबांना तो विश्वास पटत नव्हता. मीं तशी त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा विशेष उपयोग झाला नाहीं. आईचीहि मला अनुकूलता दिसेना. त्याबरोबर मला चीड आली. मी सरळ आबांकडे गेलों आणि त्यांना सर्व गोष्टी स्पष्ट सांगितल्या व म्हटलें, “ तुम्ही आमच्या नादीं लागूं नका. मला कसलाच हटवाद करतां येत नाहीं. कारण, तुमच्या मुलीच्या जन्माचा हा प्रश्न आहे. तुम्ही निराळा प्रयत्न करा.”

यानंतर लौकरच विठोबाचा विवाह होऊन तो संसारी बनला. आबा निराळ्या विचारास लागले. आमचें दुकान मात्र एकत्र चालू राहिलें.

## प्रसंग सातवा : : : ७

आमच्या दुकानचा वाढदिवस नुक्ताच साजरा झाला होता. मला व विठोबाला या सालांत दरमहा तीसप्रमाणें वेतन पडलें होतें.

माझ्या मातापित्यांचा आनंद आतां गगनांत मावेनासा झाला होता. घरबसल्या दरमहा तीस रुपये मिळविणारा मुलगा! काय गोष्ट आहे!–बाबांचे इतर ग्रहहि बरे होते. त्यांच्या भाग्याला भरतीची एक नवी लाट आली होती. या धांदलींत त्यांनीं आईची पुष्कळ दिवसांची इच्छा पुरवली. आम्ही एक साधारण बऱ्यापैकीं घर विकत घेऊन त्यांत राहण्यास गेलों होतों. सत्तेचें घर न् पोटापुरती मिळकत. मुलींच्या पित्यांना हें केवढें आमिष होतें. पण बाबा वाट पाहत होते–आणखी दर वाढण्याची.

पण मला समाधान होतें का कुठें?–नाहीं.

पहिलें कारण दुकानांत होतें. मी निम्याचा भागीदार असलों तरी दुकानांत भांडवल देशपांड्याचें होतें. माझें कापण्याचें चातुर्य बरोबरीनें उपयोगी पडत असलें तरी विठोबा मालक व मी आपला उगीच भाडोत्री–अशी एक समजूत होती. कुणाची कळलें?—विठोबाच्या सासुरवाडीकडील माणसांची. त्याचा एक अठरा-वीस वर्षांचा मेहुणा

उमेदवार म्हणून दुकानांत घुसला होता. सासूबाई येऊन बसल्या होत्या न् सासरोबा मधून मधून येत जात होते. आबा फिरतीवरच होते. गोदावरीचें शिकणें चालू राहिल्यामुळें ती पुण्याला भिमाक्कासह होती. त्यामुळें विठोबाचा संसार राणीसरकारांच्या मर्जीप्रमाणें चालला होता. त्याला त्यांत आनंद व अभिमान होता. त्याचें दोंद वाढूं लागलें होतें. माझ्या मानापमानाकडे किंवा सुखादु:खाकडे पाहण्याचें त्याला एवढेंसुद्धां कारण नव्हतें. उलट, आबांची सहानुभूति आम्हीं गमावली असल्यामुळें त्या निमित्तानें माझ्याविषयीं उदासीन राहणें त्यास सोयीचें झालें होतें. तात्पर्य, केव्हांतरी दुकानाची पायरी उतरण्याचा प्रसंग माझ्यावर येणार होता.

बाबांनीं आबांशीं जी प्रतारणा केली तेव्हांपासून माझें न् बाबांचें विशेष सख्य राहिलें नव्हतें. तरी मीं त्यांना वस्तुस्थितीची जाणीव देऊन ठेवली. पण त्यांना त्याचें कांहीं वाटलें नाहीं. 'आपण टिचून दुसरें दुकान काढूं' असें त्यांचें म्हणणें पडलें.

या सुमारास वामनदादाचा धूमकेतु उगवला !

माझी मन:स्थिति असावी तशी प्रसन्न नाहीं हें त्यानें चटकन ओळखलें. त्याला कांहीं सांगावें अशी माझी इच्छा नव्हती. पण त्यानें गोड बोलून व सहानुभूति दाखवून माझें हृद्गत समजावून घेतलें. बाबांची कृति त्यास मुळींच रुचली नाहीं. 'हीं म्हातारीं माणसें नेहमीं असा घोटाळा करतात. त्यांना तरुण हृदय कळतच नाहीं.' इत्यादि बडबडत तो पुढें म्हणाला, "तूं शिंप्याचा धंदा पत्करलास हीच चूक झाली. त्याला प्रतिष्ठा नाहीं न् प्राप्तिहि नाहीं. निदान शॉर्टहँड टाईपिंग तरी शिकायचेंस. अजूनहि त्याचा विचार कर. मी तुला मुंबईला एखाद्या फर्ममध्यें कुठंहि चिकटवून देईन." वगैरे.

मीं चिडक्या स्वरांत म्हटलें, " तें ठीक आहे. पण आज मार्ग कसा काढायचा ?"

वामनदादाला थोडासा विचार पडला. नंतर तो म्हणाला, " तेंहि खरंच. झाल्या गोष्टी परत येत नाहींत. तेव्हां पुढें काय करायचें तें पाहूं. पहिली गोष्ट तुझ्या धंद्यासंबंधीं. यांत आपल्याला कांहीं कळत नाहीं. पण तुला दुकान सोडण्याची पाळी आली, तर मी तुला एक पत्ता देऊन ठेवतों. त्यावर कळीव. तुला कांहीं पैसे लागले, एखादा नवा कोर्स घ्यावासा वाटला तर मी बहुशः साह्य करीन. वचन देत नाहीं, पण तुला फसविणार नाहीं हें निश्चित. आतां दुसरी गोष्ट विवाहाची. गोदा-वरीचें प्रेम पाहिजे असेल तर बाबांशीं तुझें पटणार नाहीं. तुला बायको-सह घराबाहेर पडलें पाहिजे व आपला स्वतंत्र मार्ग आंखला पाहिजे. तसें नसेल तर आज ना उद्यां पैसा मिळेल तेथली एखादी भलीबुरी घोरपड मान्य करून आहे त्या स्थितींत संसारास लागलें पाहिजे. पण मला जर खरें विचारशील तर तूं आतां गोदावरीचा नाद सोडावास हें बरं."

मी चपापलों. मीं सहज विचारलें, " कां ?"

वामनदादा म्हणाला, " पहिली गोष्ट, आतां तुम्हीं तिची मागणी घातली तर आबाच नकार देतील. त्यांनीं समजा अनुमति दिली तरी गोदावरी मान्यता देणार नाहीं. पुण्याच्या वातावरणांत शिकत असलेली मुलगी तुला कां पत्करील ? याचा विचार कर. ती आज पांचवींत आहे म्हणतोस. दोन वर्षांत ती मॅट्रिक होईल. तिच्या पेटी-वादनानें मोहित होऊन एखाद्या पदवीधराचें मन तिच्यावर बसेल. मग सांग, तिला अशी संधि मिळण्याचा संभव असतां, ती तुला कां पत्करील ?—"

त्याचें म्हणणें अक्षरशः खरें होतें. पण माझ्या मनाला तें अत्यंत झोंबलें. मी कांहीं बोलत नाहीं असें पाहून वामनदादा पुढें म्हणाला, " तेव्हां त्या भ्रमांत तूं राहूं नकोस. तुला इतर कांहीं साह्य लागलें तर तूं मला सांग. मी त्याचा विचार करीन."

पुढें चार दिवसांनीं वामनदादा अंतर्धान पावला.

पण तो गेल्यापासून माझ्या मनाला दोन गोष्टी सारख्या टोचूं लागल्या. एक मला शिंपीकामाविषयीं तिटकारा वाटूं लागला आणि दुसरी गोष्ट म्हणजे गोदावरी आपल्या आटोक्यापलीकडे आहे याची जाणीव. मन म्हणूं लागलें, " मग गोदावरीच्या त्या ' इश्शं 'चा अर्थ काय ? मला त्या दिवशीं तिच्याकडे पाहून जी एक संवेदना झाली, ती काय उगीचच ?"

विचारानें निर्णय दिलाः तारुण्यांतील अनेक खळबळी केवळ चंचल असतात. त्यांच्यावर विसंबणें धोक्याचें आहे. गोदावरीला त्या इश्शचा विसर पडणें शक्य आहे.

मनाला राहून राहून विषाद वाटूं लागला.

इतक्यांत बाबांनीं माझ्याकरितां एक स्थळ जुळवून आणिलें. मुलगी एकुलती एक असून तिची थोडी जमीन व जिंदगी होती. मला तें सारें मिळणार होतें. पण मुलीचें रूप ?

याच वेळीं दुकानांतील वातावरणहि कडक होत चाललें होतें.

दोन्ही प्रकारांला त्रासलों ! मनानें कांहीं विचार केला. आईबाबांना पत्र लिहून ठेवलें आणि घराला रामराम ठोकला !

## प्रसंग आठवा : : : ८

शिंप्याचा धंदा अप्रतिष्ठित मानण्याचें खरोखर कांहीं कारण नाहीं. त्यानें श्रीमान् होतां येत नसलें तरी व्यवस्थितपणें श्रम केले तर त्यांत उदरनिर्वाह होण्यास अडचण पडत नाहीं, हें निःसंशय. मग वामनदादा-सारख्या भुरळ्या मनुष्यालाहि तो कमी प्रतीचा कां वाटावा ?—पांढरपेशा समाजाची एक विशिष्ट दृष्टि याला कारण असेल काय ?—कांहीं सांगतां येत नाहीं. एवढें खरें कीं, गोदावरीचें मन आकृष्ट होण्यास माझा धंदा माझ्या उपयोगीं येणार नाहीं असें मलासुद्धां वाटूं लागलें. तिच्या-आधीं आपण मॅट्रिक झालें पाहिजें व जमल्यास बी.ए.हि झालें पाहिजे, असें माझ्या मनानें घेतलें व त्या वीरश्रींत मीं एकदम मुंबई गांठली. शिवणकामांतील कापणीचें चातुर्य माझ्या हातांत असल्यामुळें दिवसा पोटापुरतें तें काम करायचें आणि रात्रीं शिक्षण संपादावयाचें, असा माझा विचार होता. पुष्कळ बी.ए. एम्. ए. हि बेकार फिरतात ही निराशाजनक गोष्ट मीं मनांतून काढून टाकली होती. शिक्षणांत गोदा-वरीच्या पुढें असणें माझें ध्येय होतें.

नवा प्रयत्न आणि जगाचे नवे अनुभव !

माझा आडाखा फारसा चुकला नाहीं. मला दिवसा उद्योग मिळाला आणि रात्रीं शिक्षणाची व्यवस्था झाली. परीक्षेला सहा महिने अवकाश होता. अभ्यास सुटून तीन वर्षें झालीं होतीं. मनाची पाटी बहुतेक कोरी झाली होती. यामुळें नव्या प्रयत्नाचा पहिला महिना अत्यंत जाचला. त्यांत भोंवतालचें ऐशीं टक्के जग म्हणत होतें—"काय खुळचट आहेस तूं?—" पण बाकीचें जग व शिक्षक म्हणत होते–"उत्तम !—आगे बढो !"

मध्यंतरीं पत्ता काढीत वडील आले आणि आर्जव करून गेले. आबा भेटले, नवल करीत निघून गेले. तसाच वामनदादा भेटला. हंसला. पन्नास रुपये हातावर ठेवून गेला!—परिश्रम—अभ्यास! परिश्रम अभ्यास!—मी मार्ग काटीत होतों.

इ. स. १९२६ च्या पहिल्या अर्धांतच माझ्या कपाळीं मॅट्रिकचा टिळा लागला! मीं हिशेब केला. मला बावीस वर्षें पूर्ण झालीं होतीं. गोदावरीला सोळावें लागलें होतें आणि ती सहावींत गेलीं होती. ती मॅट्रिक होईपर्यंत मी इंटर पास होईन.

मनोराज्य ठीक होतें. पण कॉलेज टर्मस् भरायच्या कोणत्या आधारावर? चालू आयुष्यक्रम चालवीत तें शक्य आहे?—वामनदादाला पत्र पाठवून विचारिलें. त्याचें उत्तर आलें—"विद्या बस्स झाली. तूं धन मिळवूं लाग. शॉर्टहँड टायपिस्ट हो. नोकरी मिळवून देतों. गोदावरीच्या प्रेमाची फारशी पत्रास बाळगूं नकोस."

मुंबईस राहिल्यामुळें, तेथील बकाल आयुष्यक्रम पाहिल्यामुळें आणि शिक्षितांची दुर्दशा अवलोकिल्यामुळें मनाला वाटूं लागलें–आपण भ्रमिष्ट तर नाहीं? कशाच्या मागें आपण धांवतों आहों? यापेक्षां वरीं

जाऊन—पण तिथं काय करायचें ? आणखी एक टेलरिंग शॉप काढायचें ?—चाललें नाहीं तर ?

मनांत कां आलें कोणास माहीत ? एकदां गोदावरीला भेटावें असें वाटलें. लागलीच निघालों. तिच्याकडे उतरण्यास मला कसलाच संकोच वाटण्याचें कारण नव्हतें. पण पुण्याच्या स्टेशनवर येतांच मन बुजूं लागलें. मी दुसऱ्या एका मित्राकडे उतरलों.

दुसरे दिवशीं रविवार होता. दुपारीं तीनच्यापुढें गोदावरीच्या बिऱ्हाडीं गेलों. भिमाक्का कांहीं धान्य निवडीत होत्या. गोदावरी आपल्या दोन मैत्रिणींसह एक हार्मोनियम घेऊन बसली होती. मला पाहतांच दोघींनाहि आनंद झाला. गोदावरी फार चकित झाल्याप्रमाणें दिसली. तिनें आपल्या मैत्रिणींना निरोप दिला आणि मला उत्थापन दिलें.

भिमाक्कांनीं म्हटलें, "कित्ती दिवसांनीं आलास रे. आणि तुझ्या-संबंधीं मीं काय काय ऐकलं रे. म्हणे घरांतून तूं पळून गेलास ? मुंबईला जाऊन म्हणे शिकतोयस अन् परीक्षा दिलीस म्हणे. लग्न करायचं टाकून हें रे काय केलंस ?—" इत्यादि.

गोदावरीनें शांतपणें विचारलें, "आलांत केव्हां ?—सामान कुठें आहे ?—मग इकडेच कां आलां नाहीं ?—" इत्यादि

यानंतर आम्ही तिघेहि कांहींतरी इकडचें तिकडचें बोललों. भिमाक्का विशेष बडबडत होत्या. गोदावरी खाण्याचें करण्यांत गुंतली होती.

एक तासाचा वेळ. पण मोठ्या मजेंत गेला. रात्रीं भोजनास येण्या-बद्दल दोघींनीं बजावलें. मीं तें मान्य केलें. जातांना गोदावरी मला पोंचविण्यास म्हणून चार पावलें आली. त्या वेळीं तिनें माझ्या हातांत

एक पाकीट ठेवून म्हटलें, " यांतील उत्तर ज्याचें त्याला पोंचवा. मला पत्ता माहीत नाहीं म्हणून तुम्हांला तसदी देतें—" ती घरांत निघून गेली व मी मार्गाला लागलों.

नवल करीत मार्गानें जात असतां मीं पाकिटांतील पत्र काढून वाचलें. तें वामनदादानें गोदावरीस लिहिलें होतें. मी आश्चर्यांत बुडून गेलों. पत्र पुढीलप्रमाणें होतें:

" कुमारी गोदावरी देशपांडे, यांस—नमस्कार वि. वि.—मी दामोदर लक्ष्मण सबनीस याचा थोरला भाऊ. त्याच्याकरितांच मी हें पत्र तुम्हांला लिहीत आहें. गोष्ट नाजूक आहे. पण तुम्हीं तिचा विचार करावा व सडेतोड व मनाला पटेल तसें वागावें.

तुमचें व दामोदराचें प्रेम जडलें आहे असें मला कळलें. पण तुमचा दोघांचा विवाह होण्याचें घाटत असतां तें फिसकटलें. तुमचें दोघांचें परस्परांवर खरेंच प्रेम असेल तर ही गोष्ट वाईटच झाली असें मी म्हणेन. असो. मला तुम्हांला एकच सांगावयाचें आहे. दामोदरावर तुमचें प्रेम खरेंच जडलें असेल तर तुम्हीं त्याच्याकरितां कांहीं काळ वाट पहावी. मी त्याला योग्य त्या मार्गाला लावण्याचा प्रयत्न करीन आणि तुमचा दोघांचा विवाह झालाच तर तुमचें पुढचें आयुष्य सुखांत जाण्याचा शक्य तितका प्रयत्न करीन. मी स्वतः संसारांत पडणार नाहीं. पण तात्याचें कल्याण व्हावें असें मनापासून वाटतें. तात्याचें तुमच्याकडे भारी मन ओढतें असें दिसून आलें. विवाह फिसकटल्याची गोष्ट त्याच्या मनाला फार लागली आहे. पण ही गोष्ट पुनः जुळविण्याचें कांहीं कठिण नाहीं. मी आबांना प्रसंग येतांच विचारीन. तोंपर्यंत तुमचें मन

मात्र दृढ असलें पाहिजे. तसें जमण्यासारखें नसल्यास किंवा तात्यावर तुमचें प्रेम जडलेंच नसल्यास त्यास तसें स्पष्ट कळवा. नाहींतर कांहीं काळ वाट पहा. तुमच्यासारख्या अपरिचित कुमारिकेला असें कांहीं लिहिणें गैर आहे हें मी जाणतों. पण माझ्या भावाच्या कल्याणाकरितां हें धाडस मी आहें एवढें ध्यानीं घेऊन मला क्षमा करा. माझ्या भावाला स्पष्ट काय तें सांगा. त्याला संशयांत ठेवूं नका, एवढेंच पुनः विनवितों.

**वामन सबनीस."**

याच मजकुराखालीं एक निराळ्या अक्षराची ओळ होती. ती अशी–

**मी वाट पाहीन, फसविणार नाहीं.—गोदावरी.**

वामनदादाचें तें पत्र न् त्याला गोदावरीचें तें उत्तर वाचून मला काय वाटलें हें मला वर्णन करून सांगतां येणार नाहीं. मी कसल्या-तरी आनंदानें धुंद झालों, माझी छाती भरून आली आणि भोंवतालच्या जगाला मी कांहीं काळ तरी पूर्ण विसरून गेलों एवढें निश्चित.

* * *

यानंतर मीं शॉर्टहँड टायपिस्टचा कोर्स भरला व त्यांतहि यशस्वी झालों.

वामनदादानें याहि बाबतींतील आपले बोल खरे केले. त्याची ओळख कुठली व त्याचें एवढें वजन तें काय याचा मला उलगडा पडला नाहीं. एवढें खरें कीं, मला एका चांगल्या दुकानांत एक नोकरी मिळाली. मी पन्नास रुपये दरमहा मिळवूं लागलों.

मुंबईसारख्या ठिकाणीं हा पगार तुच्छ होता हें खरें; पण वामन-दादाची इच्छा मी पूर्ण करूं शकलों याचाच मला आनंद होता.

## प्रसंग नववा : : : ९

नव्या उत्साहानें मनांत मुरलेलें मनोराज्य करीत मी आपल्या नव्या आयुष्यक्रमास लागलों. एकंदरींत बस्तान ठीक बसलें होतें. तोंच सुमारें सहा-सात महिन्यांनंतर एका अज्ञात स्थानाहून वामनदादाचें मला पुढीलप्रमाणें पत्र आलें:

" चि. तात्यास अनेक आशिर्वाद वि. तुझें आतां ठीक चाललें असेलच. आहे या स्थितींत योग्य ती काटकसर करून थोडा धनसंचय कर. माझ्यासारख्या भटक्या मनुष्याचाहि असा अनुभव आहे कीं, जवळ थोडी धनाची ऊब असेल तर मन निश्चिंत, निर्भय व उत्साही राहतें, धीटपणा वाढतो, लोकांवर छाप ठेवतां येते. तेव्हां हें ध्यानीं घेऊन पैसा गांठीं टाक. असें एखादें वर्ष जाऊं दे. मग आबा देशपांड्यांना भेट. त्यांना आपला हेतु सांग. माझी त्यांची दोन महिन्यांपूर्वी उमरावतीस गांठ पडली होती. मीं त्यांच्या मनाचा अदमास घेतला. त्यांचा नकार कांहीं दिसला नाहीं, तेव्हां तुला निराश होण्याचें कारण नाहीं. आतां माझ्याविषयीं थोडेसें सांगतों. मी महाराष्ट्र सोडून दूर कोठेंतरी जात आहें. कदाचित् हिंदुस्थान सोडूनहि जाईन. परत केव्हां येईन याचा नेम नाहीं. अर्थात् मजसंबंधानें कसलीच काळजी

करण्याचें कारण नाहीं. संशयांत पडूं नये. पुन्हां गांठीभेटीचा योग—येईल तेव्हां खरा. परिस्थिति निवळली कीं येईनच परत. माझ्यातर्फे तुम्हां कोणाला त्रास पोंचूं नये म्हणून मी जरा दूर जात आहें. कळावें."

पत्राखालीं सही नव्हती व तें कुठेंतरी रेल्वेंत टाकलें होतें. वामनदादाच्या आतांपर्यंतच्या चरित्राकडे पाहिल्यास त्यांत विशेष कांहींच नव्हतें. तरीपण त्याचा माझा जो संबंध आला होता व माझ्या मनोरथपूर्तीकरितां त्यानें जी आस्था दाखविली होती, तीमुळें मला त्याचा मोठा आधार वाटूं लागला होता. तो असा डळमळलेला पाहतांच मला थोडीशी अस्वस्थता वाटूं लागली. वामनदादावर देशत्यागाची पाळी यावी याचा अर्थ तो कांहीं संकटांत सांपडला असला पाहिजे. कोणत्या ?—उत्तर सांपडणें अशक्यच होतें. फावल्या वेळीं तर्कवितर्क लढवून अस्वस्थ होण्यापलीकडे माझ्या हातांत कांहींच नव्हतें.

दिवसांमागून दिवस चालले. एकदां मायभूमीला जाऊन आलों. आई सून आणण्याविषयीं आतुर होती. बाबाहि तोऱ्यांत होते. मीं आईला आपला हेतु सांगितला. गोदावरी तिला नापसंत नव्हती. फक्त हुंड्या-मानपानाचा तिचा ठराविक प्रश्न होता. आपली सांपत्तिक स्थिति काय ?—आपल्या मुलीची अवस्था काय झाली आणि आपण उगीच ताठा कां करावा ? याची माझ्या मातापित्यांना वांगच नव्हती. बस्स ! आपला मुलगा लग्नाचा आहे ना ? हीच घमेंड. असो.

असा कांहीं काल लोटल्यावर मीं आबा देशपांड्यांना आपली इच्छा कळवली. आठ दिवसांनीं त्यांचें उत्तर आलें—

" चि. रा. दामोदरपंत सबनीस आज मुक्काम मुंबई यांस. बेळगांवाहून आबा देशपांडे याचा अनेक आशीर्वाद वि. वि. तुमचें पत्र पोंचलें. तें अगदीं वेळेवर आलें. चि. गोदावरीचा विमा नुकताच पूर्ण झाला.

महिन्याभरांत तिची रक्कम हातीं येईल. ही महत्त्वाची गोष्ट तुम्हीं इतकी नेमकी ध्यानांत ठेवून वेळेवर पत्र पाठवलेंत याचें कौतुक वाटलें. उत्तरीं कळविणेचें कीं, चि. गोदावरीची परीक्षा होईपर्यंत तिच्या विवाहाचा विचार तहकूब केला आहे. शिवाय, तुम्हींच मागें 'आमच्या नादाला लागूं नका', असें स्पष्ट सांगितलेंत. त्या वेळीं मजजवळ धन नव्हतें. आतां आहे. ही गोष्ट तुमच्या सोयीची झाली असली तरी माझ्या नाहीं. शिवाय मुलीला मुलगा पसंत नाहीं असें आढळून आलें आहे. म्हणजे तुम्ही आमच्या स्थळावर विसंबून राहूं नये असें झालें. योगायोग आहेत हे. बाकी सर्व ठीक आहे. कळावें हे आशीर्वाद.

**आबा देशपांडे."**

'आबांच्याकडून असल्या रूक्ष नकारची मला अपेक्षा नव्हती! आमचेंच वर्तन व शब्द त्यांनीं आम्हांला परत केले होते. आणि वर माझा त्यांच्या विम्यावर डोळा होता असा भलताच आरोप माझ्या माथीं मारला होता. त्यांच्या नकारापेक्षांहि मला या गोष्टीचें भारी वाईट वाटलें. एकदां मनांत आलें पत्रव्यवहार करून किंवा त्यांची समक्ष गांठ घेऊन त्यांचा गैरसमज दूर करावा. पण थोड्या विचारानें वाटलें कीं, ही घडी आतां कायमची विस्कटलेली आहे, ती बसणें शक्य नाहीं. आपण त्या नादाला लागूं तर? गैरसमज वाढतच जातील, दुराग्रहाला जोर चढेल, कदाचित् वितुष्टहि निर्माण होईल. बाबांनीं आबांशीं जें वर्तन केलें होतें, त्याचा हा अगदीं योग्य मोबदला होता!

निराशेनें मनावर दाट आवरण घातलें, उत्साह पार मावळला आणि मनोराज्य मातीमोल झालें! या काळोखांत एकच चांदणी चमकत होती. गोदावरीची ती ओळ—**मी वाट पाहीन. फसविणार नाहीं.**

पण तिला विचारलेंच नाहीं तर? तिच्या मनाचा कोंडमारा केला

तर ? तिला त्या ओळीचा विसर पडला तर ? किंवा तिची नीट समजूत घातली तर ?–सारें शक्य होतें.

डोळ्यापुढें धरलेला लोलक एकदम खळकन् तुटला ! त्यांतून दिसणारा सुंदर देखावा नाहींसा झाला !—या नव्या अनुभवाचें ज्ञानांजन डोळ्यांना बरेंच चुरचुरलें !

खेद–निराशा–उद्विग्नता–वैताग – जगाविषयीं तुच्छता – आततायी विचार–भीति आणि झाल्यागेल्या गोष्टींचा खेद या चक्रांतून गिरक्यांवर गिरक्या घेतल्या ! लौकर सुटका होईना. पुढचा उपाय सांपडेना. मन त्रस्त बनलें व तब्येतीचें गाडेंहि बिनसलें.

भोंवतालचें जग हंसत-खिदळत चाललें होतें. लहान-मोठीं घड्याळें सांगत होतीं : हें पहा मिनिट गेलें. हा पहा तास संपला. हा पहा दिवस खलास झाला ! तारखा बदलत होत्या आणि महिने नाहींसे होत होते !

शाळूसोबत्यांचें जग म्हणत होतें—कसलें तरी व्यसन लावून घ्या. मन रमूं लागेल. कोणीं बिडी, कोणीं सिगारेट, कोणीं बीर तर कोणीं ब्रँडी पुढें केली. एकानें माडीचा जिनाहि चढण्याचा मार्ग सांगितला आणि तसलें लिटरेचर वाचून ठेवा असा पोक्त संदेश दिला.

एका कड्यावर उभा राहून मी सारें पाहत होतों, ऐकत होतों ! मन चुळबुळत होतें व हात वळवळत होते. वाटे–वाटे–वाटे.........काय हरकत आहे ?—असें वाटतांच भोंवतालचा अंधार जास्त जास्तच कोंदाटत जाई आणि त्यांत लखकन् एक वीज चमके—

...........**मी वाट पाहीन. फसवणार नाहीं**..........

* * *

**घराकडील तार**—लखूनानांना अपघात झाला आहे. घाबरूं नका. तावडतोब घरीं या.

## प्रसंग दहावा : : : १०

कसल्यातरी घरकामाकरितां वडील एका उंच शिडीवर चढले असतां, शिडीची अगदीं वरची करळी मोडली आणि तेथून ते घसरले! हा त्यांना अपघात व आम्हांला घात होता.

मी आलों त्या वेळीं बाबा साधारण बेशुद्धच होते. त्यांच्या गळ्याचें हाड मोडलें असल्यामुळें त्यांतून ते वांचणें कठीणच होतें. आयुष्यांतील एका खडतर प्रसंगांतून जाणें मला भाग होतें. शोकग्रस्त आई व भावंडें यांच्याकडे पाहून अंतःकरणाचें पाणी होत असतां, मला त्यांना धीर द्यावा लागत होता.

शेवटीं व्हायचें तें झालें! इ. स. १९२८ च्या बरोबर बाबांचा अन्त झाला!

दुःखाशोकाची ही होळी विझण्याच्या आंतच पुढचा प्रश्न सोडवणें आवश्यक होतें. एक राहतें घर आणि थोडेंसें खिडुकमिडुक याशिवाय जिंदगी अशी कांहीं नव्हती. माझी एवढी-तेवढी पुंजी केव्हांच खलास झाली होती. आणि अशी स्थिति असतां भोंवतालचें जग म्हणत होतें—आतां तुम्ही चटकन् चतुर्भुज व्हा. धर्माचा या गोष्टीला आधार असून तुमच्या आईचाहि पाठिंबा आहे.

मला याचें सखेदाश्चर्य वाटलें. आज घरांत आहेत तीं पोटें कशीं भरायचीं हा माझ्यापुढें प्रश्न होता. आणि जग म्हणत होतें–आणखी एक पोट घरांत आणा. काय हितप्रद उपदेश होता !

मीं पण कोणाचें कांहीं ऐकलें नाहीं. नोवरीपेक्षां नोकरीच्या नादीं लागणें विशेष आवश्यक आहे, ही गोष्ट मीं आईला पटवून दिली. तेव्हां तिनें शिंप्याचें दुकान घासण्यास सुचवलें. पण त्या मार्गांत आतां अर्थ नव्हता. विठोबा देशपांड्यालाच आतांपर्यंत चार प्रतिस्पर्धी निर्माण झाले होते. त्यांत एक त्याचे शालकच होते. तेव्हां त्या गर्दींत घुसण्याची इच्छाच होईना.

आई, राजा व बाबी यांची दोनतीन महिन्यांची कांहीं सोय लावून दिली आणि नंतर मुंबईला पळालों. पूर्वींची नोकरी सुटल्यासारखीच होती. तरी पण तेथील नकार आधीं पदरांत पाडून घेतला. नंतर भटकूं लागलों.

जिकडे तिकडे कडक उन्हाळा होता व म्हणूनच दूरदूर सुंदर मृगजळहि होतें.

आशेचे धुमारे असे फुटत : शार्टहॅंड टायपिस्ट आहां म्हणतां ?–ठीक. इंग्रजी पत्रव्यवहार उत्तम सांभाळाल ?–ठीक. गुजराथी येतेंच ना ?–पण काय हो तुम्हांला अकौंटन्सीची कांहीं माहिती आहे का ?–फारशी नाहीं. म्हणजे मुळींच नाहीं. मग आम्हांला खरं म्हणाल तर तसल्या हॅंडची जरूर आहे. तेव्हां तूर्त––

दगड माथ्यावरून खालीं कोसळे !

या वणव्यांत एकच हिरवळ होती. मला अप्रिय असणारें कतरण-शिवण-काम. तेंच मला पोटाला घालीत होतें. पण टाळक्यांत हें घुसेना कीं, त्यालाच घट्ट पकडावें व कुठेंतरी स्वतंत्र मार्ग काढावा. छे, नोकरीचा मोह मोठा. म्हणून फावल्या वेळांत अकौंटन्सीच्या मागें लागलों.

उगीच धांवपळ करीत व नकार घेत पुन्हां एक नोकरी मिळवली एकदांची. पगार पन्नासच होता व सहा महिन्यांनीं कायम होणार होतों.—कबूल.

मुंबईचा चौकटींत बसविलेला आयुष्यक्रम सुरू झाला. नळाची व संडासाची सोय सांभाळण्याकरितां घाबऱ्या घाबऱ्या उठावें, घड्याळाकडे पाहत आठनवापर्यंत वर्तमानपत्रें चाळावीं किंवा अस्वस्थ मनानें कुठेंतरी भटकावें. नंतर खाणावळीकडे पळावें. तेथें चार घांस संवय म्हणून घशांत कोंबावे आणि ओल्या हातींच ट्रामचा दांडा पकडावा ! ऑफिसांत जावें. ठराविक पद्धतीनें टाईपरायटरची कटकट करावी आणि पांचला सुटावें. कोणी सोबती भेटल्यास बॅकबेवर जावें. नाहींतर गुदमरलेल्या खोलींत येऊन आढ्याकडे पाहत पडावें. सदा धांदल—धांवपळ आणि अस्वस्थता ! मनाला उत्साह नाहीं. पोटांत ठीक नाहीं. शरीराला त्राण नाहीं. मनापासून हंसूं येईल, जिवाला थोडा आराम वाटेल व जगण्यांत मौज वाटेल असलें कांहीं घडणें शक्यच नव्हतें. ओझ्याचीं गाढवें आम्ही. सारखें रखडावें, परिस्थितीचीं टिकुरणीं खावीं आणि केव्हांतरी मरून जावें !

मीच असा नव्हतों. बारा लाख वस्तीच्या बकाल मुंबईत असे हजारों जीव होते. देशांत काय चाललें आहे ? काळ कसा आला आहे ? जगाची परिस्थिति काय आहे ?—याचें आम्हांला कांहीं-कांहीं भान

नव्हतें ?–रोज आम्ही वर्तमानपत्रें घेत होतों; चाळीत होतों. केव्हां केव्हां आपसांत चर्चाहि करीत होतों. एखादे दिवशीं एखाद्या व्याख्यानाला जात होतों; पण तें सारें वर वर–कांहींतरी कोष्टकें भरायचीं म्हणून होत होतें ! शरीर हालत होतें पण मन सदैव शून्य होतें.

गोदावरीचें स्मरण होत होतें का ?–मधून मधून. पण तें लगेच झाडून टाकीत होतों. हलवायाच्या दुकानावरून जात असतां मिठाई घेण्याची इच्छा होते. पण खिशांत पैसे नसल्याची जाणीव होतांच आपण काय करतों ?–खिन्न होत्साते पुढें चालूं लागतों. गोदावरीच्या स्मरणाची तीच वाट लावीत होतों. कसलें प्रेम न् कसलें ध्येय ! सारें जीवन निरुत्साही झालें होतें.

"मॅट्रिकचा रिझल्ट. ज्ञानप्रकाश किंमत पाऊण आणा ऽऽ"

पोरें ओरडत होतीं. मनाला कांहींतरी जाग आली. झटकन् एक अंक विकत घेतला आणि पुणें केन्द्राची नामावलि वाचूं लागलों. मन किती बावरलें होतें. डोळे नांवांमागून नांवें मागें टाकीत होते. मुलींचीं नांवें ठळक अक्षरांत होतीं. द आद्याक्षरांच्या आडनांवावरून घसरत जात होतों. तोंच **मिस् गोदावरी देशपांडे** या नांवावर आदळलों !—थबकलों.

मनाला आनंद वाटला कीं विषाद, कांहीं कल्पना होईना. एवढें खरें कीं, सर्वांगाला कसलें तरी कांपरें भरलें. कामावर जाणें अशक्य वाटूं लागलें. ते दिवशीं जेवलों कीं नाहीं, कांहीं स्मरण नाहीं. एवढें खरें कीं, खोलीबन्धूंच्या हस्तें ऑफिसांत चिठ्ठी धाडली आणि स्वस्थ पडून राहिलों.

## मी वाट पाहीन !

थंडी वाजली नाहीं, ताप भरला नाहीं कीं डोकें दुखलें नाहीं. पण तळमळ मात्र सारखी सुरू होती. चार तासांच्या विचारानें मनानें हें घेतलें कीं, यापुढें आयुष्य अगदीं बेफाम घालवावयाचें. केव्हां केव्हां सिगरेट ओढूं लागलों होतों. तें अग्निहोत्र आतां सतत चालू ठेवावयाचें. दारूला मी स्वप्नांतसुद्धां विचकत होतों; पण तिचीहि ओळख करून घ्यायची आणि मृत्यु लोकांतील तो नरक–मुंबईचा ग्रँटरोड–तिकडेहि मधूनमधून फेरी मारावयाची. प्रतिज्ञाच केल्या मीं. त्या झटक्यांत उठलों, कपडे केले आणि हॉटेल गांठलें. हलक वाटत होतें म्हणून कांहींतरी खाल्लें आणि सिगरेटच्या दोन पेट्या घेऊन बाहेर पडलों !— दारू घेतली नसतांहि बेफाम होतों. बॅकबेवर येईपर्यंत सिगरेट व आगपेटी हातांत घेऊनच धांवत होतों, ओढण्याचें भानच नव्हतें.

मुंबईच्या कुबट हवेंत उबगलेला जीव समुद्रकांठीं आल्यावर थोडा तरी श्रांत होतो नाहीं ? होय. मला तसा अनुभव होता. वाळकेश्वर व कुलाबा टोंक यांच्या बेचकेंत बसलेला तो जलनिधि, त्याच्यावर तरंगणाऱ्या त्या लहान-मोठ्या मच्छीमाऱ्या, इकडची वनश्रीनें डवरलेली मलबार हिल आणि तिकडची कोटांतील मुंबई, समुद्रास आंत रेटून बांधलेला तो धक्का आणि माणसांनीं गजबजलेलें तें वाळवंट ! हा देखावा नित्याचाच; पण तो कवि व चित्रकार यांना फक्त स्फूर्ति देणारा नव्हता; तर सामान्य जीवांच्या शिणलेल्या शरीराला व डोळ्यांना थोडा तरी आराम देणारा होता. मी तेवढ्याकरितां तर तेथें धांवत आलों होतों. पण आज मला सारें कांहीं शून्य दिसत होतें. मी उगीचच जात होतों. कांहीं वेळ फूटपाथ तुडवला, नंतर वाळवंटांत उतरलों. इथें थांब, तिथें थांब, सिगरेट व पेटी चाळीव व शून्य दृष्टीनें कुठेंतरी पहा–असें चाललें होतें.

माझें मलाच समजेना मी तेथें कां आलों ? खोमचेवाला, गिंडेरीवाला, खारीशेंगवाला असे लोक आले व गेले. मी मूकस्तंभासारखा उभा होतों. कांहींतरी चाळा केला पाहिजे म्हणूनच कीं काय कोण जाणे, तोंडांत सिगरेट कोंबली व पेटीवर काडी फटकारली ! बाहेर पडलेल्या ज्योतीला बचावीत हाताची ओंजळ तोंडाकडे नेली तोंच बाजूनें कोमल स्वराची हांक आली—“ तात्या ”—

फार–फारच चपापलों. काडी फेंकून दिली, सिगरेट खिशांत कोंबली आणि हांकेच्या दिशेकडे पाहिलें. तीनचार तरुणींचा घोळका दिसला. पैकीं पोपटी रंगाचें पातळ व तसलाच ब्लाऊझ ल्यालेली एक हास्यमुखी तरुणी किंचित् पुढें झाली व पुरुषी पद्धतीचा पण विनयशील नमस्कार करीत मंद स्वरांत म्हणाली, “आपली भेट झाली, किती छान झालं !—मनाला भारी चुटपुट लागली होती.”

ती एवढें मला बोलून आपल्या मैत्रिणींना म्हणाली, “ तुम्ही व्हा पुढें. मी आलेंच पांच मिनिटांत.” पुन्हां ती म्हणाली, “ कांहीं हरकत नसेल तर आपण बसूंया पांच मिनिटें.”

ती बसली. मीहि बसलों. त्या वेळीं मी काय बोललों मला आठवत नाहीं. किंबहुना ती खरें काय बोलली हेंहि मला स्मरत नाहीं, एवढें आठवतें. प्रथमतः तिनें माझ्या वडिलांच्या मृत्यूबद्दल खेद दर्शवून सहानुभूति प्रगट केली. नंतर आमच्या आईभावंडांचें कुशल विचारलें. नंतर स्वतःकडील वार्ता सांगितली. त्यांत भिमाक्का वारल्याचेंहि वृत्त होतें. ‘सहज मुम्बई पाहायला म्हणून आलों. आतां आम्ही कऱ्हाडला जाणार आहोंत. तुम्ही केव्हां येणार ?’ असेंहि कांहीं तिनें विचारिलें.

आणि नंतर तिनें कांहीं संकोचत ' मी मॅट्रिकमध्यें पास झाल्याचं तुम्हांला कळलं असेलच.' असें म्हटलें.

या वेळीं आम्हीं दोघांनीं एकमेकांकडे पाहिलें. कां कुणाला माहीत ? पण मलाच गोदावरीच्या उज्ज्वल मुखाकडे क्षणा दोक्षणांपेक्षां जास्त वेळ पाहवलें नाहीं. मीं चाचरत म्हटलें, " खरंच माझ्या मनाला केवढा आनंद झाला आहे या तुमच्या विजयाचा ! मी तुमचा असाच उत्कर्ष इच्छितों ! "

पुन्हां आम्हीं एकमेकांकडे पाहिलें. चार वर्षांपूर्वी ' इश्शं ' म्हणून पळून जाणारी ती नवोढा गोदावरी आणि आजची तारुण्यांत पदार्पण केलेली व त्यामुळेंच फारच सुंदर दिसणारी धीट व विजयी गोदावरी.— केवढा फरक होता दोघींत !

त्या वेळीं तात्याला हें जाणवलें होतें कीं, गोदी आपणावर प्रेम करते.

आज त्याच तात्याला वाटलें कीं, छे, तिच्यांत-आपल्यांत महदंतर आहे.

त्या वेळीं तात्याला वाटलें, स्वर्ग किती सन्निध आहे. आज त्यालाच वाटलें, आपण समुद्राच्या काळलाटेखालीं दडपलों गेलों तरी बरें...... काळ काय काय चमत्कार दाखवितो !

गोदावरी मोठ्या आतुरतेनें संवाद वाढविण्यासाठीं आतुर असतांहि मला तो वाढविणें साधलें नाहीं. तिला त्याचा राग आला कीं नवल वाटलें मला सांगतां येणार नाहीं. एवढें खरें कीं, ती अल्पकाळांतच एकदम उठली व म्हणाली, " तात्या, तुमचं मन भानावर दिसत नाहीं व तुमची प्रकृतीहि नीट वाटत नाहीं. उगीच त्रास देत नाहीं मी. प्रकृतीला सांभाळून असा अं, येतें—" ती आपल्या मैत्रिणींच्या दिशेकडे

गेली. त्या सुमारें पंचवीस-तीस हातांवर वाळवंटांत बसल्या होत्या. गोदावरी त्यांच्यांत जाऊन मिसळली.

मी अनिमिष नेत्रांनीं तिकडे पाहूं लागलों. त्या मैत्रिणींनीं गोदावरीच्या हाताला ओढून तिला आपसांत बसवली. त्यांच्यांत काय बोलणें झालें देव जाणे; पण सगळ्या हंसूं लागल्या व माझ्या दिशेकडे पाहूं लागल्या. याच वेळीं गोदावरीनें एकदोघींना चापट्या मारल्याचें मीं पाहिलें. मीं तात्काळ मान वळवली व वाट चालूं लागलों.

आत्तां मी गोदावरीकडे अंतश्चक्षूंनीं पाहूं लागलों. अकरा वर्षांपासून पाहिलेली ती एवढीशी गोदी आज किती सुंदर, धीट, बुद्धिमान्, चपळ दिसते आहे. आणि आपण ?—खिशांत हात गेला व सिगरेट हाताला लागली ! मनांत विचार आला, आपणास सिगरेट शिलगावतांना गोदावरीनें पाहिलें. तिला काय बरें वाटलें असेल ? तिला तिटकारा वाटला असेल कीं—

आणि याच वेळीं जवळून जाणारा एक छाकटा पोर गात चालला होता—

"सुलभ मनिं गणा न भूपसुता।.........त्यजा न किंकरता ! सुलभ मनिं—"

## प्रसंग अकरावा : : : ११

एखाद्या झिंगलेल्या दारुड्याप्रमाणें खोलीकडे परतलों. येतांना खाणावळीचें कोष्टक भरून आल्यामुळें पुन्हां बाहेर जाण्याचें काम राहिलें नाहीं. खोलींत प्रवेश करतांच खोलीबंधूची चिठ्ठी मिळाली: 'मी दादरला जात आहें. वाट पाहूं नये.' छान, मिळेल तेवढा एकांत हवाच होता.

दार लावलें, दिवा मालवून टाकला आणि बिछान्यावर पडलों. मनांत एक विचारद्वंद्व प्रामुख्यानें थैमान घालीत होतें. त्यालाच आतां स्वैरगति मिळाली.

**पहिलें मन**—गोदावरीसारख्या सामान्य मुलीपुढें तूं एवढा भांबावलास कां, सांग पाहूं ? ती भेटली असतां तुला आनंदहि वाटत नाहीं. ती बोलणें वाढविण्याविषयीं उत्सुक होती. पण तुला तेंहि साधलें नाहीं. बोल, कां इतका गोंधळलास ?—तुला तिची भीति वाटली का ?

**दुसरें मन**—तिनें मला सिगरेट ओढतांना पाहिलें. तें व्हायला नको होतें. ती किती चपळ, सुंदर, बुद्धिमान् तरुणी आहे. ती मॅट्रिक पास झाली. आतां तिची योग्यता सर्वच बाजूंनीं वाढली. तिच्यापुढें आतां माझें तेज पडणें शक्यच नाहीं. म्हणून मी दिपलों.

**पहिलें मन**—गद्धेपंचविशींतील गाढवपणा म्हणतात तो हाच.

सिगरेट ओढणें म्हणजे कांहीं कोणाचा घातपात नव्हे, चोरी नव्हे, अधमता नव्हे. पुरुषांचा तो एक सहजधर्म आहे. त्यांत एवढें लाजण्या-भिण्यासारखें काय आहे? दुसरी गोष्ट. गोदावरीला तूं उगीच अद्वितीय मानतोस. वयांत आलेली कोणतीहि मुलगी सुंदर न् टवटवीत दिसतेच. तिच्यापेक्षां हजारपटीनें सुंदर तरुणी समाजांत आहेत! त्याचप्रमाणें तिची मॅट्रिकची परीक्षा! अगदींच तुच्छ गोष्ट. दिवसेंदिवस शिक्षण वाढतें आहे. शाळेंत जाणाऱ्या मुलींची संख्या वाढते आहे. त्यांत गोदा-वरीची जमा. तिनें एवढें विशेष काय केलें?—म्हणे तिनें मला सिगरेट ओढतांना पाहायला नको होतें?—काय, झालें काय एवढें त्यांत?—

**दुसरें मन**—तंबाकू ओढणें हें जसें पाप नाहीं, तसाच तो पराक्रमहि नाहीं; पण तें एक व्यसन आहे ही गोष्ट मात्र खरी. जगांत गोदावरी-पेक्षां वरचढ मुली नाहींत असें कोण म्हणतो?–हजारों आहेत. पण मला फक्त गोदावरीच प्रिय झालेली आहे. इतरांशीं मला कसलेंच कर्तव्य नाहीं. मी तिला प्रिय झालों होतों. ती मला प्रिय झाली होती. या देवघेवीला महत्त्व आहे. पण तींत शेवटीं मी कमी पडलों. गोदा-वरीच्या दृष्टीनें मी पतित झालों. मीं तिचा विश्वासघात केला—

**पहिलें मन**—म्हणजे?—गोदावरीचा विश्वासघात?— ही काय भानगड?

**दुसरें मन**—आम्ही पुण्याला राहत होतों, त्या वेळची गोष्ट आहे. गोदावरीनें एकदां आपल्या भावाला विड्या ओढतांना पाहिलें. तिला धूम्रपानाची चीड असावी. तिनें त्याची खूप निर्भर्त्सना केली व "आपल्या तात्याकडे बघ." असें म्हणून तिनें माझा आदर्श त्याच्यापुढें ठेवला. त्या वेळीं माझ्याविषयीं तिनें फार विश्वास व अभिमान प्रगट केला. तेव्हां विठोबा तिला म्हणाला, "अं: ! फार शेखी मिरवूं नकोस. आज

हा साळसूद दिसतो. उद्यां प्रसंग पडूं दे. हा माझ्यापुढं जाईल, दारू पिऊं लागेल आणि वाटेल ते प्रकार करील !–तात्याच्या वरच्या रूपावर जाऊं नकोस." पण विठ्ठूदादाचा हा निर्वाळा गोदावरीला पटला नाहीं. ती आग्रहानें म्हणाली, " माझा तात्या तसं नाहींच वागायचा." आणि नंतर तिनें माझ्याकडून वचन घेतलें ! त्या वचनाला मीं हरताळ फांसला. आणि ही गोष्ट गोदावरीला उमगून आली. किती वाईट झालें हें ! ती मला मनांत काय समजली असेल ? मी गोंधळलों तों यामुळें. · यावरून मला नक्की वाटतें कीं, मी गोदावरीच्या प्रेमाला अपात्र आहें. आतां मला ती अप्राप्तहि वाटते. मग मीं तिला अद्वितीय कां मानूं नये ?

**पहिलें मन**—खरें आहे. पण हें पहा. निराश होण्याचें कारण नाहीं. (चूक होणें मनुष्यस्वभाव आहे, पण ती सुधारणें हें देवत्व आहे. गोदावरी तुझ्यावर प्रेम करते ती या आंतील देवत्वावर; बाह्यवेषावर नव्हे. तेव्हां तें अभंग राखण्याचा तुला प्रयत्न नाहीं का करतां येणार ?–येईल. आपलें आपल्यावरच नियंत्रण घातलें पाहिजे आणि घसरलेला पाय सांवरला पाहिजे.

**दुसरें मन**—पण हा आत्मोद्धार गोदावरीच्या दृष्टीला कसा पडणार ? आतां ती मला स्खलित समजणार. म्हणजे माझा ती तिरस्कार करूं लागणार !

**पहिलें मन**—करीना ! तूं तिच्या प्रेमाला अपात्र आहेस असें तुला वाटतें ना ?–मग तिच्या आवडीचा आतां प्रश्नच नाहीं. तुमच्यांत आतां अंतर पडलें. तें आतां दुरावत जाणार हें गृहीतच धर. तळमळूं नकोस. तळमळीनें मन खंगतें, आणि मग तें आत्मोद्धाराकडे लागण्या-ऐवजीं वैतागून आणखी स्खलित होण्याकडे वळतें. यापेक्षां प्रेमदेवतेला साक्षी ठेवून पुढचें आयुष्य घालीव. तुझ्या आईचा व भावंडांचा

सांभाळ करण्याची जबाबदारी तुझ्यावर आहे. ती तुला पार पाडली पाहिजे. सध्यांच्या जीवनकलहांत ती अल्पस्वल्प पार पाडायची तर तुला निर्व्यसनी, उद्योगी, उत्साही असलेंच पाहिजे. (**संयमी असणें व त्याकरितां जागरूक राहणें ही गोष्ट आजकाल थट्टेचा विषय होऊं पाहते आहे. पण तशी ती नाहीं. ऐन तारुण्यांत तिचें महत्त्व कळत नाहीं. पण साऱ्या** जीवनाचा **सुस्थिरपणा संयमांत** आहे. गोदावरी तुला प्राप्त होवो अगर न होवो, तिचें स्मरण ठेवून 'तिच्याकरितां मी संयमी व सदाचारी राहीनच राहीन.' असा प्रयत्न करणें अवश्य आहे.) मुंबईसारख्या मोहमय वातावरणांत एकट्यानें राहून हें साधायचें नाहीं. म्हणून द्रव्यार्जन वाढीव आणि आईभावंडांना आणून बिऱ्हाड कर. थोडें कठीण जाईल, पण झगडलें पाहिजे. गोदावरीचें तें वाक्य डोळ्यांपुढें ठेव. **मी वाट पाहीन, फसविणार नाहीं.** ती त्याचा निकाल कसाहि लावो, तुला तें परब्रह्म आहे. पुढचें कोणीं सांगावें ?

*        *        *

बिऱ्हाड करण्याचें ठरविलें. यां वेळींहि शिवणकामानेंच हातभार लावला. आईला नेण्याकरितां गांवीं आलों. गोदावरी भावाकडे होती. मी विठोबाकडे जाऊन आलों. इतर सगळ्यांशीं मी मनमोकळेपणानें बोललों. पण गोदावरीशीं बोलण्याचें धाडसच होईना, आणि तीहि तशी अलिप्तच राहिली. मग तो परिणाम माझ्याच वर्तनाचा होता कीं काय कोण जाणे !–पण मनाला भारी लागलें तें. शेवटीं मनाची तळमळ शांत करण्याकरितां गोदावरीला एक पत्र लिहिलेंच. तें असें :—

"तुमच्या प्रेमाला मी अपात्र आहें हें माझें मलाच पटलें आहे. तेव्हां तुम्ही माझ्याकरितां वाट पाहण्याची गोष्ट मनांतून काढून टाकली असल्यास त्यांत कांहींच नवल नाहीं. मला त्याचा राग नाहीं. पण मला

पाहतांच तुमच्या कपाळाला आठी पडणार नाहीं, इतकें चांगलें राहण्याचा मात्र माझा निश्चय आहे. पुढील जीवनांत आपण दोघें कुठेंहि असूं, कुठेंहि वाहत जाऊं. पण तुमच्या मधुर स्मृतीच्या देखरेखीखालीं मी माझी जीवननौका चालवीन. या माझ्या विचाराला तुमचा आशीर्वाद मिळावा. मागच्या सर्व संबंधावर—आशा-आकांक्षेवर आतां मीं पडदा टाकला आहे. पुन्हां आपल्या गांठी-भेटीचे प्रसंग आल्यास केवळ एका सन्मित्रत्वाच्या सीमारेषेवरच आपण भेटूं-बोलूं. या पत्राचें उत्तर नको आहे. माझ्यासंबंधींच्या कांहीं कडू भावना असल्यास त्या विसरून जा, एवढीच विनंति आहे. —तात्या.''

* * *

मुंबईत बिऱ्हाड करून वर्ष सव्वावर्ष कसेंतरी निभावलें. पण त्यांत कोणालाच सुख होईना. वडिलांच्या मृत्यूनें आईनें फार हाय खाल्ली होती. त्यांत माझा विवाहबद्ध होण्याचा मानस दिसेना व मुंबईची हवा तिला सोसेना.

मुकाट्यानें राजा-बाबीसह तिला कऱ्हाडास पोंचवली. पुन्हां मुंबईला एकटाच गेलों. गोदावरीच्या विवाहाचें कुठेंतरी जुळतें असें ऐकलें !—पण—पण—ती गोष्ट मनांतून काढून टाकली.

यानंतर चारसहा महिने कसे काढले माझें मला माहीत.

इतक्यांत महात्माजींच्या मिठाच्या सत्याग्रहाची चळवळ उठली ! माझी नोकरी त्यामुळें डळमळली. तोंच कऱ्हाडहून आई अत्यवस्थ असल्याचें पत्र आलें.

कऱ्हाडास आलों. मी तर भोंवऱ्यांत होतोंच. पण कऱ्हाडास येतांच कळलें कीं, गोदावरीहि अशीच संकटग्रस्त आहे ! आबा देशपांडे पक्षघाताच्या विकारानें लुले-पांगळे होऊन पडले होते.

## प्रसंग बारावा : : : १२

गोदावरी आणि मी पुन्हां एकदां एका गांवांत, एका आळींत व सामान्यतः एका स्थितींत येऊन पडलों. परिस्थितीचा हा डाव निदान मला तरी सुखावह वाटला नाहीं. उलट, गोदावरीचें कोठेंहि जुळून न येतां ती अकारण नाडली जावी याचेंच मला सखेदाश्चर्य वाटलें. किती चमत्कारिक अवस्थेंत आमचा समाज येऊन पडला आहे ! अनुरूप वधूंना स्थळें मिळण्यास व योग्य तरुणांचे योग्य वयांत विवाह होण्यास किती अडचण पडूं लागली आहे ?–कांहीं असो. एवढें खरें कीं, दोन प्रवाहपतित काष्टें पुन्हां जवळजवळ आलीं होतीं !

घरीं आल्यावर दैव जणूं वाटच पाहत बसलें होतें. त्याच्या कृपेनें बाजारापासून चुलीपर्यंतचे सारे अधिकार माझ्या गळ्यांत पडले आणि डॉक्टर-वैद्यमंडळीशीं स्नेह वाढला.

एकदोन दिवसांनीं शिष्टाचाराप्रमाणें मी आबांच्याकडे जाऊन आलों. त्यांचें उजवें अंग निर्जीव झालें असून, जिभेवरहि परिणाम झाला होता. स्वभावतः आनंदी प्राणी. नाटकी वातावरणांत वाढलेला. पण आज लोळागोळा होऊन पडला होता. आपलें दुःख सरळपणें कथन करण्यासहि त्यांची जीभ वळत नव्हती. मला पाहतांच त्यांना गहिंवरून

आलें. आपल्या कपाळाला हात लावून बोबड्या शब्दांत त्यांनीं आपलें दुर्दैव स्पष्ट केलें. शाब्दिक सहानुभूति व भविष्यकालीन पोकळ आशा दाखविण्यापलीकडे मी काय करणार होतों. सुमारें अर्धा तास मी तेथें होतों. पण तेवढ्या वेळांत मीं जाणलें कीं, आबांच्या आजारीपणानें गोदावरी जास्त दुर्दैवी झाली आहे. हृदयशून्य व बायकोच्या आहारीं गेलेला विठोबा, त्याला डोईजड झालेली त्याची कर्कश बायको, तिच्या माहेरच्या स्वार्थी माणसांची नेहमींची ये-जा आणि चार किरकिरीं, हट्टी, लाडावलेलीं व रोगी पोरें अशा आगीमध्यें आपल्या लुल्यापांगळ्या बापाची सर्व प्रकारची सेवा करीत आयुष्य कंठतांना त्या सुसंस्कृत व सुलक्षणी तरुणीचे काय हाल होत असतील हे तिचे तिला माहीत !

माझी तिची ज्या वेळीं दृष्टभेट झाली, त्या वेळीं आम्हीं एकमेकांकडे करुणखिन्न मुद्रेनें पाहिलें व जेवढ्यास तेवढें हंसलों. औपचारिक चार-दोनच प्रश्नोत्तरें झालीं. ती आपल्या कामाला लागली व मी घराकडे परतलों. मार्गांत माझे अंतश्चक्षु बॅकबेवर भेटलेली गोदावरी व आतांची गोदावरी यांचे दोन मिश्र फोटो पाहत होते. एक अर्धस्फुट दवबिन्दूंनीं भिजलेली गुलाबकळी होती; दुसरी उन्हानें करपलेली व किड्यानें कुरतडलेली लता होती. एक दीर्घ निःश्वास सोडून अंतःकरणांत उठलेली कळ तेथल्या तेथें दाबण्यापलीकडे माझ्या हातांत कांहींच नव्हतें.

मी नसतांना व कऱ्हाडास आल्यापासून गोदावरी आमच्या घरीं येऊं-जाऊं लागली होती. आईला ती यथाशक्ति साह्य करी आणि राजा-बाबीला भावंडांप्रमाणें लेखी. त्यांना तिचा चांगला लळा लागला होता. मी आल्यावरहि तिनें आपला क्रम चालू ठेवला. माझ्याविषयीं तिच्या भावना काय होत्या, कळण्यास कांहीं मार्ग नव्हता. माझ्या मनालाहि ती नाजूक गोष्ट जाणून घेण्याचें त्राण किंवा भान राहिलें नव्हतें. दोघेंहि एकमेकांला त्रयस्थ बनलों होतों.

## प्रसंग बारावा

सर्वांचे धागेदोरे गुंतवीत बसलेला काल आमच्या सद्यःस्थितीकडे पाहून हंसत होता का ?–कोणाला माहीत ?–त्याची वाटचाल मात्र सारखी चालू होती.

अवघें सत्तावीस वर्षांचें वय व त्याचा हा एवढा व्याप ! थोडक्यांत सर्व सांगावें म्हणून विचार केला नी त्याचा इतका प्रपंच झाला. आतां पुन्हां **चवथ्या प्रसंगांत** सोडलेला धागा धरून पुढचा मार्ग आक्रमावयाचा.

*  *  *

अर्धवट बारीक केलेल्या दिव्याच्या मंद प्रकाशांत कोठें तरी शून्य दृष्टीनें पाहत गतायुष्यांत वडून गेलेलीं हीं चित्रें मी अवलोकीत होतों. पडण्याचा कंटाळा आला कीं उठून बसावें. बसून ताठकळल्यासारखें वाटलें कीं, आडवें व्हावें. पुनःपुन्हां मनांत जमलेला केरकचरा बाजूला सारीत झोंपेची प्रार्थना करावी आणि तें न साधलें म्हणजे वज्याळ पहावें. अशा गोंधळांत मीं तासचे तास काढले. माझी कल्पना आहे कीं, मी त्या रात्रीं पहाटे पांचपर्यंत जागा होतों. पुढें मग डोकें शिणलें असावें व डोळ्यावर झांपड पडली असावी.

मग मी जागा झालों तो राजाच्या हालविण्यानें. मी चपापून उठलों. डोकें अगदीं सुंद होतें. बाहेर चक्क उजाडलें होतें. बिछान्यांतून उठण्याची इच्छाच होईना. मी पुन्हां कलंडणारच होतों; तोंच राजा म्हणाला, "तात्या, आई फार कण्हते आहे रे आज—"

मी ताडकन् उठलों. 'म्हणजे' असा कांहीं उद्गार काढीत व धोतर ठाकठीक करीत मी आईकडे गेलों. तिच्याजवळ बसून तिच्या अंगाला हात लावून पाहिला. बराच ताप चढला होता. आई कण्हत होती. कसें तरी तोंड खळबळून डॉक्टरकडे पळालों. आईचें एकंदर लक्षण बरें दिसत नव्हतें. सुस्त डोळे व जड अंतःकरण !–मला कांहींच समजत नव्हतें.

## प्रसंग तेरावा : : : १३

गांठचे पैसे देऊनहि ज्यांच्यावर सत्ता चालत नाहीं, उलट ज्यांच्या-पुढें तोंड वेंगाडावें लागतें व आर्जवांचा भत्ता भरावा लागतो, अशीं कुळें दोन. वकील न् डॉक्टर ! आज मी डॉक्टरांचा बंदा होतों. त्यांच्या फीचें आश्वासन देऊन त्यांना घरीं आणिलें.

ते आले व त्यांनीं आईची प्रकृति पाहिली. नवल असें-ते माझ्याहि-पेक्षां जास्त बुचकळ्यांत पडलेले दिसले ! "एकाएकीं असं काय झालं बुवा ?"

मी मनांत म्हणालों, "अकलेच्या खंदका !-हें मला कळत नाहीं म्हणून तर तुला आणिला." पण हा आंतला विचार. बाह्यतः मला कुत्र्याच्या दीन दृष्टीनें त्यांच्याकडे पहावें लागलें व आईबद्दल करुणा भाकावी लागली.

डॉक्टरांनीं फी खिशांत कोंबीत घेडगुजरी मराठींत म्हटलें, "हें पहा त्यांचं हार्ट मोठं विक् झालंय्. तेव्हां ब्रेनवर कसलाहि इफेक्ट झाला कीं, शॉक बसतो. तेव्हां जपलं पाहिजे......आहे, मी करतों योजना. असं करा केमिस्टकडे जाऊन मी सांगतों तें औषध आणा. डोझ देऊन पाहूं. नाहींतर मग देऊं एखादं इंजेक्शन—"

डॉक्टर निघून गेले आणि त्याच सुमारास वासुकाका गडबडे आपल्या चार मित्रांसह आले. मन तयार नव्हतें. पण संवयीनें झक् मारली. त्यांना 'या' म्हणणें भाग पडलें. तोंच मामी बाहेर आल्या. त्यांनीं तर लाजत, मुरकत, आनंदोद्गार काढीत त्यांना चांगलेंच उत्थापन दिलें!—नंतर त्यांनीं मला अगदीं आंत बोलावून धन्यतादर्शक स्वरांत म्हटलें, "तात्या, वहिनींचं दुखणं बरं झालंच पाहिजे. आत्तां वासुकाका कुणाला घेऊन आले आहेत माहीत आहे का?—आपले फराळवाडीचे तूप-साखरबुवा! मोठे मोठे चांगले आहेत. ज्योतिष जाणतात. औषधपाणी जाणतात. हाताला चांगलं यश आहे त्यांच्या. शिवाय त्यांना श्रीदत्त-महाराजांचा सदा दृष्टांत होतो. चांगले साक्षात्कारी आहेत. सहज असा अंगारा काढतात, लावला कीं गुण! अंगावर तेज कसं आहे!—त्यांच्या पायांवर डोकं ठेव बरं का—" इत्यादि.

मला त्या वेळीं काय वाटलें, हें कागदावर लिहून दाखविण्यांत कांहींच अर्थ नाहीं. मी चडफडत माडीवर गेलों, कपडे केले आणि आलेल्या महाभागांच्या अंगावरून जाऊं लागलों. तोंच वासुकाकांनीं मला हटकलें. त्यांनीं मामींच्याच सांगण्याचा अनुवाद केला. तेव्हां मी त्या तूपसाखरबुवांकडे तिरस्कारानें पाहत म्हटलें, "असल्या थोतांडावर माझा मुळींच विश्वास नाहीं—" दांत-ओठ खात मी आणखी कांहीं पुटपुटलों व घराबाहेर पळालों. पण मनाला मात्र पक्कें वाटलें कीं, हे सारे लडदू आतां यथास्थित चाबा मारून जाणार. मामी स्वागत करणार न् ते करून घेणार!

रस्त्यानें जातांना संतापाचे कढावर कढ येत होते. परत घरांत जावें आणि एकेकाला लाथा घालून बाहेर काढावें असा चेव आला होता, पण आधीं आईच्या प्रकृतीकडे पाहणें भाग होतें. दारू झोकल्याप्रमाणें

उन्माद चढला असतांहि केमिस्टकडे जाऊन डॉक्टरनीं सांगितलेलें औषध खरेदी केलें न् दवाखान्यांत गेलों, आणि पुन्हां आर्जवांची खंडणी भरून घराकडे परतलों.

घरांत प्रवेश करण्याचा अवकाश ! कल्पना केल्याप्रमाणें थाट चालला होता. शिऱ्याच्या बशा, चहाचे पेले, केळ्यांची फणी, एक आटीव दुधाचा वाडगा असे जिन्नस सर्वांपुढें नुकतेच आले होते. माझी आई अत्यवस्थ असल्याचें कोणाच्याहि ध्यानींमनींसुद्धां नव्हतें.

मी मुकाट्यानें आंत घुसलों आणि आईकडे गेलों. संतप्त कान ओटीवर होते. सर्वांचीं तोंडें मामींनीं केलेल्या स्वागतांत गुंग होतीं व धन्य झालेल्या मामी दाराशीं उभ्या राहून पाहत होत्या. राजा-बाबींना कुठें धुडकावून लाविलें होतें देव जाणे !

" मामी म्हणजे काय लाख मनुष्य आहे." वासुकाका म्हणाले.

" अन् स्वभाव मोठा परोपकारी ! " दुसरें तोंड बोललें.

" तात्याच्या या संकटांत वावासारख्या धांवून आल्या."

" लोकांचा संसार आपला मानून शरीर झिजवणं हेंच संतांचं लक्षण—" बुवा ढेकर देत म्हणाले, " जे कां रंजिले गांजिले ! त्यांसि म्हणे जो आपुले—म्हटलंच आहे—"

मला वासुकाकांनीं हांक मारली. मीं ओ दिली नाहीं. तेव्हां तेच आंत आले. " वहिनींची तब्येत आतां बरी आहे ना ?—बरी दिसतेच आहे. हा अंगारा लाव एवढा—" त्यांनीं एक पुडी टाकली. नंतर ते म्हणाले, " जरा बाहेर ये कीं रे—"

माझें सौजन्य मघांच ठार झालें होतें. मीं घोगऱ्या आवाजांत त्यांना धुडकावलें. पुन्हां माझ्या मनांत काय आलें कोणास माहीत, मी बाहेर ओटीवर आलों.

" हं, काय म्हणत होते डॉक्टर ?—" एकानें सहज प्रश्न केला.

मीं एकदम म्हटलें, " डॉक्टर म्हणत होते कीं, आज तुमच्या घरीं पहिल्यांदा जे लोक येतील, त्या प्रत्येकाला हजार पायपोस मारा आणि त्यांत एखादा बुवा असल्यास त्याची चरबी काढून तीं आईच्या अंगाला चोळा. ती लख्ख बरी होईल. बेशरम गधडयांनो ! तुम्ही माणसें आहांत ?—माझी आई मरणाच्या दारांत पडली आहे आणि तुम्ही इकडे शेण खातां आहां ! ती थेरडी तुमचं स्वागत करणार न् तुम्ही करून घेणार ! मुकाट्यानें घराबाहेर होतां, कीं सडकूं एकेकाचें टाळकें—" आणि मी भराभर शिव्या मोजूं लागलों !

पांच मिनिटांत गर्दी खलास झाली !

मामी दारांत आल्याच होत्या. लागलीच मी त्यांच्याकडे वळलों आणि त्यांचीहि पूजा बांधीत त्यांना फर्माविलें, " हं आटपा, आपलं बिऱ्हाड उचला !—मला तुमच्या साह्याची एवढीहि जरूर नाहीं. अगदीं एक शब्द बोलूं नका. नाहींतर लाथा मारून घालवून देईन !"

पंधरा मिनिटांत त्या थेरडीला घराबाहेर काढली !

राजा-बाबी घरांत आलीं होतीं. तीं माझा अवतार पाहून व एकंदर प्रकार पाहून घाबरूनच गेलीं होतीं, पण त्यांना मी कांहीच बोललों नाहीं. स्वस्थ माडीवर जाऊन पडलों. मला कोणाची गरज नव्हती. साऱ्या जगाची राखरांगोळी झाली तरी हरकत नाहीं, इतका मी बेभान—बेफाम बनलों होतों !

**गांवांतील अफवा**—लखूनानांचा तो मुलगा तात्या ! त्याचं डोकं फिरलं म्हणे ! अरेरे ! **डोकं फिरण्याचं कारण काय ?**—" अहो

बोलण्यासारखी गोष्ट नाहीं ती. आईचा आजार हें सांगायचं निमित्त. आंतलं रहस्य अगदीं वेगळं आहे...सांगतों काय, आबा देशपांड्यांची ती पोरगी—हं—त्यांची ती पुण्यापासूनच भानगड आहे म्हणे !—सुधारणा आहे ही !—शिकवा म्हणावं पोरींना !...डोकं फिरायला कारण झालं !–हा लेकाचा दिवसाढवळ्या त्या पोरीला घेऊन माडीवर बसूं लागला. तें त्याच्या त्या मामीनं पाहिलं !—बिचारी आपलं घर टाकून यांना अन्न घालायला म्हणून आली. या बहाद्दरानं तिला मारहाण करून बाहेर हाकलली !–कलियुग म्हणतात तें हें !...

**विठोबाची चिट्ठी**—याद राखून असा. पुन्हां आमच्या घराची पायरी चढाल तर तोंड फुटेल !

**गोदावरीचें पत्र**—आपल्या प्रकृतीसंबंधी मी भलतेंसलतें ऐकतें. माझा त्याच्यावर विश्वास नाहीं. पण मनाला मात्र काळजी वाटते. खरंच ! आपण इतके कां बरं वैतागलां ?—आपण अत्यंत तापत्रयांत आहां हें मी जाणतें. पण भडकून कसं चालेल ? याच वेळीं शांत राहायला नको का ? मी धांवत येणार होतें. पण मला यायची बंदी केली आहे. काय करूं मी ?–राजा-बाबी भांबावून गेलीं आहेत. त्यांना कोण सांभाळणार ?–येऊं का मी ?—जगाच्या बकव्याची मला पर्वा नाहीं !—ठेवलेली बाई म्हणतात. बाजारबसवी म्हणत नाहींत, हेंच मी भाग्य समजतें. माझ्या अब्रूची चिंता वाहूं नये. ती आपल्याचकडे सुरक्षित आहे. जगाच्या जिभेनें कोणाची निंदा केली नाहीं ?—चालूं दे. मी काय करूं तें कळवावं. माझं साह्य घ्यायचंच नाहीं, असा पण नाहीं ना ?–कांहीं असलं तरी शांत राहावें एवढंच विनवितें.

गोदावरी.

## प्रसंग चवदावा : : : १४

मनाला भयंकर चीड येईल असाच हा प्रकार घडला होता. पण त्या सर्वांवर गोदावरीच्या सहानुभूतिपूर्ण पत्रानें विरजण घातलें होतें. तिच्या सद्यःस्थितीमध्यें तिला इतकी शांति कशी धरतां येते, याचेंच मला नवल वाटलें. मीं तात्काळ तिला उत्तर लिहिलें व तें राजाच्या हातीं तिच्याकडे धाडून दिलें. त्यांत मीं तिचें मन दुखविल्याबद्दल तिची मनःपूर्वक क्षमा मागून तिचें साह्य स्वीकारण्याचें मान्य केलें होतें.

मग एका दुपारीं गोदावरी सवडीनें आमच्या घरीं आली. माझी इच्छा नसतांहि तिनें घरांतील पुरुषी गोंधळ नाहींसा करून सारी व्यवस्था नीट लावून दिली. आई साधारण बेभान स्थितींत असून तिच्या दुखण्याचें पाऊल पुढेंच पडत चाललें होतें. यामुळें गोदावरीचें आगमन तिला उमगलें नाहीं. राजा शाळेलाच गेला होता. बाबी मात्र आपल्या ताईच्या मागें लुगूलुगू करीत हिंडत होती.

तासाभरानें आम्हीं अगदीं मोकळ्या मनानें बोलत बसलों. त्यांत गोदावरीच्या सुविचारी व धीट मनाचा मला आणखी उलगडा पडला.

तिच्या म्हणण्याचा आशय असा होता : आपल्या प्राक्तनानें आपल्याला अडविल्यावर जगावर चिडून काय होणार? उलट, जग आणखी तेलच ओतणार! आपल्या मनाला आपण जबाबदार राहिलें म्हणजे झालें. जगानें उडविलेल्या चिखलापेक्षांहि आपल्या मनाचा चिखल जास्त भयंकर असतो. त्याला जपलें पाहिजे. जग उगीच भुंकणाऱ्या कुत्र्या-प्रमाणें आहे. प्रत्यक्ष लचका तोडण्याचें त्याच्यामध्यें सामर्थ्य नाहीं. मग आपण कां भ्यावें?—

विचारांतीं गोदावरीची ही शिकवण मला सर्वस्त्रीं पटली. आपल्या मनांत गढूळ माजलें नाहीं म्हणजे झालें. मग जगाच्या रागालोभाची पर्वा काय? किती सुंदर विचार होता हा!

* * *

यानंतर सुमारें पंधराच दिवसांनीं आईचें देहावसान झालें! मृत्यूनें आपला अपेक्षित घांस उचलून नेला आणि आम्हांस निराधार केलें! राजा-बाबींला सांभाळण्याचा पत्कर गोदावरीनें घेतला असल्यामुळेंच त्या प्रसंगांतून मी कसातरी निभावलों, नाहींतर भोंवतालच्या कोलाहलमय जगांत मी अगदीं एकटा होतों. माझ्याविषयीं कोणालाच सहानुभूति वाटत नसेल असें मला म्हणावयाचें नाहीं. पण माझें डोकें बिघडलें आहे, ही समजूत सर्वत्र पसरली असल्यामुळें जो तो त्या दृष्टीनें माझ्या-कडे पाही आणि त्यामुळें मला कसेंसें वाटून मी तुसड्याप्रमाणें वर्ते.

जगाच्या समजुतीप्रमाणें माझें माथें बिघडलेलें नसलें तरी त्या कालांत मी एकंदरींत शून्यमनस्क बनलों होतों, ही गोष्ट मात्र खोटी नव्हती. कुठेंतरी गोळाभर अन्न खावें, कोणाशीं चकार शब्द न बोलतां घरीं यावें न् तास तास आढ्याकडे पाहत पडावें. या स्थितीचा कंटाळा आला कीं उठावें. उन्ह असो नाहींतर संध्याकाळ असो, दूर भटकण्यास जावें. त्या स्थितींत मी विचार तरी काय करीत होतों, हें मला आतां नीटसें आठवत नाहीं. मीं मागें सांगितल्याप्रमाणें मनाचा चोरबाजारच होता तो.

आतां कांहीं कांहीं स्मरतें. पहिली गोष्ट, आईचा मृत्यु झाल्यानंतरची. पडलेलें प्रेत उचलून स्मशानांत न्यायचें कोणीं?—आळीकर आले, हळहळले, हळूहळू निसटले! पण पुढें होऊन व मला धीर देऊन अंत्यसंस्काराची खटपट करण्यास बहुश: जो तो मागें?—कां बरें असें असावें? माझ्याच बाबतींत हा अन्याय घडला होता, असें मी मुळींच म्हणत नाहीं. पण ब्राह्मणसमाजाचा मला जो या संबंधांत अनुभव आहे तो फारसा स्पृहणीय नाहीं.

थोडा विचार केला म्हणजे हें कळेल कीं, ज्याच्या घरीं एखादा मृत्यु घडतो, तो तावत्काल तरी हीनदीन झालेला असतो. अशा वेळीं त्याची उपेक्षा करणें बरें का?—पण खरेंच सांगतों, अशा वेळीं आमचा समाज भारी उदासीन राहतो. संघटनाच्या दृष्टीनें बरें का हें?

बरें, आम्हांला श्रमाची, धांवपळीची लाज किंवा भीति वाटते म्हणावें तर तसेंहि नाहीं. माझी आई वारली त्या वेळचाच अनुभव सांगतों.

सत्याग्रहाची चळवळ जोरांत होती ! प्रत्येक प्रकारच्या सत्याग्रहास नवेंनवें उधाण येत होतें. 'भारतमाता की जय, स्वतंत्रता की जय, इन्किलाब झिंदाबाद' इत्यादि आरोळ्यांनीं आकाश दुमदुमून गेलें होतें. सरकारास आपण डवचतों केव्हां, तें आपल्यावर संतापून आपणांस पकडतें केव्हां आणि एकदां आपण तुरुंगांत जाऊन पावन होतों केव्हां, असें ज्याला त्याला झालें होतें. तो चरखा, ती टकळी, तो तिरंगी झेंडा, तो खादीवेष, त्या सभा, छे छे, एक कीं दोन प्रकार सांगावे. त्या वेळीं सैतानी सरकारच्या नांवानें जो न ओरडेल, जो गाजावाजा न करील तो-तो---देशद्रोहीच ! टकली चलाचलाके, लेंगे स्वराज्य लेंगे !— खरेंच ! राज्यें कमावतांना व घालवितांना हजारों डोकीं फुटलीं, रक्ताच्या नद्या वाहिल्या, कुटुंबेंच्या कुटुंबें उध्वस्त झालीं आणि देश बेचिराख झाले ! असें इतिहास सांगतों आणि आम्ही गात होतों-'तकली चलाचलाके लेंगे स्वराज्य लेंगे !' आपण काय करतों, काय बोलतों, कसें वागतों, याचा अर्थ तरी कळत होता का आम्हांला ?

माझी त्या वेळीं दृष्टि नीट होती कीं नाहीं, याचा मला संदेह आहे. मी आपल्याच परिस्थितीनें पिचलों असल्यामुळें मला वस्तुस्थिति आकलन करतां आली नसेल, असेंहि असेल कदाचित्. पण मला अद्यापिहि वाटतें कीं, आम्ही लोक पुरे दुधखुळे तरी आहों किंवा तमासगीर तरी आहों ! कामाचे डोंगर उभविण्याच्या बाता आम्ही मारतों, आवहि आणतों, पण प्रत्यक्षांत पाटीभर मातीच्या ढिगाएवढेंहि काम आमच्याकडून होत नाहीं ! **एकोपा, शिस्त, संघटना, स्वातंत्र्य, वीर-**

**वृत्ति, सर्वस्व-त्याग**–केवढे जाडे जाडे शब्द आहेत हे ! आमच्या जिभे-वर कसे सहज नाचूं शकतात ! पण शब्दच ते ! त्यांना किंमत किती ?–**शब्द बापुडा केवळ वारा !**

......अरे पण मी कोणीकडे तरी वाहवलों बरें का ! माझ्यापुढें भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न नव्हता. कसातरी जिवंत राहूं पाहणारा क्षुद्र जीव मी. मी देशोद्धाराच्या कसल्या वल्गना करणार ? दोन भावंडांना सांभाळून त्यांना वाढविण्याची जबाबदारी माझ्यावर होती. त्या ओझ्याखालींच मी गुदमरून गेलों होतों. माझा प्रश्न होता–पुढें काय करायचें ? जागेपणीं आणि झोंपेंतसुद्धां मी हाच प्रश्न सोडवीत होतों. तिघांच्या उदरंभरणाकरितां कांहींना कांहीं चटकन् उद्योग करण्यास लागण्यांतच माझा सारा पुरुषार्थ सांठविला गेला होता.

काय करायचें ?–नोकरी ?–कुठें आहे ती ? मुंबईस. राजा-रात्रीची सोय ? आप्त औषधाला नव्हता, हें म्हणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. पुष्कळ होते. पण कठिण समय येतां कोण कामास येतो !–कऱ्हाडांतच शिंप्याचें दुकान थाटलें तर–छे. या जगांत आपली नाचक्की झाली आहे. आपणाला तें अप्रिय आहे ! कुठेंतरी दूरदूर गेलें पाहिजे. पण कुठें ?–पण कुठें ?

आणि अशाच चिंतेंत असतां हृदयाला आणखी एक घाव बसला !

## प्रसंग पंधरावा : : : १५

हो. त्याचें असें झालें—आईच्या मृत्यूनंतर पंधरा दिवसांनींच मी राजा-बाबीला घरीं घेऊन आलों. याला दोन कारणें होतीं. पहिलें कारण असें कीं, मला एकट्याला बिलकुल करमत नव्हतें. आणि दुसरें म्हणजे गोदावरीला आणखी किती त्रास द्यायचा ? हा प्रश्न होता. तिला तिचा व्याप व ताप कांहीं थोडा नव्हता. तिला परकें मानलें नाहीं तरी ती परकीच होती. साध्या व्यवहाराच्या दृष्टीनें सुद्धां तिच्या सौजन्याचा आतां आणखी लाभ घेत राहणें बरें नव्हतें.

आईवांचून असलेल्या घरांत राजा-बाबी काळ कशीं कंठणार व मी त्यांना मातृहृदयाचा ओलावा देत कसें सांभाळूं शकणार ? हा माझ्यापुढें मोठा प्रश्न होता. पण आलेल्या प्रसंगाला कसेंतरी तोंड देण्यावांचून गत्यंतर नव्हतें, म्हणून त्यांना घेऊन आलों व नवा संसार करूं लागलों. ध्यानांत घेण्यासारखी गोष्ट अशी कीं, आई अंथरुणाला खिळल्यापासून राजा-बाबी जितकीं सालस बनलीं होतीं, त्याच्यापेक्षां अनेकपटीनें जास्त तीं आतां बनलीं होतीं. त्यांनाहि एक विशेष शहाणपण आलें होतें.

असा बनाव घडून आल्यानंतरची गोष्ट. कऱ्हाडाबाहेर कुठेंहि नोकरी किंवा शिवणकामाचें दुकान घालण्याची सोय असल्यास शोध घ्यावा,

या हेतूनें सर्वत्र बराचसा पत्रव्यवहार करून त्यांच्या उत्तराची अपेक्षा करीत होतों. राजा पुन्हां शाळेंत जाऊं लागला होता. बाबीचें शेपूट मला चिकटलें होतें. भोंवतालचें स्त्रीपुरुष-जग फारसें निर्घृण नव्हतें, पण त्यांच्यापुढें माझ्या वेडाचा व माझ्या न् गोदावरीमधील भल्याबुऱ्या संबंधाचा मोठा प्रश्न होता. तो सोडविण्याचें काम तें आस्थेनें करीत होतें, आणि मधून मधून माझ्याकडून कांहीं सुगावा लागल्यास पहावें म्हणून मला डवचत होतें. अशा वेळीं चिडण्यापेक्षां उदासीनता दाखविणें विशेष सोयीचें असतें, हें शहाणपण मी गोदावरीकडून उचललें होतें व तें उपयुक्तहि ठरलें होतें. तात्पर्य, जीवनाचें कोष्टक कसें तरी भरीत होतों.

आणि अशा स्थितींत ती गोष्ट घडली.

दुपारीं दोनचा सुमार असावा. बाबीला घेऊन माडीवर पडलों होतों. बाहेर उन्ह मी म्हणत होतें. बाबी झोंपली होती. मीहि गुंगींतच होतों. कांहींतरी स्वप्न पडत होतें. इतक्यांत हुंदक्याचा स्वर कानीं आला. दचकून उठलों. बाबीकडे पाहिलें. ती स्वस्थ झोंपली होती. थोडें नवल वाटलें. स्वप्नांपैकींच कांहींतरी प्रकार आहे असें मानीत पुन्हां लवंडलों. पण लौकरच खालीं कोणीतरी रडत आहे असें स्पष्ट वाटलें. चटकन् खालीं आलों. आई वारलेल्या खोलींतून अगदीं केविलवाणा क्रंदन-स्वर येत होता : "ए आई–आई–ग !–कांग आम्हांला तूं सोडून गेलीस ! ए आई–ए आई–" मीं जाणलें. राजा रडत होता.

हलक्या पावलांनीं मी खोलीशीं गेलों व आंत डोकावलें. राजाच होता. आईची एक जुनी चौपदरी त्यानें पांघरून घेतली होती आणि गुडघ्यांत मान घालून तो मुसमुसून रडत होता. ज्या स्थानावर आईची शय्या पसरलेली होती, त्याच जागेवर तो नेमका बसला होता. तो देखावा पाहतांच माझ्या काळजांत चर्र झालें. क्षणभर तरी आपण काय

करावें, हें मला सुचेना. आई मेल्यापासून आतांपर्यंत मीं आपल्या दुःखाचे आवेग अनेकदां दाबले होते. वयोमानाप्रमाणें व शिक्षणसंस्कारामुळें मी भडभडून असा कधींच रडलों नव्हतों. राजा-बाबींची मातृहीनता फार तीव्रतेनें जाणवत असतांहि त्यांचें अवसान जाऊं नये म्हणून मीं स्वतःचे आंतले कढ आंतल्या आंत दाबून टाकले होते. पण राजाची ती शोकाकुलता पाहतांच माझें अवसान गळालें. वाटलें : आपणहि आई--आई म्हणून हंबरडा फोडावा !

तो क्षण मीं कधींच विसरणार नाहीं.

अक्षरशः स्वतःचें तोंड दाबून धरीत मी कसातरी राजाजवळ गेलों, खाली बसलों न् त्याच्या पाठीवर हात टाकीत गुदमरलेल्या स्वरांत म्हटलें, "राजा—"

दुःखांत चूर असलेला राजा एकदम चपापला. त्यानें मान वर करीत मजकडे अपराधी मुद्रेनें पाहिलें. आपले हुंदके दाबण्याची पराकाष्ठा करीत तो म्हणाला, "तात्या-- तात्या, रडल्यावांचून राहवत नाहीं रे ! आईची आठवण झाली म्हणजे इथं पोटांत कसंतरी होतं !—काय करूं रे मी." गालावर अश्रू ओघळत होते. मुद्रा अत्यंत दीन झाली होती आणि ओंठ कांपत होते.

मीं त्यास जवळ घेत म्हटलें, "मग राजा रड तूं. खरंच रड—" पुढें माझा हुंदकाच बाहेर पडला ! त्याबरोबर राजाचे हात माझ्या गळ्यांत पडले व त्याचें मस्तक माझ्या बाहूंत आलें. त्याला कुरवाळून धरलेल्या माझ्या हातावर त्याचे अश्रू पडले व मी त्याच्या मस्तकावर अश्रू ढाळूं लागलों.

सुमारें पाव घटका तरी आम्हीं दोघे भाऊ जगाच्या अस्तित्वाची

जाणीव न ठेवतां मनमोकळेपणानें रडलों !—रडण्यांतसुद्धां केवढें समाधान आहे, हें मला तेव्हां कळलें !

नंतर मीं स्वतःला आवरलें. धोतराच्या सोग्यानें स्वतःचें नाकतोंड पुसलें आणि नंतर राजाचें पुसत म्हटलें, "राजा, आतां आपण थोडं शहाणं आणि मनानं थोडं धटमुट झालं पाहिजे बरं का. तेव्हां मी काय सांगतों तें ऐक. हें पहा ! तूं असा रडत बसलास तर मलाहि राहवणार नाहीं. आणि जर आपण दोघेहि असे रडत बसलों न् तें आपल्या बाबीनं पाहिलं तर ? ती रडून आकांत करील. मग तिला समजावणं आपल्याला साधेल का ?—नाहीं साधायचं. मग आपण किती संकटात सांपडूं बरं ! म्हणून आपण मन घट्ट करून वागायला शिकलं पाहिजे."

राजा शांतपणें म्हणाला, "पण मी तिच्यासमोर असा रडणारच नाहीं. खरं सांगूं का तात्या, आज किनी राहवलंच नाहीं. मधली सुट्टी झाली न् शाळेबाहेर आलों. आपली आई नसल्याचं लक्षांतच नव्हतं. धांवत उड्या मारीत घराकडे आलों. दरवाज्यांत आलों न् आठवलं कीं, आपली आई देवाघरीं गेली !—मग तात्या, नाहीं राहवलं—" त्याची मुद्रा पुन्हां शोकाकुल झाली.

मीं त्याची पाठ थोपटीत त्यास धीर देत म्हटलें, "तसं व्हायचंच तें. तूं लहान आहेस राजा. तुला असं मधून मधून वाटायचंच बरं. पण आपण बाबीकडे पाहून वागलं पाहिजे. आई गेली ती कांहीं परत येत नाहीं. मलाच आतां आईच्या ठिकाणीं मानायचं बरं का. मी तुमचा दोघांचा अगदीं प्रेमानं सांभाळ करीन—"

राजानें माझ्या दृष्टीला दृष्टि लावीत एकदम विचारलें, "खरंच तात्या, तूं आम्हांला कधीं कधीं सोडणार नाहींस—विसरणार नाहींस ?—"

त्याच्या त्या प्रश्नांत संशयाची छटा स्पष्ट होती. तिचें मला नवल वाटलें, म्हणून मीं त्यास उलट विचारिलें, "मी तुम्हांला विसरेन-सोडून देईन-असं तुम्हांला वाटतं ?-"

आपलें बोलण्यांत कांहीं तरी चुकलें, असें राजाला वाटलें. तो किंचित् गोंधळला. त्याला बोलण्याची पंचाईत पडलेली पाहून मीं त्यास चुचकारीत म्हटलें, "राजा, तुझ्या-माझ्यांत सतरा वर्षांचं अंतर असलं व तूं लहान असलास तरी भाऊ या नात्यानें माझ्या बरोबरीचाच आहेस. मला तूं उगीच भिण्याचं कारण नाहीं. म्हणून मी तुला मनमोकळेपणानेंच विचारतों. तुझ्या मनांत कसली शंका आहे माझ्या-बद्दल ?-मी तुम्हांला सोडीन असं का वाटतं ?-बोल, अगदीं मनातलं बोलून टाक. मी तुझ्यावर मुळींच रागावणार नाहीं.—"

राजा किंचित् हंसला व लाजला. तो म्हणाला, "तसं कांहीं नाहीं रे तात्या. पण मामी आपली ती खादाड ढमाली नेहमीं म्हणायची कीं, आज तात्या गोड वाटतोय् पण आई मेल्यावर बघा म्हणावं. कुत्रा हाल नाहीं खाणार तुमचे. तात्याचं एकदां लगीन होऊं दे. मग राजा-भाऊंच्या हातांत मधुकरीचं फडकंच !-अन् आपली आई म्हणायची कीं, मी मेल्यावर तात्याचं बंधुप्रेम दिसेलच. म्हणून वाटतं कीं-मला तें खरं नाहीं वाटत-" राजानें बोलतां बोलतां वळण मारलें.

अस्सें !-मामीनें ही विषाची पेरणी करून ठेवली एकूण ! आणि स्त्रीस्वभावानुरूप आईनें त्यांत भर घातली ! छान ! राजाच्या कोवळ्या मनावर त्यांनीं जगाच्या भेसुरतेचा असा शिक्का मारून ठेवला म्हणायचा ! मला मोठा उद्वेग वाटला. मी राजाला कांहींच बोललों नाहीं. डोकें चोळीत उठलों आणि इकडे तिकडे फिरूं लागलों. राजाला वाटलें, लेकाचें कांहींतरी तंत्र बिघडलें-म्हणून तो माझ्याबरोबर फिरत

पोक्तपणानें म्हणाला, " तात्या, तूं आम्हांला सोडणार नाहींस हें नक्की. पण आम्हीहि तुला एवढासुद्धां त्रास देणार नाहीं. बाबीचं काम मी तुला एवढं-एवढं पडूं देणार नाहीं आणि वहिनी आल्यावर त्यांच्या अगदीं अर्ध्या वचनांत राहीन. पहा, पाहिजे तर—"

बिचारें दहा वर्षांचें भाबडें पोर! भावी काळांत व भेसुर जगांत आपला निभाव कसातरी लागावा म्हणून आपल्या शक्तिबुद्धीप्रमाणें मला शरणचिठ्ठी लिहून देत होतें!–तो इतका सालस कां? तो बाबीला इतकें कां सांभाळतो? आणि माझ्या सेवेंत इतका तत्पर कां असतो? त्याचें हें कारण होतें. त्याला जगायचें होतें व तें याच पद्धतीनें जमेल असें त्यास वाटत होतें.

जीवन! जीवन!!–किती विचित्र आहे!

मीं राजाला पुन्हां जवळ घेतलें आणि शांतपणें म्हटलें, " राजा, मामीनं किंवा आईनं माझ्याबद्दल तुला जें कांहीं सांगितलं तें सगळं विसरून जा—" मी किंचित् थांबलों. नंतर पुढें म्हणालों, " राजा, तुझ्या व बाबीच्या गळ्याची शपथ घेऊन मी सांगतों कीं, मी तुमचं रक्षण करीन आणि तुम्ही मोठीं होईपर्यंत लग्नच करणार नाहीं—"

राजा लहान खरा, पण त्यालासुद्धां माझें हें शेवटचें वाक्य कसेंसें वाटलें. तो एकदम म्हणाला, " छे, तसं नको बुवा. तुला लगीन केलंच पाहिजे तात्या—"

मीं नवलानें प्रश्न केला, " कां? तुमच्या-माझ्यांत बिघाड करणारी ती भानगड पाहिजेच कशाला मुळीं?–" राजाला वाटलें खरेंच ती भानगड नसलेलीच बरी. तो विचारी मुद्रा करीत खिडकीजवळ गेला व बाहेर पाहूं लागला. मी दुसऱ्या खिडकीशीं थांबलों.

इतक्यांत राजाला कांहीं तोड सुचल्याचें दिसलें. तो एकदम म्हणाला, " तात्या, असं केलं तर ?

" काय ? "

राजानें किंचित् संकोचत हंसऱ्या मुद्रेनें विचारिलें, " आपल्या गोदुताईलाच तूं बायको करून कां घेत नाहींस ?–त्या इतक्या चांगल्या आहेत—"

मी स्तंभितच झालों. राजाकडून असा कांहीं प्रस्ताव येईल, अशी मला कल्पनासुद्धां नव्हती. मी कांहीं बोलत नाहीं, असें पाहून राजाच पुढें म्हणाला, " आमच्यावर त्या भारीच प्रेम करतात. त्यांच्या घरांत किती भानगडी आहेत म्हणतां. ते विठूदादा आहेत ना, त्यांची बायको म्हणजे आपल्या खादाड मामीचा नमुना बघ. मामी थोड्या गोडबोल्या होत्या. पण ही म्हणजे महांकाळी तोफ आहे नुसती. आपल्या नवऱ्याला ती चक्क नंदीबैल म्हणते आणि विठूदादा नुस्ता हंसतो !— गोदुताईना तर इतकीं बोलणीं खावीं लागतात ! पण त्या कांहीं नाहीं, तोंडांतून एक शब्द काढीत नाहींत. फार त्रास झाला म्हणजे उपास करतात न् पुस्तक वाचीत बसतात—"

मीं एकदम म्हटलें, " गोदावरी उपास करते ?–"

" हो. काय करतील बिचाऱ्या ! सुखाचा वांस मिळेल तर कीं नाहीं ? आबा लुळेपांगळे. त्यांना धड बोलतांसुद्धां येत नाहीं. भारी त्रास बाबा तिथं. त्या वहिनींचा सदा कडकडाट ! आम्हांला गोदुताईनीं नेलं ही गोष्ट वहिनींना मुळींच आवडली नाहीं. त्यांनीं थैमान केला नुस्ता. पण गोदुताईनीं काय केलं माहीत आहे का ?–आम्हांला त्यांनीं स्टोवर सैंपाक करून जेवूं घातलं. त्यामुळं वहिनींची अशी जिरली–" राजा

मध्येंच थांबला. गोदावरीच्या कष्टी जीवनाचें प्रत्यक्ष वर्णन ऐकून माझें मन अगदीं क्षुण्ण बनलें. मी विमनस्क झालों व खिडकीबाहेर पाहत राहिलों. ही माझी विमनस्कता पाहूनच राजानें बोलणें थांबविलें होतें.

गोदावरीच्या दुःखांत माझ्यामुळें भर पडली, ही जाणीव कांट्याप्रमाणें हृदयांत खुपली !

इतक्यांत राजानें प्रश्न केला, "तात्या, ठेवलेली बाई म्हणजे काय रे ?—

मीं चपापून त्याच्याकडे पाहत म्हटलें, "ठेवलेली बाई ?—"

राजा म्हणाला, "आपल्या आळींतल्या पुष्कळ बायका कांहीं-बाहीच कुजबुजतात. गोदुताई म्हणे तुझी ठेवलेली बाई ! आणि तूं म्हणे त्यांचा सोदा-काय रे याचा अर्थ ?-"

काय सांगणार मी ! मी उद्वेगानें हंसलों व म्हणालों, "राजा, खरं म्हणजे या शब्दाला कांहींच अर्थ नाहीं. पण मला वाटतं, ज्या अर्थी जग असं कांहीं बडबडतं, त्या अर्थी त्याला कांहीं अर्थ असलाच पाहिजे. राजा, तो अर्थ असा आहे-गोदुताई या साक्षात् देवता आहेत व मी त्यांचा एकनिष्ट भक्त आहें. राजा, भक्ताकरितां देव धांवतो. देव भावाचा भुकेला आहे, असं तूं कुठंतरी केव्हांतरी ऐकलं असशीलच. गोदुताईनीं तसा आपला प्रतिपाळ केलेला आहे आणि म्हणून मी त्यांचा भक्त आहें."

मी हें कांहींतरी बडबडलों, पण नवल असें, राजाला तें पटलें. तो म्हणाला, "खरंच तात्या, गोदुताई देवासारख्याच आहेत. मला व बाबीला त्या भारी आवडतात. म्हणून मी म्हणतों तूं त्यांनाच बायको करून घे—"

इतक्यांत बाहेर कोणाची तरी हांक ऐकूं आली.

## प्रसंग सोळावा : : : १६

मी गडबडीनें ओटीवर आलों, तों अंगणांतून घरांत शिरत असलेलीं चारपांच माणसें दिसलीं. मी आश्चर्यांत बुडून गेलों. तीं माणसें म्हणजे विठोबा, त्याची पत्नी, पोक्त वयाची एक विधवा बाई आणि वासुकाका इतकीं थोर माणसें असून शिवाय आमच्या राजाच्या वयाचा एक ब्राह्मणाचा पण खेडवळ मुलगा होता.

या तांड्याला पाहून मी गोंधळूनच गेलों. नित्याच्या संवयीप्रमाणें मीं त्या लोकांना 'या' म्हटलें; पण विठोबाचें दाम्पत्य माझ्या घराकडे, ही कल्पनाच मोठी अद्भुत होती.

राजाच्या साह्यानें मीं ओटीवर एक जाजम पसरलें. वासुकाका, विठोबा व तो मुलगा येऊन बसले. विठोबाची पत्नी व ती पोक्त बाई माजघरांत शिरून दाराशींच बसलीं. राजा नवल करीत मला विचारून शाळेंत गेला.

वासुकाकांनीं जाजमावर थाप मारीत मला बसण्यास सांगितलें.

मी बसल्यावर ते म्हणाले, "विठोबांची न् तुमची पूर्वीची दोस्ती आहेच. ते एका महत्त्वाच्या कार्याकरितां तुमच्याकडे आले आहेत. त्यांचें म्हणणें ऐकून घ्या न् रुकारच भरा. आतां लग्नाची गोष्ट दिरंगाईवर टाकण्यांत अर्थच नाहीं."

मी चपापलोंच. माझें लग्न जुळून येण्याची विठोबाला काळजी ?–

गोदावरीचा प्रश्न काढणार कीं काय ? मग या तिऱ्हाईत बाई कोण आल्या आहेत ? मी कांहीं बोलत नाहीं असें पाहून विठोबा म्हणाला, " विचारांत पडण्याचं कारणच नाहीं तात्या. स्थळ अगदीं मनपसंत आहे. आमच्या मंडळींची एक मावसबहीण आहे. आहे अठरा वर्षांची. जरा खेड्यांत वाढली आहे पण नीटस आहे. घरचं वळण बाळबोध आहे. तुम्हांला फार पसंत येईल."

मी एखादा शब्द तोंडांतून काढणार तोंच आमच्या वहिनी म्हणाल्या, " मुलगी आमच्या इथं आगलीच आहे. असे पाहायलाच चला."

काकांनींहि या गोष्टीला दुजोरा दिला आणि ते म्हणाले, " मुलीचा बाप गतवर्षींच वारला. घरची आपली गरिबीच आहे. हा मुलगा मुलीचा भाऊ. द्वारकाबाई ( आलेल्या बाई ) फारच नडलेल्या आहेत. सारख्या वणवण फिरताहेत स्थळाकरितां. त्यांना आपण संकटमुक्त केलं तर त्यांच्यावर मोठे उपकार होतील व तुमचंहि घर उभं राहील. हें पहा तात्या, आतां उगीच असा विचारांत पडूं नकोस. हूं म्हणायचं. नांवाला मुलगी पाहायची न् लगेच याद्या करायच्या.–काय द्वारकाबाई, तुमची आहे ना तयारी ? आठपंधरा दिवसांत लाभेल तो मुहूर्त धरून उडवून देऊं बार. चल, कपडे कर, विठोबा व त्यांची मंडळी तुला मुद्दाम नेण्यास आली आहेत.—"

त्या सर्वांची माझ्याविषयींची ती हितबुद्धि पाहून मी हतबुद्धच झालों ! एकेकाची बोलण्याची घाई अशी कीं, जणूं काय, मी गुडघ्याला बाशिंग बांधून बोहल्यावर चढण्यास सिद्धच आहें ! त्या सर्वांचा तो मजविषयींचा उमाळा मला इतका तिरस्कारार्ह वाटला कीं, एकेकाच्या खवाक्याला धरून घराबाहेर हांकलून द्यावें, असाच विचार माझ्या मनांत आला. तरी मीं शांतवृत्ति धरली आणि अगदीं स्पष्ट स्वरांत म्हटलें, " तूर्त विवाहबद्ध होण्याचा माझा विचार नाहीं. तुम्ही माझ्यावर विसंबूं नका, आणि कृपा करून या बाबतींत यापुढें तुम्ही कोणीच माझ्याबद्दल प्रयत्न करूं नका."

माझा हा नकार इतका स्पष्ट, रूक्ष व वैराग्यपूर्ण होता कीं, कोण-त्याहि समंजस मनुष्यानें तत्संबंधीं पुन्हां एक अक्षरहि काढण्याचें धाडस केलें नसतें; परंतु कांहीं विशेष हेतूनें मजकडे आलेल्या त्या परोपकारी मंडळाला माझें म्हणणें अगदींच फोल वाटलें.

वासुकाकांनीं माझ्या गद्धेपंचविशीची जाणीव देत मला उपदेशामृत पाजिलें. विठोबानें त्याचाच अनुवाद केला आणि त्याच्या बायकोनें तर एखाद्या गळेपडू म्हातारीप्रमाणें लगट करून माझा नकार धुडकावून लाविला !

माझी सहनशक्ति संपली ! मी एकदम दांतओठ खाऊन कर्कश स्वरांत ओरडलों, " काय हो, तुम्हां सर्वांना कांहीं अकला आहेत का ? मीं तुम्हांला स्पष्ट नकार ऐकवला असतां, त्याची टिंगल करीत तुम्ही मला विवाहबद्ध होण्याचा उपदेश करतां, अर्थ तरी काय याचा ?—- चुप्प ! एक शब्द कोणी उच्चारूं नका, आणि आल्या पावलीं चालते व्हा पाहूं सगळे. नाहींतर साऱ्या कऱ्हाडला माहीत आहे कीं, माझें माथें फिरलें आहे, ती गोष्ट मी कृतीनें सिद्ध करीन. जाच माझ्यापुढून. नाहींतर हातांत पडेल तें साधन घेऊन मी तुमचीं टाळकीं सडकीन— जॉव !—"

ही जालीम मात्रा रामबाण ठरली ! वासुकाका व विठोबा आधीं पळाले. तो मुलगाहि धांवला ! विठोबापत्नी ' बरं अं, पाहून घेऊं ! ' असें पुटपुटत द्वारकाबाईसह निघून गेली.

मी दरवाजा धाडकन लावलान् माडीवर गेलों. बाबी उठून आपल्या बाहुलीशीं खेळत होती. मी तिच्याकडे दुर्लक्ष करून पिसाळलेल्या तरसाप्रमाणें मागे-पुढें फिरूं लागलों. मनापुढें विचार एकच: " या चांडाळांना माझी उठाठेव कां ?—"

# प्रसंग सतरावा : : : १७

आणि त्या दिवसानंतर वधूपित्यांचें जणूं पेंवच फुटलें. मला घराबाहेर पडण्याची सोय राहिली नाहींच; पण घरांतहि स्वस्थपणा लाभणें कठीण होऊन बसलें! सर्वांचा ओढा माझ्याकडे! आळीकरांना, ओळखीच्यांना व बिनओळखीच्यांना एकच ध्यास! तात्या सबनीसाचे चार हात होतात केव्हां आणि तो खोड्यांत सांपडतो केव्हां?—माझा एकाकीपणा, तरुण वय, घरकामाचे कष्ट सर्वांना फारच जाचूं लागले व माझ्या भावंडांची तर प्रत्येकाला करुणा येऊं लागली.

हा प्रेमाचा पान्हा कोणाच्या तरी विशेष प्रेरणेनें फुटला आहे हें मीं ताडलें; पण तो कोणाच्या व कां तें लक्षांत येईना. सात-आठ दिवस असेच गेले.

हं. आणि तितक्यांत तें पत्र आलें.

"श्री. तात्या सबनीस यांस—तुम्हाला विवाह करण्याची फारच जरूरी असतां तुम्हीं चालढकल चालविलेली पाहून आश्चर्यच वाटतें. आम्हाला यांत तोंड घालण्याचें कारण नाहीं; पण चि. गोदावरीच्या आशेनें जर तुम्ही बसलां असलां तर ती तुम्ही मोठीच चूक करीत आहां हें ध्यानांत ठेवून असा. माझी बहीण मी तुमच्यासारख्या मुर्दाड

मनुष्याला मुलींच देऊं इच्छीत नाहीं. तिचीहि पण तुम्हाला वरण्याची इच्छा नाहीं. मुद्रास जास्त लिहिणें नकोच. विठोबा ”

अस्सें ! एकूण विठोबा सूत्रचालक आहेत तर ?–ठीक. कां ?– कळेल कळेल.

विठोबाचें पत्र टपालानें आलें होतें. पण त्याचें उत्तर मीं राजाच्या हस्तें पाठविण्याचें योजिलें व लागलीच खालील चिठी खरडली.

“ तीर्थस्वरूप विठूदादा यांस––खलिता पोंचला. त्यांतील आचरटपणा पाहून मनाची करमणूक झाली. वयांत आलेल्या व स्वभावत: ताठर असलेल्या बहिणीच्या विवाहाबाबत चोंबडेपणा करण्याचा आपल्यास काडीइतकाहि अधिकार नाहीं, ही साधी गोष्ट तुमच्या निर्बुद्ध टाळक्यांत आली नाहीं, याचें कांहींच आश्चर्य नाहीं. गोदावरीच्या विवाहाचे बाबतींत तुमच्यासारखी कोणतीच वेडी प्रतिज्ञा मला करावयाची नाहीं. सारे योगायोग परमेश्वराच्या हातीं आहेत. पण प्रसंग पडलाच तर तिचा हात धरतांना तुमच्यासारखा एक हलकट मनोवृत्तीचा भाऊ तिला आहे, ही गोष्ट मात्र मनाला डाचेल. तिचा बिचारीचा हा कांहींच दोष नाहीं. तुम्हीं मनांत मांडे खात राहावें. तोंपर्यंत मला काय करतां येईल तें पाहतों. तुम्ही सुज्ञ नाहीं, ही माझी खात्री असल्यामुळें पत्र उगीच कशाला वाढवावें.

तात्या.”

जसा रोग तसें औषध या न्यायानें मीं वरील पत्र लिहिलें व राजाच्या हातीं तें विठोबाकडे धाडून दिलें. उत्तराची अपेक्षा नसल्यामुळें मीं तो विषय बाजूला सारला.

आज रविवार असल्यामुळें राजाच्या शाळेची घाई नव्हती. सारें काम रेंगाळत चाललें होतें. भांडीं घासणें, डाळ तांदुळ वघणें, चूल पेटवणें,

आंघोळी उरकणें, सैंपाकाला लागणें आणि फाफू करीत व मनांत दुर्दैवाला शिव्या मोजीत अन्न उकडणें इत्यादि दिनक्रम सुरू झाला. राजा बाहेर पिटाळला तो लौकर आलाच नाहीं. बाबी गोदावरीकडे न्हाण्यास गेली होती, म्हणून आमची स्वारी एकटीच अस्तन्या सारून काम करीत होती आणि गतदिवसांचा गोंधळ आवरून पुढच्या दिवसांचा घालून ठेवीत होती.

इतक्यांत साडेदहाचे सुमारास राजा माझें नांव पुकारीत उड्या मारीतच सैंपाकघरांत आला व एकदम म्हणाला, "तात्या, तुला एक गंमत कळली का ?–आपल्या गोदुताई म्हणे सिनेमांत जाणार आहेत. दुर्गाबाई खोटे आहेत ना, त्यांच्यासारखं काम करायला—"

माझें सारें शरीर एकदम दगड बनलें ! मीं विचारलें, "काय म्हणतोस ? —"

राजा म्हणाला, "आमच्या वर्गातला मुळे म्हणत होता. मुळे म्हणजे कोण माहित आहे का ?—ज्यांच्या घरांत गोदुताईचं कुटुंब भाड्यानं राहतं, त्या घरवाल्यांचा मुलगा !—आणि बरं का तात्या, आपल्या गोदुताईना अगदीं पहिल्या महिन्यापासून तीनशें रुपये पगार मिळणार आहे, तीनशें रुपये—" शेवटचें वाक्य तो मोठ्या आवेशानें बोलला.

त्याच्या एकेक शब्दानें माझ्या हृदयाला प्रचंड धक्का बसत होता. त्याचें सांगणें खोटें मानण्याचें कांहींच कारण नव्हतें. तरीपण मनाला वाटलें–काय वाटलें ?–कुणाला माहीत !

मीं हातांतील काम बाजूला ठेवलें, एक सुस्कारा टाकला व नंतर अगदीं निःसत्त्व हंसत राजाला म्हणालों, "हंः ! वेडा आहेस, कांहीं तरीच सांगतोस. आपल्या गोदुताई सिनेमांत नटी म्हणून जाणार ?

शक्य नाहीं, शक्य नाहीं. तूं जा. आंघोळ कर जा. आणि मग बाबीला घेऊन ये. हं जा पळ—"

राजा नवल करीत आपल्या कामाला लागला. मीहि सैंपाकाकडे पाहूं लागलों. पण मन ?—घायाळ झालेलें वेडें मन ? तळमळूं लागलें !–एक नवें द्वंद्व सुरू झालें !

कांहीं युक्तीनें मीं राजाला आपल्यापुढून घालवून दिला. पण त्यानें माझ्या माथीं आणून मारलेला विषय—तो मी कसा विसरणार ? रोजच्या संवयीप्रमाणें मी सैंपाकांतील कांहींतरी गोष्टी, कशातरी उरकीत होतों. पण घायाळ झालेलें मन एका आगीच्या भट्टींत कोंडलें होतें !

गोदावरी सिनेमांत जाणार. तीनशें रुपये पगार !—......... डाळ शिजली का ?–हा ! कसला चटका बसला हाताला !–गोदावरी नटी होणार......तिचे फोटो येणार–हं—शिंचा जाळ कां लागेना बरोबर ? फू–फू–फू–फू मरा ! पाणी ओतूं का चुलींत ? –गोदावरी सिनेमांत जाणार. तीनशें रुपये पगार ! जिकडे तिकडे तिची कीर्ति –चिंच भिजली का ? –आमटीची फोडणी...तशीच खाऊं आज ! –अर्रर हें काय केलं–चिंचेचा कोळ नुसत्या त्या वेलांतच ओतला कीं ...स्–हा !–निखारा हाताला चिकटला !–गोदावरी नटी होणार, तीनशें पगार, आपल्याला दाद नाहीं........जाळ विझला !— फुंकणी फुंकणी हं– फू–फू–फू—"

राजा ओरडला, "तात्या, दूध उतूं गेलं शेगडीवर—"

मी खेकसलों, "जाऊं दे रे–आपल्याला काय करायचंय. तुझी पूजा आटप–न् बाबीला आणायला जा पाहूं —"

भात उतरून ठेवला. आमटीचें कांहींतरी केलें. भाकरी करायच्या नाहीं ठरविलें. चुलीजवळच उठून सुंभासारखा उभा राहिलों. पुढें काय

करायचें हेंच सुचेना. डोकें भ्रमत होतें. मनांत तोच एक विचार–गोदावरी सिनेमांत जाणार !—

–एकूण माझ्या विवाहाबद्दलची विठोबाची भाऊगर्दी याकरितां तर नसेल ? –पण–पण–मनाला सरळ विचार करणेंसुद्धां साधेना.

राजा बाबीला आणण्यास गेला. मी ओटीवर येऊन माच्यावर बसलों. मन म्हणालें, " राजा गाढव आहे. कुठंतरी कांहींतरी ऐकतो आणि सांगत येतो. गोदावरी सिनेमांत जाणार ? अगदींच अशक्य. हॅट ! अगदीं खोटी गोष्ट !–कां तिला गाणं नीट येतंय् कीं तिच्या आंगीं धीटपणा आहे–काय आहेत काय तिच्या अंगांत नटीचे गुण—"

मनांत एक राक्षस दडी मारून बसला होता, तो बुरखा बाजूला करीत म्हणाला, " एवढी अशक्य वाटण्यासारखी ही गोष्ट काय आहे बुवा ? तिला तयार करून घेतां येणार नाहीं का ? –गोदावरी सिनेमांत जाणार न् अल्पावधींत सिनेमासम्राज्ञी म्हणून झळकणार ! "

इतक्यांत टपालवाल्यानें एक पाकीट आणून टाकलें.

मीं भ्रमिष्टाप्रमाणें तें उचलून घेतलें, फोडलें, वाचलें.

" चि. तात्यास,

आनंदाची गोष्ट. मी सध्यां कराचीस आहें. माझ्यामागचें ग्रहण सुटलें असून, आमची स्वारी निश्चित व पूर्ण मजेंत आहे. एवढेंच नव्हे, तर जवळ थोडा रुकाहि झाला आहे. तात्या, तुझ्या वामनदादाचें चरित्र म्हणजे एक अद्भुत रसाची कादंबरी आहे बरें का ? –मागच्या एका पत्रांत आम्ही गडप्प होणार आहों म्हणून वर्दी दिली होती. आज कळवितों, आम्ही लौकरच कऱ्हाडास येणार आहों. आमच्या आयुष्याची मजा समक्षच सांगेन—"

पत्र वाचतां वाचतां मी मध्येंच थांबलों व शून्य दृष्टीनें समोर पाहिलें. वरील पत्र भटक्या वामनदादाचें आहे ही गोष्ट ध्यानीं आली, पण इतर

कोणतीहि संवेदना मनास झाली नाहीं. आपला भाऊ आला काय नी गेला काय ?–असली विरक्ति मनास आली होती. कांहीं वेळ तर पत्र पुढें न वाचतांच मी मूढ होऊन बसलों. नंतर सहज चाळा म्हणून पत्र पुढें वाचूं लागलों.

" आपल्या तिकडील वार्ता कळवावी. कर्णोपकर्णी कळलें कीं, बाबा गेले व मागोमाग आईहि गेली ! तात्या, मी भटक्या मनुष्य आहें. मायेचे लागेबांधे मला फारसे नाहींत. तरीपण आईबापांच्या मृत्यूची वार्ता खरी असेल तर–तूं, राजा, बाबी उघडीं पडलां यांत शंका नाहीं. मनाला फार चमत्कारिक वाटतें. आतां माझ्याकडे वडीलकी आली. मी तुमच्याकडे त्या दृष्टीनें पाहण्यास हवें, म्हणून मी कऱ्हाडास येणार आहें."

आतां मी थोडा भानावर आलों. मीं त्या पत्राकडे पाहत स्वगत म्हटलें, " वामनदादा, तूं फार उशीरां येणार !–तोंपर्यंत गोदावरी सिनेमांत जाण्याचें नक्की ठरेलसुद्धां ! –वामनदादा, तूं स्वतःचें जीवन अद्भुत कादंबरी मानतोस; पण माझ्यासारख्याचें जीवन म्हणजे शोकान्त नाटक आहे रे—" मनाला पुन्हां कोणींतरी डंख मारला ! —आलेली कळ दाबून पत्र पुन्हां वाचूं लागलों—

" खालीं मुंबईचा पत्ता दिला आहे. त्यावर पत्रोत्तर धाड. तूं कऱ्हाडास आहेस कीं आणखी कोठें आहेस, तें नीटसें कळलें नाहीं. हें पत्र अदमासानें धाडीत आहें. म्हणून पत्र पोंचतांच उत्तर पाठीव. वाटल्यास तार कर. मी धांवत येईन. तुला संसारी पाहावें अशी फार इच्छा आहे. आबांची गोदावरी कुठें आहे ? –तिनें मला '**मी वाट पाहीन**' असें वचन दिलें आहे. त्याप्रमाणें ती आहे का ?–कां तुझें बेश्या लग्नहि होऊन गेलें आहे ?–तसें कांहीं नसावें असें वाटतें. तूं माझ्यासारखा भटक्या राहूं नकोस. तें बरें नाहीं. तरी सविस्तर उत्तर पाठीव. **वामन.**"

हंसायचें कीं रडायचें ?–मी पत्र बाजूला टाकून पायाला तिढा घालून बसलों तितक्यांत—राजा एकटाच परत आला. त्यानें एक पाकीट आणिलें होतें. तें माझ्या हातांत देत तो म्हणाला, "तात्या, गोदुताईनीं मलाहि तिकडंच जेवायला बोलावलं आहे. बाबीला त्यांनीं ठेवून घेतलंय् आणि हें पत्र दिलंय."

मीं नवल करीत पत्र घेतलें. नंतर त्यास वामनदादाचें पत्र दाखवून तो येणार असल्याची वार्ता सांगितली. त्याला आनंद झाला. तो म्हणाला, "गंमतच होणार म्हणायची. बरं, मीं जेवायला जायचं का मग ?—"

मीं त्यास परवानगी दिली.

तो गेल्यावर मीं पुढील दरवाजा लावून घेतला. नंतर गोदावरीचें पत्र पाहिलें.

"सेवेसी.

अगदीं निकराला गोष्टी येईपर्यंत तोंड उघडायचें नाहीं व जगाचा तमाशा पाहत राहायचें असा मनाचा निश्चय. विशेषेंकरून आपल्या-पर्यंत माझा कोणताहि त्रास न येईल, याला जपत होतें. परंतु यापुढें तें शक्य दिसत नाहीं. माझ्या मनाचा व संरक्षणाचा भार आतां आपण धैर्यानें उचललाच पाहिजे. मला दुसरा आधार नाहीं. आपल्याला कळलें आहे कीं नाहीं कोण जाणे; पण मुंबईकडचे कोणीतरी दोन लोक आले आहेत. त्यांना म्हणे कुलीन घराण्यांतील एक होतकरू नटी पाहिजे. माझें नांव त्यांना कोणीं सुचवलें देव जाणे. त्यांच्या बोलण्यावरून आमच्या दादासाहेबांनीं आपण होऊन पत्रव्यवहार केलेला असला पाहिजे. तें कांहीं असो. ते लोक येऊन दादाच्या खनपटीला बसले आहेत व दादा माझ्यामागें लागले आहेत. मीं पहिल्या क्षणापासून धिःकार केला; पण दादाला तें खरेंच वाटत नाहीं. पैसा,

कीर्ति, मानपान याच्याच भरमसाट गोष्टी तो बोलतो व जणूं काय माझी संमति आहे, अशा थाटानें आलेल्या मुंबईकरांशीं बाटाघाट करतो.

मला या साऱ्या प्रकाराची भयंकर चीड आलेली आहे. पण करणार काय ?—जळांत राहून माश्यांशीं वैर वाढवितां येईना. आपलाच ओंठ आपल्या दातांनीं फोडतां येईना. मग मी आतां कुणाच्या तोंडाकडे पाहायचें. जगाला न दिसणारा पण मला असणारा एक बळकट आधार म्हणजे आपण; म्हणून आपल्याकडे धांव घेत आहें. आज दुपारीं तीन वाजतां मुंबईकर मित्र कायमचें बोलणें करण्यास येणार आहेत. त्या वेळीं आपण आमच्या घरीं यावें. दादाकडे पाहूं नये. मी हक्कानें हाक मारतें आहें. अवश्य यावें आणि त्या मंडळीशीं माझ्यातर्फे बोलावें. नटी होऊन मिरविण्याची, धनसंपन्न होण्याची मला काडीइतकी इच्छा नाहीं. सर्व गोष्टींचा नीट विचार करून मीं हें ठरविलें आहे. तेव्हां आपण धांवत आलें पाहिजे. यापुढें आपल्या रुक्मिणीची लाज कृष्णानेंच राखली पाहिजे. जास्त काय सांगूं ?

या उपर माझ्या दादानें मांडलेला माझा विक्रा आपणाला पसंत असल्यास देवाची काय इच्छा असेल तें खरें ! कळावें. **मी वाट पाहातें आहें.**

गोदावरी.''

पत्र संपतांच मी ओरडलों—'' राजा—राजा—''

पण तो घरांत नाहीं, हें माझ्या मागून लक्षांत आलें. गोदावरीकडे उत्तर कोण नेणार ?—मी स्वतःच्या गाढवपणावर रागावलों. राजाला जा म्हणण्याची आपण घाई कां केली हेंच मला समजेना. पत्र वाचून त्याच्या हातींच उत्तर दिलें असतें तर ?

शेवटीं स्वतःच जाऊन सांगून येण्याचें ठरविलें. घाईनें कपडे केले आणि दरवाज्याबरोबर पडलों. तोंच एक टॅक्सी तिथें येऊन थांबली आणि तींतून विठोबा व दोन फॅशनेबल गृहस्थ बाहेर पडले. माझ्याशीं त्यांचे जय गोपाळ झडले.

## प्रसंग आठरावा : : : १८

माझ्या मुद्रेवर तिरस्कार व त्रयस्थपणा स्पष्ट दिसत असतांहि विठोबानें पुढें होऊन सलगी दाखवीत माझा हात धरला आणि जरा मला पुढें नेऊन कानगोष्ट केली. "मुंबईला **जगद्विजयी फिल्म सिंडिकेट** नांवाची बोलपट करणारी कंपनी आहे ना, त्याचे हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. तुमच्याकडे त्यांचें थोडें महत्त्वाचें काम आहें. चला, घरांत चला."

अगदीं अनिच्छेनें मीं त्यांच्या म्हणण्यास अनुमति दिली. मी त्या तिघांना घेऊन घरांत शिरलों व माडीवर गेलों. औपचारिक सत्कार झाल्यावर विठोबांनीं आपल्या खिशांतून विड्याचें व त्या दोघांनीं धूम्र-पानाचें साहित्य काढलें. आलेल्यांपैकीं एक होते रमणभाई देसाई आणि दुसरे होते मिस्टर व्ही. बी. सामंत.

सामंतानीं माझ्यापुढें कंपनीचें उद्देशपत्रक ठेवलें. मी तें घेऊन वाचूं लागलों. अगदीं ओतीव सांच्याचें तें होतें. अधिकृत भांडवल पांच लाखांचें. तें पंचवीसाचा एक शेअर याप्रमाणें वीस हजार भागांत

विभागलें होतें. बोलपटाचा धंदा अत्यंत यशस्वी, थोड्या खर्चांत भरपूर फायदा देणारा आहे, विदेशी कंपन्या हिंदुस्थानांतून कोट्यावधी रुपये यापायीं नेत आहेत. म्हणून देशी भांडवलाला, बुद्धिमत्तेला, कल्पकतेला केवढा वाव आहे आणि गेला बाजार २०।२५ टक्के डिव्हिडंड सुटणें कसें शक्य आहे याचें इतकें सुरस व उत्साहपूर्ण वर्णन होतें कीं, ज्याच्याजवळ पैसे आहेत, त्यानें तर चटकन शेअर्स घेऊन आपलें भाग्य साधावेंच; पण ज्यांच्याजवळ तशी सोय नाहीं, त्यांनीं बेलाशक कर्जसुद्धां काढावें. पैसे कमावण्याची ती सरळ साधी युक्ति होती.

फिल्म सिंडिकेटचें तें भपकेदार उद्देशपत्रक वाचल्यावर मला अशी शंका आली कीं, ते लोक शेअर खपविण्याकरितां आले असावेत. पण माझ्यासारखा भणंग त्यांनीं कां गांठावा? एक शेअरसुद्धां चटकन् घेण्याची ज्याची पात्रता नाहीं, त्याच्या घरीं त्यांनीं यावें, चमत्कारच नव्हे का हा !

मीं प्रश्नार्थी विठोबाकडे पाहिलें. त्यानें मला खालीं चलण्याविषयीं खूण केली. दोघे खालीं आलों. विठोबानें हितगुज आरंभिलें. आधीं त्यानें मुंबईकर मित्रांची भरपूर स्तुति केली. मग बोलपट धंद्याची, मग आपल्या लोकांना मिळत असलेल्या संधीची—

मीं एकदम म्हटलें, "मुद्याची गोष्ट लौकर बोलाल तर मी तुमचा आभारी होईन."

विठोबा सुहृदत्व दर्शवीत म्हणाला, "आपल्या गोदावरीला नटी होण्याचा चॅन्स आला आहे. तिच्या बाबतींत तुझी आमची विनाकारण

तेढ वाढत चालली आहे. ती बरी नाहीं. तडजोड करावी असें मनानें घेतलें. गोदावरीचें तेंच म्हणणें पडलें. ती म्हणाली, नटीची ऑफर वाईट नाहीं; पण आपल्या इष्टमित्रांत नीट चर्चा करून करारमदार झालेले बरे; म्हणून तिनें मुद्दाम तुझें नांव सुचविलें. तुझ्यावर तिचा फार मोठा विश्वास. तेव्हां या बाबतींत तूं तिची नीट समजूत घातली पाहिजेस. आम्हीं तिला तयार केलंच आहे. मी तिचा प्रायव्हेट सेक्रेटरी होणार म्हणून मीं तिला वचन दिलें आहेच; पण तुझ्यासारख्या मित्रानें त्यांत थोडी भर घातली पाहिजे. तिचें वचन तूं घे, आणि तूं तिला तयार करण्याचें आम्हांला वचन दे."

क्षणभर तरी मी स्तिमितच झालों !

मीं मनांत दांत-ओंठ खात म्हटलें, "कर्मचांडाळा ! गोदावरी-सारख्या मुलीची तूं विक्री करणार आणि त्यांत माझाहि हात गुंतवणार !– काय नीति आहे ? काय भगिनी-प्रेम आहे ? कुठें आहे ती माणुसकी ? कांहीं क्षण तरी मी त्या अधमाकडे पाहत राहिलों. गोदावरीचें पत्र मला न येतें तर ? त्याचा तो राक्षसी प्रस्ताव ऐकतांच त्याचें नरडें पकडून त्याला खालीं घातला असता आणि लाथांनीं कुंदलला असता. पण ती आर्त हांक माझ्या हृदयाभोंवतीं फिरत होती. त्या हाकेकरितां मला कांहीं मार्ग काढणें भाग होतें. त्याच्या गोटांत घुसणें आवश्यक होतें.

मी कांहीं बोलत नाहीं असें पाहून माझ्या गळीं त्याची पिशाच्च कल्पना उतरत असावी अशी त्यानें अटकळ बांधली. म्हणून तो मला

आणखी खालच्या आवाजांत म्हणाला, " आन् बरं का तात्या, कंपनीचं हें काम अगदींच फुकट नाहीं करायचं. मॅनेजिंग डायरेक्टरनां मीं स्पष्ट सांगितलं आहे कीं, आमच्या तात्याला कांहींना कांहीं पोंचवावं लागेल. त्यांनीं लागलीच कंपनीचे फुल्ल पेड असे पन्नास शेअर्स देण्याचें वचन दिलें आहे. आपण थोडें ओढून धरूं तर हा आंकडा शंभराचासुद्धां होईल."

खरें आहे ! बोलाच्या कढीभाताला खर्च तो काय !

दिवटा पुढें म्हणाला, " अडीच हजारावर डिव्हिडंड काय सुटेल याचा तूंच हिशेब कर. किमानपक्ष वीस टक्क्यांची त्यांची गॅरंटीच आहे !"

( हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवून हें उत्पन्न सुटणार होतें. )

मीं त्याच्या कटांत सामील होण्याचें ठरविलें. मीं म्हटलें, " विठूदादा, पैशाचा विशेप प्रश्न नाहीं. मला दिडकी न मिळाली तरी चालेल, पण गोदावरीला सुख झालें पाहिजे व त्याकरितां मी वाटेल तें दिव्य करीन. पण ध्यानांत ठेव, ही गोष्ट चटकन् नाहीं होणार. मला गोदावरीची स्वतंत्रपणें गांठ घेऊन तिचें मन समजावून घेतलें पाहिजे. तिच्यासारख्या हट्टी मुलीची समजूत करायची म्हणजे ही गोष्ट तडकाफडकी नाहीं होणार चार–आठ–पंधरा दिवससुद्धां लागतील." विठोबाला तें मान्य करावें लागलें; तेव्हां मग त्याच्याच हस्तें मीं गोदावरीस तीन वाजतां येऊन जा म्हणून निरोप धाडला !

*

## प्रसंग एकोणिसावा : : : १९

परिस्थितीनें किती चमत्कारिक, प्रक्षोभक आणि गुंतागुंतीचा डाव माझ्यापुढें मांडला होता! कुठेंहि रहस्य नव्हतें. सारे पत्ते माझ्यासमोर उघडे होते. पण कोणता पत्ता कोणत्या पत्त्यावर ठेवायचा न् डाव जिंकण्याचा प्रयत्न करायचा, हेंच मला उमगत नव्हतें. न खातांपितां मी विचार करीत होतों, पुढें काय करायचें?

एकीकडे विठोबाची नीचता होती. एकीकडे गोदावरीची आर्त हाक होती. एकीकडे माझें दारिद्र्य होतें आणि एकीकडे बेकारी होती. एका फटकाऱ्यांत चारी गोष्टींचा निकाल लावणें भाग होतें.

या साऱ्या गुंतागुंतींतून सुटण्याचा मार्ग एकच होता. गोदावरीशीं चटकन् विवाहबद्ध होणें आणि कांहीं तरी धडपड करून उपजीविकेचा मार्ग निश्चित करणें. यांत फारसा कठीणपणा कांहींच नव्हता. विठोबानें कितीहि विरोध केला तरी गोदावरीनें मलाच वरण्याचें ठरविल्यास त्याला कांहींच करतां येण्यासारखें नव्हतें. त्याचप्रमाणें माझें कतरणचातुर्य मला खास उपयोगी पडण्यासारखें होतें. साधा पोटापाण्याचा प्रश्न सुलभतेनें सुटण्यासारखा होता.

मग मनाला कावरें-बावरें कां वाटत होतें ?

गोदावरीवरील अकृत्रिम प्रेमामुळेंच मनाला असें वाटत होतें कीं, नटीच्या पेशाच्या मार्गानें तिच्याकडे जें वैभव व कीर्ति धांवून येत होती, तिच्याआड आपण यावें का ? आज ती सामान्य तरुणी आहे. जी फिल्म कंपनी आज तिला हाताशीं धरते आहे, तिचें कदाचित् उद्यां दिवाळें वाजेल; पण तोंपर्यंत गोदावरीला दोनचार हजार रुपये मिळून नटी या नात्यानें तिची कीर्ति समाजांत प्रतिष्ठित होण्यास कसलीच अडचण पडणार नव्हती. म्हणजे तिच्या आयुष्याचा वैभवकाल जवळ जवळ निश्चित होता. मग तिनें आपल्यासारख्या भणंगाला वरून घराच्या चार भिंतींत कां कोंडून घ्यावें आणि आपण तरी स्वार्थप्रेरित होऊन तिला कां नडवावें ?

न्यायबुद्धीला ही विचारसरणी पटे. पण हळुवार मनाला वाटे— " अंहं ! गोदावरी पत्नी होण्यास उत्सुक असतां, आपण तिला दूर लोटणें बरें नाहीं."

पुन्हां मनाला वाटे, गोदावरी या प्रकाराकडे कोणत्या दृष्टीनें पाहत असेल बरें ! (मनुष्याला स्वार्थ कांहीं शिकवावा लागत नाहीं.) वेड्या-खेरीज वयांत आलेल्या प्रत्येक प्राण्याला आपल्या हिताला जपण्याचें सहज कळतें. मग गोदावरीला कां कळूं नये ? ती तर मॅट्रिक झालेली आहे. अर्वाचीन काळ ओळखण्याचें सामर्थ्य तिच्या अंगीं आहे. तिनें साधक बाधक विचार केला नसेल असें कसें होईल ? नटीचा पेशा पत्करणें तिच्या मनालाच पटत नसावें.

पण कां ?

*　　*　　*

तीन वाजतां गोदावरी बाबीला घेऊन आली. मी ओटीवर तिचीच वाट पाहत हिंडत होतों. आम्हीं तिथेंच बसून बोलण्याचें योजिलें. बाबीला खेळ देण्यांत आला. ती त्यांत गुंगली. मी माच्यावर बसलों. गोदावरीला मीं बसण्यास सांगितलें. 'बसतें. इतका वेळ बसलेंच होतें.' असें कांहीं तरी ती पुटपुटली.

आम्हीं दोघांनीं कांहीं क्षण एकमेकांकडे पाहिलें. मी कांहीं बोलणार तोंच गोदावरी एकदम म्हणाली, "तात्या, आज तुम्ही जेवलां नाहींत वाटतं ?–खोटं बोलूं नका. दूधसुद्धां घेतलेलं दिसत नाहीं तुम्हीं. माझ्या पत्रामुळं त्रास झालाच शेवटीं तुम्हांला—"

मी चकितच झालों. पण तें नवल नव्हतेंच. स्त्रीची मायाळू दृष्टि या असल्या गोष्टी आधीं हेरते ! मीं तिला विठोबाचें आगमन हें उपाशीं राहण्याचें खरें कारण सांगितलें.

गोदावरीनें माझ्या खुलाशाकडे विशेष लक्ष न देतां म्हटलें, "आज सैंपाक तरी केला होतात ?–थांबा, मी तुम्हांला दूध आणून देतें. मग आपण बोलूं–"

ती घरांत गेली. मी चोरट्यासारखा बसून राहिलों. स्वयंपाकगृहांतील गोंधळ पाहून गोदावरीला काय वाटेल ?–माझ्याकरितां कां श्रमते बिचारी ?

मी हलक्या पावलांनीं आंत आलों. उजाड पडलेल्या जागेंत मनुष्य जसें स्तंभित होऊन उभें राहतें, तशी गोदावरी तेथें उभी होती. दुधाचें पातेलें बाहेरच राहिल्यामुळें मांजरानें तें कोरडें करून ठेवलें होतें !

गोदावरीनें माझ्याकडे पाहिलें. ती म्हणाली, "हे असे हाल रोज काढतां ?–" तिचे अश्रू मैंला दिसले नाहींत. पण तिच्या स्वरांत विलक्षण कातरता होती.

मी उगीचच हंसलों व म्हणालों, "ए! अशी गोंधळूं नकोस. हें पुरुषी राज्य आहे. असंच चालायचं. एक दिवस न जेवलं तर कांहीं बिघडत नाहीं. चल बाहेर ये. आपण मुद्याची गोष्ट बोलूं.–" मी बाहेर आलों. गोदावरी माझ्यामागोमाग आली.

मीं एकदम बोलण्यास प्रारंभ केला. मीं शांतपणें म्हटलें, "गोदे, तुझ्या पत्रांत तूं जसा मला आपला एकच आधार मानला आहेस, तसंच माझंहि आहे. आपल्या मनाच्या खऱ्या गोष्टी मनमोकळेपणानें बोलण्यास मला अवघ्या जगांत एकच स्थान. तें म्हणजे तूंच. अर्थात् त्या दृष्टीनें मला काय वाटतें तें तुला सांगतों. तूं त्याचा शांतपणें विचार केला पाहिजेस. विठोबाला मीं पंधरा दिवसांची मुदत तेवढ्याकरितां दिली आहे. गोदे, प्राप्त परिस्थितीकडे केवळ भावनाविवश होऊन पाहूं नकोस. तुझ्या हिताआड येण्याची कोणतीहि दुर्बुद्धि मला होत नाहीं, होणार नाहीं—"

गोदावरीनें मध्येंच म्हटलें, "समजलं तुमचं म्हणणं. पण मला आतां कसलाच विचार करावयाचा नाहीं. तो भार मीं तुमच्यावर टाकला आहे." ती क्षणभर थांबली व पुढें म्हणाली, "तात्या, कुमारिकेला कांहीं गोष्टी जनलज्जेमुळें व मनलज्जेमुळें सरळ, स्पष्ट, धीटपणें बोलतां येत नाहींत. अडचण आहे तिलाहि. पण ती मर्यादा मी थोडीशी ओलांडतें. मला तुम्ही बुद्धीचा कस लावायला सांगतां, पण आम्ही बायका स्वभावतः भावनाप्रधान आहों, ही गोष्ट तुम्ही विसरतां. त्यामुळं आमचं हृदय तुम्हांला नीट आकलन करतां येत नाहीं. तात्या, धन, कीर्ति, मान-सन्मान याला पुरुष जितका लुब्ध आहे तितकी स्त्री नाहीं ! ती केवळ एका प्रेमाच्या आधारावर जन्माला येते, वाढते, जगते, आत्मार्पण करते. स्त्री पुरुषथाटाची झाल्यावर कदाचित् ती पुरुषाच्या पुढं जाईल, पण

तोंपर्यंत ती आपला आधार सोडणार नाहीं. मी स्त्री आहें. मला त्याची खंत नाहीं. अर्थात् घरापलीकडे मला जायचं नाहीं. आंतील हृदय कसं उघडून सांगूं ?–तात्या, तो दिवस तुम्ही विसरलां असाल–माझ्या तोंडांत तुम्हीं दिलीत तो !–तुमचा त्या वेळचा तो रागीट चेहरा मला आजहि आठवतो. मी लहान होतें, तुम्हीहि लहानच होतां. पण त्या घटकेपासून काय झालें कुणाला माहीत–मी तुम्हांला भिऊं लागलें आणि–आणि–" ती थांबली. तिनें अंगणांत पाहिलें. तिची मुद्रा सलज्ज झाली होती. पुन्हां आम्हीं एकमेकांकडे पाहिलें.

मीं कांहीं बोलण्याची इच्छा केली, पण शब्द उमटेना. इतक्यांत गोदावरीच म्हणाली, " तुम्ही वाटेल तो विचार करा मला यापुढं कांहीं सांगायचं नाहीं, ऐकायचंहि नाहीं. वामनदादांना मीं वचन दिलंय त्याची आठवण ठेवा म्हणजे झालं—"

अगदीं विद्युत्गतीनें ती माझ्यापुढून निघून गेली !

मी विस्फारित नेत्रांनीं दरवाज्यांतून बाहेर पडणाऱ्या तिच्या त्या शांत, सत्त्वस्थ व गंभीर मूर्तीकडे पाहतच राहिलों. तिचें एकंदर चरित्र, मजकरितां तिनें केलेल्या गोष्टी आणि आजची तिची केविलवाणी स्थिति माझ्या ध्यानांत उभी राहिली. ' पुरुष हा परमेश्वराची कृति आहे, पण स्त्री ही त्याची प्रत्यक्ष मूर्तिच आहे.' हें गडकऱ्यांचें महान् वाक्य मला आठवलें. अक्षरागणिक मला तें सत्य वाटलें.

**" मी वाट पाहीन. "**

**" वामनदादांना मीं वचन दिलंय्. "**

**" घरापलीकडे मला जायचं नाहीं. "**

**" आंतील हृदय कसं उघडं करून सांगूं ? "**

तिचीं हीं वाक्यें हृदयांत थैमान घालूं लागलीं ! त्यांत अमृत होतें, पण जीव कासावीस होत होता.

गोदावरी माझ्यापेक्षां सात वर्षांनीं लहान होती, पण तिच्या माझ्या जीवनांत किती अंतर होतें ! दोघांची स्थिति कष्टप्रद, अनिश्चित, स्नेहशून्य व निराशाजनक होती. पण मीं चेकाळत, ठेचा खात, लाथा देत जीवनमार्ग क्रमिला ! आणि गोदावरीनें केवढें धैर्य दाखविलें ! तिनें नुसतें आपल्यापुरतें पाहिलें नाहीं. पित्याची सेवा केली, भावाच्या संसाराची आंच साहिली आणि माझ्या संसाराकडेहि पाहिलें ! या पुण्य-कर्माला जगाचें बक्षिस काय, तर चारित्र्यावर भलताच कलंक !

अनाथ पुरुष न् अनाथ स्त्री दोघेंहि दुर्दैवाच्या एकाच नावेंत बसलीं असलीं तरी दोघांच्या दुःखाचा प्रकार व तीव्रता एकच असते नाहीं, नव्हे ? हें सारें चित्र अंतःकरणांत उभें राहतांच मीं गोदावरीला वरण्याचा निश्चय केला.

मीं तात्काळ वामनदादाला कऱ्हाडास येण्याबद्दल तार केली ! त्याची मुसंडी व शिरजोरी एवढी विलक्षण होती कीं, गोदावरी व मी यांच्या विवाहाआड येण्याचें सामर्थ्य कोणांतच नव्हतें !

**समाप्त**